
# अुद्याचें खेडें

१३९
इं.ग्रंथ. १०८४
राज.
२७



# उद्याचें खेडें

लेखक:

**गंगाधर लक्ष्मण देवधर** बी. ए. एल्. एल्. बी.
मामलेदार आजरे (इचलकरंजी)

भाद्रपद शु. १४ शके १८६८
अनंत चतुर्दशी.

मूल्य
१॥। रुपये

१० सप्टेंबर १९४६

प्रकाशक

गंगाधर लक्ष्मण देवधर बी.ए.एल्.एल्.बी.
मामलेदार आजरे [ इचलकरंजी ]

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

मुद्रक

म. ल. महाबळ
प्रभा प्रेस, सांगली.

# अनुक्रमणिका

नगर वाचनालय
ता.
सातारा

—**—

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA
131

| | | पृष्ठें |
|---|---|---|
| | निवेदन | |
| | पुरस्काराचे चार शब्द ... | |
| | अर्पण पत्रिका ... ... | |
| १ | प्रास्ताविक ... ... | १ ते ४ |
| २ | समाज सेवक ... ... | ५ ते १४ |
| ३ | खेडेंगांवची रचना ... ... | १५ ते १९ |
| ४ | अन्न व आरोग्य ... ... | २० ते २७ |
| ५ | शिक्षण ... ... ... | २८ ते ४२ |
| ६ | शेती ... ... ... | ४३ ते ५७ |
| ७ | दुय्यम धंदे ... ... | ५८ ते ६५ |
| ८ | पूर्णतेकडे ... ... | ६६ ते ७० |
| ९ | आर्थिक पुनर्रचना .... ... | ७१ ते ७७ |
| १० | अुपसंहार ... ... | ७८ ते ८० |

——

# निवेदन.

—△—

'उद्याचें खेडें' हें पुस्तक वाचकांच्या हातात देण्यास मला फार आनंद होत आहे. लघुनिबंध व गोष्टींच्या संग्रहाचें माझें पहिलें पुस्तक 'जावअी' हें वाचकांच्या हातात देतांना जो अेक प्रकारचा बुजरेपणा मला वाटत होता तसा बुजरेपणा जरी यावेळीं मला वाटत नसला तरी आपल्या कृतीचें कौतुक कितपत होअील अशी गोड हुरहुर प्रत्येक पुस्तक प्रकाशनाचे वेळीं कोणत्याही लेखकास लागते (मग ते प्रकाशन पहिलें असो वा पन्नासावे असो.) व अशा प्रकारच्या हुरहुरींतच मी हें पुस्तक वाचकांना सादर करीत आहे. सध्या खेडेगांवची पुनर्रचना व त्यांचे आर्थिक नियोजन हा महत्वाचा प्रश्न सर्वांच्या विचाराचा झाला असून त्या दृष्टीनें मोठ्या व तज्ञ लोकांचे प्रयत्न चालू आहेत. सामान्य नागरीक या नात्यानें खेडेंगावांच्या पुनर्रचनेसंबंधीं मला काय वाटते. हे दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न मी या पुस्तकांत केला आहे व तो कितपत साधला आहे, हें ठरविण्याचे काम सूज्ञ वाचकांचे व अभ्यासकांचे आहे.

हिंदुस्थान हा देश कृषीप्रधान आहे व खेडेंगांवच्या सर्वांगीण अुन्नतीवरच देशाचें स्वास्थ्य व भरभराट अवलंबून आहे व या दृष्टीनें खेड्यांच्या पुनर्रचनेबाबत मी माझे विचार मांडणेचा प्रयत्न केला आहे. त्यांतील कांहीं मुद्दे न पटणारे असतील किंवा कांहीं विचार सर्वमान्य होणारे नसतील पण अुद्याचे खेडें रंगविण्याचा अेक प्रयत्न या दृष्टीनेंच वाचकांनीं पुस्तकाकडे पाहावें अशी विनंती आहे. निरनिराळ्या ग्रंथांच्या परिशीलनानें पुस्तकांत प्रदर्शित केलेल्या विचारांत भर पडली आहे. त्या सर्वांचें ऋण मान्य करणें हा कर्तव्यापैकीं अेक भाग आहे.

या पुस्तकांस मुंबअी अिलाख्याचे पंतप्रधान नामदार बा. गं. खेर यांनीं पुरस्काराचे चार शब्द लिहून देअून मला कायमचे ऋणी करून ठेविले

आहे. पुस्तकाची प्रूफ कॉपी घेऊन मी त्यांना भेटलो व पुरस्काराचे चार शब्द लिहून देण्यास विनंती केली व त्यांनीं पुरस्काराचे चार शब्द लिहून देण्याचें कबूल केलें. कामाचा अेवढा प्रचंड व्याप असताही व प्रांताच्या अनेकविध जबाबदारीचा डोंगर समोर अुभा असतांनासुद्धां त्यांनीं या पुस्तकाचा पुरस्कार केला याबद्दल मी स्वतःस धन्य समजतो व त्यांनी केलेल्या महदुपकाराबद्दल मी कृतज्ञतापूर्वक व अंतःकरणापासून त्यांचे जाहीररित्या आभार मानतो.

लग्नकार्याप्रमाणेंच पुस्तक प्रकाशनासही निरनिराळ्या व्यक्तींच्या व हितचिंतकांच्या निरपेक्ष व आपुलकीच्या मदतीची आवश्यकता असते व माझ्या अनेक मित्रांनीं व हितचिंतकांनीं मला मदत केली नसती तर हें पुस्तक प्रकाशांत येणें सहज शक्य झाले नसते. कोल्हापूर डेव्हलपमेंट खात्याचे सेक्रेटरी व माझे स्नेही श्री. जे. पी. नाअीक यांनीं हस्तलिखीत वाचून पाहून पुस्तक प्रकाशीत करण्यास मला प्रोत्साहन दिलें हें नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतो. तसेंच पुण्याचे माझे मेव्हणे डॉ. धारप व पटवर्धन व माझे स्नेही बापूसाहेब गुप्ते यांचेही मला सहाय्य झाले आहे हे नमूद करणें जरूर आहे. या सर्वांची मदत असूनही हल्लींच्या काळांतील कागदांची टंचाअी व प्रकाशनाबाबतच्या गुंतागुंतीच्या अडचणी व छापखान्यावर पडणारा कामाचा अमर्याद ताण या सर्वांमधून मार्ग काढून माझे परम स्नेही व सांगलीच्या प्रभा प्रेसचे मालक श्री. म. ल. महाबळ यांनीं मला मदतीचा हात देअून पुस्तक प्रकाशनाची जबाबदारी अंगावर घेतली नसती तर हें पुस्तक कित्येक दिवस प्रकाशांत येअू शकले नसते. या दृष्टीनें हें पुस्तक लोकांसमोर आणण्याचें श्रेय त्यांचेच आहे ही गोष्ट कृतज्ञतापूर्वक नमूद करणें हें मी माझें कर्तव्य समजतो. कागदांच्या टंचाअीमुळेंच पुस्तकांत मजकूर पुष्कळ असूनही तो दाटीवाटीनें जवळ जवळ बारीक टाअीपांत छापावा लागला व त्यामुळें सुबत्तेच्या काळांत जें पुस्तक दीडशेहे १५० पानें सहज भरलें असतें तें युद्धजन्य परिस्थितीमुळें ९०-९२ पृष्ठांत बसवावें लागले आहे. पण बाह्यांगावर नजर न देतां सूज्ञ वाचकांनी मजकुरावर

नजर देवून पुस्तकाचें परिशीलन करावें अशी विनंती आहे. या पुस्तकाच्या कव्हरवरील माझ्या कल्पना चित्रित करण्याचें कामी मला किर्लोस्करचे सह- संपादक व माझे मित्र श्री. ना. धों. ताम्हनकर यांचे साहाय्य झाले आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या पुस्तकाची हस्त- लिखितें लिहिण्याचें कामी पहिल्यापासून माझे सहकारी मित्र श्री गोपाळराव कुलकर्णी यांनीं मदत केली आहे. तसेंच मराठी शाळेंतील शिक्षक रा. देशपांडे व आपटे यांनींही हस्तलिखितें लिहिण्यास साहाय्य केलें आहे याबद्दल त्यांचे आभार मानावेंत तेवढें थोडेंच आहे.

अशा तऱ्हेनें सर्व लोकांच्या मदतीनें हें पुस्तक मी जनताजनार्दनासमोर ठेवीत आहे व त्यामुळें खेडेंगांवच्या सुधारणेच्या प्रश्नास थोडी जरी चालना मिळाली तरी मी स्वतःस धन्य समजेन.

आजरे.
१० सप्टेंबर १९४६
अनंत चतुर्दशी.

गं. ल. देवधर.

# पुरस्काराचे चार शब्द.

सर्व हिंदुस्थानांत सध्यां एक नव चैतन्याची लाट उसळलेली आहे व देशांतील सर्व जनतेस जुनी घडी बदलून नवीन युगास साजेशी नवी घडी घालून घेण्याची उत्सुकता लागली आहे. भोंवतालीं आढळून येणारी अस्वस्थता, असमाधान व सर्व जुन्या गोष्टीवरील तीव्र टीका हीं सर्व या उत्सुकतेनें धारण केलेलीं रूपें होत आणि याच दृष्टीनें आपण त्यांजकडे पाहिलें पाहिजे. 'गरजेच्या पोटीं शोध जन्माला येतात' या ह्मणी प्रमाणें समाजाच्या पुनर्घटने-संबंधीं आकांक्षांचें समाधान करण्यासाठीं नव्या नव्या योजना जन्माला येत आहेत हें योग्यच आहे. ह्या योजनांचा प्रत्येक सुशिक्षित माणसानें आस्थेनें व अभ्यासुवृत्तीनें नीट विचार केला पाहिजे. श्री. देवधर यांचे प्रस्तुत पुस्तक ह्मणजे असाच एक प्रयत्न आहे.

खेड्यांच्या पुनर्घटनेचा प्रश्न आपण समोर जो आदर्श ठेवूं त्याप्रमाणें निरनिराळ्यारीतीनें सोडवितां येईल. श्री. देवधर यांनीं स्वयंपूर्ण परंतु शहरांशीं सहकार्य करून उत्कर्ष करून घेणारें खेडें आदर्श धरलें आहे व त्या दृष्टीनें काय काय सुधारणा अवश्य आहेत याचा विचार केला आहे. अर्थात् कोणताही आदर्श सर्वमान्य होऊं शकत नाहीं या न्यायानें श्री. देवधरांच्या उद्यांच्या खेड्यांत राहण्यास पुष्कळ लोक [ विशेषतः अमेरिका, रशिया या सारखे भौतिक साधनांचा अमर्याद उपयोग करून क्रांती घडवून

आणणें हें ध्येय पुढें ठेवणारे लोक ] नाखूष असतील, परंतु या प्रश्नाचा विचार करतांना सुधारणेंचा खरा अर्थ काय याचा विचार करणें अवश्य आहे. त्या दृष्टीनें पाहतां मला वाटतें कीं, ज्या देशांतील लोक दीर्घायुषी, आरोग्यशाली आहेत, ज्या देशांत अत्यंत श्रीमंत व अत्यंत गरीब हे दोन्ही वर्ग नाहींत, ज्या देशाची इतर देशांशीं युद्धें होत नाहींत, ज्याला मोठा परराष्ट्रीय व्यापार नसला तरी स्वतःच्या बहुतेक गरजा देशांतच भागवितां येतात, ज्या देशांत लोक नीतीचीं बंधनें पाळून परस्पर प्रेमानें राहूं शकतात, ज्यांची वर्गयुद्धावरच भिस्त नाहीं, असा देश, भौतिक साधनानीं सुसंपन्न परंतु औद्यौगिक व राजकीय भूकंपानीं वारंवार व्याकूळ होणाऱ्या देशापेक्षां खात्रीनें अधिक सुखी असतो, अशाच तऱ्हेचे विचार यांत आहेत.

पुणें. <br>
ता. ३-९-१९४६

बा. गं. खेर.

नगर वाचनालय
ना.
नानाग.

# अर्पण -- पत्रिका.

माझ्या नोकरीच्या गेल्या चौदा वर्षांत ज्या गरीब शेतकऱ्यांच्या जीवनांतील हरघडी उत्पन्न होणाऱ्या विविध घडामोडींचा, त्यांच्या सुखदुःखांचा व अडीअडचणींचा अभ्यास करण्याची व ते अंशतः तरी निवारण करण्याचा प्रयत्न करण्याची मला संधि मिळाली व ज्यांच्या निकट परिचयामुळें व साहचर्यानें हें पुस्तक लिहिण्यास पुस्तकी ज्ञानापेक्षांही श्रेष्ठ अशा व्यवहारज्ञानाची जोड मला मिळाली त्या माझ्या निरागस मनोवृत्तीच्या असंख्य शेतकरी बांधवास :—

सप्रेम समर्पण.

गं. ल. देवधर.

*The world shall be full of knowledge of the Lord as the waters cover the Sea.*

*—Aldous Huxley—*

# प्रास्ताविक ....

एकीकडे "जाअू मी सिनेमांत" म्हणून नागरी जीवनांत हट्ट धरून बसणाऱ्या सुशिक्षित मुली तर दुसरीकडे "खेडें गांवांत चला; खेडें स्वयंपूर्ण करा;" अशा अर्थाचा मोठ्या विचारवंत कार्यकर्त्यांचा अुपदेश. या परस्पर विरोधी गोष्टी पाहिल्या म्हणजे सामान्य लोकांना कांहीं काल गोंधळांत पडल्यासारखें होत असल्यास आश्चर्य कसलें? परंतु थोडा विचार केला म्हणजे वरकरणी वाटणाऱ्या या विसंवादी-सुरांत राष्ट्रीय जीवनाच्या पूर्णतेची बीजेंच असल्याचें दिसून येतें. शहरें व खेडीं हीं अेकमेकांना मारक नसून पूरकच आहेत असें विचारांतीं दिसून येअील. ग्रामीण–जीवनाची पूर्णता किंवा सफलता म्हणजेच नागरी जीवनाची सुरवात व या अर्थानें पाहिलें म्हणजे खेडीं जितकी प्रगतीच्या मार्गावर जातील, जितकी ज्ञानसंपन्न होतील, त्यांचा विकास जितक्या जास्त प्रमाणांत होअील तितक्या जास्त प्रमाणांत राष्ट्रीय-जीवन अधिक सुखकर होअील. खेडीं व शहरें यांचीं कार्यक्षेत्रें जरी भिन्न असलीं तरी अेकाच्या अुत्कर्षावरच दुसऱ्याची भरभराट अवलंबून आहे. फार काय खेड्यांच्या सुधारणेंमध्येंच शहरांच्या अुत्कर्षाचीं बीजें सांठविलेली आहेत व या दृष्टीनें खेडीं व शहरें हीं समाजांतील न विभागता येणारी अशी दोन जुळीं भावंडे आहेत असेंच म्हणणें भाग आहे.

पुणें शहर हें प्रथम चार आळ्यांचें अेक लहान खेडें होतें. शंभर सव्वाशें वर्षांपूर्वी मुंबअी बेट हें अेक कोळ्यांचें बेट म्हणून अस्तित्वांत होतें. पण तींच खेडीं आज हिंदुस्थानांतील मोठीं सांस्कृतिक शहरें म्हणून प्रसिद्धीस आलीं आहेत. त्या खेड्यांचा राजकीय–परिस्थितीनें किंवा सामाजिक अुत्क्रांतीनें अथवा अितर कोणत्याही कारणानें विकास झाला असेल,

पण आज त्यास मिळत असलेलें वैभव हें पूर्वीच्या ग्रामीण जीवनाच्या पायावरच आधारलेलें आहे हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं.

खरी राष्ट्रीय-प्रगती हवी अशी जर कोणोची तळमळ असेल तर राष्ट्रीय जीवनांतील महत्वाचे स्थान पटकावणारी हीं खेडीं सुधारणें, त्यांना संपन्न करणें हा अेकमेव मार्ग आहे. तसें न होअील तर शरिरांतील अेक बाजू सुन्दर गुटगुटीत व दुसरी बाजू तितकीच रोडकी, फिकट व तेजोहीन अशा रोग्याप्रमाणें राष्ट्रीय—जीवनाची स्थिती होअील.

हिंदुस्तान हा कृषीप्रधान देश आहे. त्यांतील शेंकडा ७० लोक शेतीवर अुपजीविका करणारे आहेत व या दृष्टीनें जर हिंदुस्तानापुरतें बोलावयाचें झाल्यास या देशांतील खेडीं हीच देशाच्या अुत्कर्षाचा मध्य बिंदु आहेत. त्यांना बाजूस सारून देशास सामाजिक, राजकीय, धार्मिक यापैकीं कोणत्याही प्रकारची प्रगति करण्याची अिच्छा करणें हें हास्यास्पद ठरेल.

खेडेगांवांची अुन्नति करावयास पाहिजे असें अलिकडे प्रत्येकजण बोलतांना आपण अैकतो. पण अुन्नति करणेची म्हणजे काय करणेचे! याचा पुरा अर्थ किंवा जास्त स्पष्टीकरण कोणी करूं शकत नाहीं. कोणी म्हणतात शहरांतील लोकांनीं आतां खेड्यांत जावयास पाहिजे. कोणी म्हणतात खेड्यातील लोकांस शहरामध्यें आणून नागरी जीवनाशीं त्यांचा अधिक व निकटाचा परिचय करुन दिला पाहिजे पण असें म्हणणारे दोघेही चुकतात असें म्हणावेसें वाटतें. शहरांतील लोकांनीं खेड्यांत जाणेची जरुरी नाहीं किंवा खेड्यांतील लोकांनीं अेकदम शहरामध्यें आधीच वाढलेली दाटी पुन्हा जास्त वाढविणेची आवश्यकता नाहीं. कारण प्रत्येकाची कार्यक्षेत्रें भिन्न आहेत. जर खेडीं सुधारणेस मुख्य कोणत्या गोष्टीची आवश्यकता असेल तर तशी सुधारणा घडवून आणणेची तळमळ असणाऱ्या कांहीं थोड्याच पण जाणता व निरपेक्ष विद्वान कार्यकर्त्यांची जरुरी आहे.

खेडेगांव अेकदम स्वयंपूर्ण होणार नाहीं. अेकदम साक्षर होणार नाहीं किंवा अेका रात्रींत त्याचें सध्याचें भेसूर व अडाणी स्वरूप जाअुन राष्ट्रीय जीवनांतील अेकछोटें पण जाणतें स्वयंपूर्ण घटक होअूं शकणार नाहीं. तो अेक मोठा दीर्घ

कालीन चालणारा प्रयोग आहे. ग्रामोद्योग करणाऱ्याच्या मार्गांत तशाच अनंत अडचणी येथील खेड्तामध्यें वावरत असलेनें अडाणी पण त्यांचे दृष्टिनें प्रामाणिक विचार अेकदम सोडण्यास ते तयार होणार नाहींत, त्यांच्या हिताची गोष्ट ही त्यांना प्रथम पटणार नाहीं. गांवच्या अेकाद्या अिरसाल फसव्यावर ते जेवढा विश्वास ठेवण्यास तयार होतील त्याच्या शंभर हिश्यानेंही प्रथम प्रथम त्या प्रामाणिक व शुध्द हेतुच्या कार्यकर्त्यावर विश्वास ठेवण्यास तयार होणार नाहीत. बाह्य जगापासून पूर्ण अेकाअेकी जीवन कंठणारे तें खेड्त आपली गाऱ्हाणी सहजासहजी मोकळ्या अंतःकारणानें सांगणार नाहींत किंवा अनंत कालाच्या अनुभवानें दुःखास वाट देणारे विचारांचे दालनच बंद असल्यानें कोणत्याही अन्यची किंवा दुःखाची दिलखुलास भाषा बोलून दाखविणार नाहींत. "आपले नशिब" म्हणून ते कपाळास हात लावतील व अुत्साहाने गेलेल्या अशा कार्यकर्त्यास खेड्यांत चाललें आहे." ठीक आहे. आमचे पाटील, पंत आहेत. त्यांचा आम्हास असलेला आधार पुरा आहे." अशा तऱ्हेचे अुद्‌गार काढून ते निराशही करतील. केव्हां केव्हां अशा कार्यकर्त्याकडे संशयाच्या दृष्टीने ही पहातील व प्रसंगीं तो त्यांच्या टीकेच्या किंवा हेटाळणीचा विषयही होअील. त्यांनां बोलके करण्यास त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेणारा, प्रामाणिक हेतुचा व त्यांच्या अितका निरागस मनाचा अेकादा कार्यकर्ता प्रयत्न करील तर त्यास ही गोष्ट थोड्या श्रमानें साध्य होअील. मुख्य म्हणजे खेडुतांच्या जीवनवीणेशी आपल्या जीवनसंगीताचें सूर अेकरुप करणारा खऱ्या तळमळीचा असम, पाहिजे अितके असले म्हणजे त्यांच्या पुढें व्याख्यानें देण्याचें कारण नाहीं. कारण त्यांना ह्यांत कांहींच समजणार नाहीं. विध्दतेचें प्रदर्शन करण्याचें कारण नाहीं तर कांहीं काल चिकाटीनें काम केल्यास तो त्यांचीं मनें आकर्षण करुन घेअील.

अशा तऱ्हेचा कार्यकर्ता खेड्यांमधील लोकांच्या जीवनाशी समरस झाला म्हणजे बुजरेपणाने कांहीं न बोलणारी जनता आपली सुख दुःखें त्याच्याजवळ हळूहळू बोलूं लागेल. बुजून लांब पळणारे लोक त्याच्याकडे येतील व आपले विचार बेताबेतानें त्यास सांगतील. तो आपल्यातीलच अेक आहे. अशी त्याची खात्री

झाली म्हणजे त्यांच्या मनावरील दडपण आपोआपच बाजूस होईल व त्यांच्या हृदयांतील खरी भावना बोलकी होईल व त्यानंतर ग्रामीण जीवनाच्या सुधारणेस सुरवात झाली असें म्हणतां येईल.

अशा प्रकारें खेडेगांवाची सुधारणा करणे म्हणजे शहरांतील लोकांनीं खेड्यांत पळण्याची किंवा खेड्यांतील लोकानी शहरांत दाटी करण्याची जरुरी नाहीं तर या दोन्हीस सांधणाऱ्या कांहीं तेजस्वी दुव्यांची जरुरी आहे. त्यांना प्रगतीच्या मार्गांवर बोट धरून नेणारा अेकादा वाटाड्या पाहिजे आहे. आज खेड्यामध्यें व शहरामध्यें ज्ञानाच्या दृष्टीनें, विचाराच्या दृष्टीनें किंवा संस्कृतीच्या दृष्टीनें जें अंतर आहे तें जितक्या प्रमाणांत कमी होईल, तितक्या प्रमाणांत खेड्यांची सुधारणा झाली असें म्हणता येईल. जीवनांतील या दोन टोकांमधील असलेल्या अथांग अंतराची सांधजोड करणें म्हणजेच ग्रामीण सुधारणा असेंच नाहीं कां ?

*Self reverence, Self-Control, Self-Sacrifice. These three alone lead man to Soveriegn power.*

*— Tennyson —*

# समाजसेवक

२

**खेडेंगांवांमध्यें** कार्य करणेंकरितां निस्वार्थी व प्रामाणिक विचारांचे कार्यकर्ते पाहिजेत;असें म्हटलें कीं, "हं त्यांत काय आहे हो असे हवे तेवढे लोक मिळतील असें अुत्तर कोणीही देअील पण ही गोष्ट दिसते तितकी सोपी नाहीं असे विचारांती आढळून येअील.कोणतेंही खेडें घ्या त्या ठिकाणी अशा तऱ्हेचें काम करणारा अिसम मुळांत क्वचितच आढळून येअील. सर्व साधारण खेडेगांवची स्थिती पाहिली तर ती निराशाजनकच आहे.आपआपसांतील दुही, अडाणीपणा, कर्जबाजारीपणा व कांहीं स्वार्थी लोकांच्या विपरीत शिकवणीचा व खेडेंगांवच्या लोकांच्या भोळ्या समजुतीचा कांहीं आपमतलबी लोक घेत असलेला गैरफायदा, या सर्वांमुळें गांव गाडग्याचीं चाकें पूर्णपणें पोखरलेली सध्या तरी आढळून येतील. गांवांमध्यें अुत्पन्न होणाऱ्या दुहीमुळें शेतकऱ्यांची गरीब कुटुंबे धुळीस मिळाल्याची व त्यांच्या मुलांना अन्नाकरितां देशोधडीस जाण्याची वेळ आल्याची अुदाहरणें कांहीं कमी नाहींत. कर्जबाजारीपणा तर खेडेगांवच्या लोकांच्या पांचवीस पुजला आहे. कोकणांत " सदा पीक सदा भीक " अशी म्हणच प्रचारांत आली आहे. अज्ञानरूढी बद्दल अंधपणा अथवा अडाणी समजुती या व अशाच कारणानें या ग्राम पुरुषाची प्रकृति अेकाद्या रक्तक्षय झालेल्या रोग्या-प्रमाणें झालेली आढळून येअील. त्यास बळ देण्याचें त्याच्या शारिरिक व मानसिक विकासाचें अवघड काम अेखाद्या कुशल वैद्याप्रमाणें या कार्यकर्त्यांस करावयाचे आहे ग्राम सुधारणेचें कार्य हें अेक व्रत आहे व ते करणारे अिसम तसेच कळकळीचें पाहिजेत. सरकार खेडेगांवच्या अुन्नतीसाठीं हजारों रुपयांचा निधि खर्च करण्यास तयार होअील, पगारी प्रचारकही सरकार नेमील परंतु असें करण्यात सरकार आपल्या राज्यकारभारांतील कर्तव्यापैकी अेक कर्तव्य पार पाडतें असें फारतर म्हणतां येअील. परंतु फक्त फिरत्या पगारी

प्रचारकावर किंवा ग्रामीण कार्यकर्त्यावर जर लोक विसंबून राहातील तर त्यांच्या जीवनांत जागृतीच्या दृष्टिने फारशी प्रगति झालेली आढळून येणार नाहीं. लोक जागृती होणे किंवा जाणत्या लोकांकडून ती करविली जाणें हेंच आज फार अगत्याचें काम आहे. सरकाने आज कांहीं केले किंवा करीत असले, तरी तें खेडेंगांवच्या लोकांच्या हिताकरितां आहे येवढीही गोष्ट जाणण्याची सामान्य शेतकऱ्यांची बुध्दि नाहीं. सरकार जें करतें तें आपल्या बडेजावाकरितां, खेडें गांवच्या लोकांच्याकरितां कांहीं तरी करतो, या भावनेनें करतें, अशीच त्यांची सर्व साधारण समजूत असते. हेच त्यांचे अज्ञान दूर करण्याचें काम प्रथम खेडें गांवांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यास करावें लागेल. सरकार व अगदीं खालच्या दर्जाची अडाणी जनता यांच्या विचारामधील व समजुतीमधील अंतर जितक्या जास्त प्रमाणांत कमी होअील तितक्या जास्त प्रमाणांत खेडेगांवच्या सर्वांगीण सुधारणेचा बिकट प्रश्न सुटेल, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

मुलांना लहानपणी भरविलें तर तो अेक कौतुकाचा विषय होअील. पण जर तो क्रम पुढें तसाच चालू ठेविला तर भरविल्याशिवाय जेवणार नाहीं असा हट्टच धरून बसलेल्या मोठ्या मुलांस, आंतड्याच्या मायेनें भरविणाऱ्या आअीच्या वत्सलतेविषयीं कोणासही आदर वाटला, तरी अशा परावलंबी मुलाची कोणीही कींवच करील. तीच स्थिती सरकारनें देअू केलेल्या सुधारणा किंवा प्रगतीचा वाटा जर आम्ही पारखला नाहीं, किंवा त्यामध्यें आमचा हातभार आम्ही लावला नाहीं, तर त्या परावलंबी प्रौढ मुलांसारखी आमची कोणीही कींवच करील व या करतांच निस्वार्थी व कळकळीच्या कार्यकर्त्यांची जरुरी आहे. अशा काम करणाऱ्या लोकांच्या कायम स्वरुपाच्या संस्था स्थापन करणें अवश्य आहे.

अशा तऱ्हेच्या संस्था प्रत्येक खेडेंगांवांत व त्यावर नियंत्रण ठेवणारी मध्यवर्ती संस्था जिल्ह्याच्या ठिकाणीं निर्माण झाल्या पाहिजेत. ख्रिश्चन लोकांच्या मिशनच्या संस्था ज्या धर्तीवर काम करतात, तशाच तऱ्हेच्या या ग्रामसुधारणेच्या संस्था निर्माण होणें जरूर आहे. ख्रिश्चन मिशनरी संस्थांचे अुद्देश जरी वेगळे असले तरी त्यामध्यें काम करणारे लोक जसें

निस्वार्थी किंवा जन्मभर अेकाच कार्यास वाहून घेतलेले असतात तसल्या संस्था जर हिंदुस्थानांत निर्माण होतील तर खेडेगांवांतील शिक्षण, व्यापार, शेती, सार्वजनिक आरोग्य वगैरेच्या अुन्नतीच्या दृष्टीनें फार मदत होअील.

भारतसेवक समाजाची स्थापना या कल्पनेनेच नामदार गोखले यांनीं केली. कांहीं ठिकाणीं त्याच्या शाखाही अुघडल्या. नामदार गोखले किंवा नामदार श्रीनिवासशास्त्री यांच्या धुरीणत्वाखालीं या संस्थेनें फार भरीव कार्यही केलें. पण ती परंपरा टिकविणारे निस्वार्थी व कळकळीचे कार्यकर्ते जर पुढें आले नाहींत तर त्या संस्थेची परंपरा हळू हळू नाहींशीं होअील. अेकादे कार्य डोळ्यापुढें ठेअून त्या कार्यास आजन्म वाहून घेण्याची वृत्ती युरोपियन लोकांत जशी आढळून येते तशी वृत्ती आमचे लोकांत आढळून येत नाहीं असें खेदानें म्हणावें लागतें. मिरज येथें मिशनचा दवाखाना आहे. महारोगी लोकांचा दवाखानाही त्यांनीं काढला आहे. अलीकडे ५।७ वर्षांत क्षयरोग्याकरतां आरोग्य-भुवनही या संस्थेनें चालू केले आहे. या तिन्ही संस्था अुत्तम चालल्या आहेत. अुलटपक्षी आमच्या मध्येंहीं नामांकित डॉक्टर कांहीं कमी नाहींत, किंवा असे दवाखाने काढावयाचे म्हटल्यास पैसाही कांहीं कमी पडेल असें नाहीं पण ही गोष्ट होत नाहीं याचें कारण सार्वजनिक-हिताची बुद्धी आपल्यामध्यें जागृत झालेली नाहीं हेंच होय.

अशा संस्था न निघण्याचें दुसरें अेक कारण म्हणजे आज आपल्या-मधील प्रत्येक व्यक्तीचा राजकारण हाच केंद्र विषय होअून बसला आहे. कार्य करणेंचे म्हणजे अेकाद्या ठिकाणीं सत्याग्रह करून तुरुंगांत जावयाचें या पलीकडे समाज-सेवेचें कोणतें कार्य आहे याची भावना सामान्य लोकांना क्वचितच येते. राजकारणांत कोणी पडूं नये असा याचा अर्थ नाहीं. परंतु राष्ट्राच्या सुधारणेचा राजकारण हा अेकमेव मार्ग नाहीं. अेवढी गोष्ट डोळ्यापुढें ठेअून अेक राजकारणांतच अुडी घालण्यापेक्षां ज्याच्या त्याच्या बुध्दीप्रमाणें किंवा आवडीप्रमाणें समाज सेवेचे किंवा राष्ट्राच्या अुध्दाराचे निरनिराळे मार्ग प्रत्येकानें अंगिकारलें तर तेंही मोठें राष्ट्रकार्य होअील. कोणत्याही राजकीय फंडास लक्षावधी रुपये जमतात परंतु कन्यांचा आश्रम जेमतेम जीव धरून राहिला आहे

याला कारणही राष्ट्रोध्दाराची ही अेकांगी विचारसरणीच होय ! या दृष्टीने पाहतां खेडेगांवामध्यें दृढमूल झालेल्या सामाजिक व्याधींचें निर्मूलन करण्या-करतां समाजसेवकांचें जथे निर्माण होणें जरूर आहे. त्यांच्या संस्था पद्धतशीररितीनें स्थापन होअून त्याद्वारें हें ग्रामसुधारणेचें कार्य होणें अगत्याचें आहे.

समाज सेवकाच्या अंगीं खालील गुण विशेष असणें जरूर आहे.

### १ काम करण्याची आवड :–

अुद्योगधंदा कांहीं नाहीं म्हणून कांहींतरी काम करण्याचें अशी मनोवृत्ती कार्यकर्त्याच्या ठिकाणीं अुपयोगी नाहीं. प्रथमतः हें काम करणें अवघड जाअील. परंतु खेडेगांवांतील लोक कितीही अडाणी असले किंवा त्यांच्या समजुती कितीही खोट्या असल्या तरी आपणांस त्यांची सुधारणा करणेंची आहे अशी खरी तळमळ जर काम करणाऱ्यामध्यें अुत्पन्न झाली, तर प्रथम अवघड व निरस वाटणाऱ्या कामांत त्याचें मन सहज रमेल. आज पुण्यांत दिसणाऱ्या मोठमोठ्या शिक्षण-संस्था या अशाच तळमळीच्या कार्य-कर्त्यांच्या श्रमांची चालती बोलती स्मारकेंच झालीं नाहींत कां ?

### २ साधी राहाणी :–

खेडेगांवांत काम करणाऱ्याची राहणी साधी असली पाहिजे. खेडें-गांवांतील लोकांमध्यें सहज मिसळूं शकतील व त्यांच्यामध्यें ते समरस होअूं शकतील अशी राहणी या माणसानें ठेवली पाहिजे. तसेंच शेतकऱ्यासमोर जें काम करण्याचें किंवा त्यांना सुधारणेच्या दृष्टीनें जे प्रयत्न करावयाचे तेंही साध्या व सोप्या भाषेंत त्यांना समजेल अशा रितीनें त्यांना समजून देण्याचा प्रयत्न अशा कार्यकर्त्यांनीं करणें जरूर आहे. नाहींपेक्षां मोठमोठ्या राजकीय तत्वांची अशा भोळसट लोकांपुढें पोपटपंची केल्यास त्यांच्या मनांत कार्य-कर्त्याविषयीं आदर राहण्याचें बाजूसच राहील, तर अुलट हाही अेक शहरी वाढलेला सुधारक आहे अशा दृष्टीनें शेतकरी वर्ग त्याच्याकडे पाहील.

## ३ शील :—

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अशा कार्यकर्त्याचें वर्तन शीलाचें व व नेकीचे पाहिजे कोणत्याही सार्वजनिक कामांत विचारांचा प्रामाणिकपणा हा त्या कार्याचा पाया आहे. कारण मनुष्य सर्व जगाशीं अेकवेळ अप्रामाणिक होअूं शकेल; पण तो आपल्या मनाशी अप्रामाणिक होअूं शकणार नाहीं. या दृष्टीनें जितक्या जास्त प्रामाणिक विचारांचा कार्यकर्ता तितका तो जास्त लवकर लोकांच्या विश्वासास पात्र होईल. शील याचा साधारण सुबोध अर्थ करावयाचा म्हटलें तर विचारांचा प्रामाणिकपणा असाच थोडक्यांत त्याचा अर्थ होअूं शकेल.

सर्वसाधारपणें प्रत्येक खेड्यांत अशी अेकादी तरी व्यक्ति असते कीं ज्याच्या वर्तनानें किंवा चांगुलपणानें ती लोकांच्या आदरास पात्र होते. गांवांतील कांहींही भांडणें असोत किंवा कोणतीही न्यायपंचायत असो. भांडणारे दोन्ही पक्ष अशा अिसमाकडे न्यायाकरतां जातांना दिसतात. व तो जे सांगेल तें सर्व निमुटपणें अेकतात.

## ४ सतत अुद्योग :—

खेडेंगांवचें लोक अितर रितीनें कितीही अडाणी असोत त्यांच्यामध्यें सूक्ष्म निरिक्षण शक्ति मात्र असतें हें खास. कोणचा मनुष्य कसा आहे याची पारख ते तात्काल करतात. या दृष्टीनें पाहिलें तर खेडेंगांवांत ज्याला काम करावयाचें आहे त्यास सतत राबणाऱ्या शेतकऱ्यापेक्षांही जास्त अुत्साहानें राबलें पाहिजे. ग्रामोद्धाराबद्दल जर खेडेंगांवच्या लोकांना नुस्तें शाब्दिक ज्ञान कोणी देअूं लागला तर तें त्यास चटकन विचारतील, "साहेब आपण म्हणतां तें सर्व खरें. पण आमचें दुःख काय आहे त्याची कल्पना आपल्यास तास दोन तासाच्या अनुभवाने कशी येअील?" खरोखर हें अुत्तर तास दोन तास दिलेल्या व्याख्यानापेक्षां जास्त व्यावहारिक आणि जास्त समर्पक असें

आहे. म्हणून शाळेची अुपयुक्तता पटवीत बसण्यापेक्षां जर असा कार्यकर्ता प्रथम दोन तीन मुलें घेअून शाळा सुरूं करील तरी त्यामुळें लोकांच्या मनावर अधिक परिणाम होअील. खेडेंगांवच्या लोकांना निव्वळ पोशाखी व दिखाअू समाज-सुधारकापेक्षां त्यांच्या बरोबरीनें कष्ट करणारा कार्यकर्ता पाहिजे असतो. नागरी—समाज व्यवस्थेची, आचारविचारांचीं व राजकीय अिच्छा आकांक्षांचीं हुबेहुब नक्कल खेड्यांमध्यें करण्याचा प्रयत्न सर्वसाधारण ग्राम-सुधारक करतांना आढळून येतात व यामुळेंच खेडेंगांवच्या लोकांमधील व अशा कार्य-कर्त्यांमधील वैचारिक अंतर कमी न झाल्यानें ग्रामसुधारणेच्या कार्यामध्यें अेक प्रकारची कृत्रिमता आढळून येते.

## ५ कार्यासंबंधीं निष्टा :—

खेडेंगांवामध्यें कार्य-करणाऱ्यामध्यें तो करीत असलेल्या कार्याबद्दल अेकमेव निष्ठेची भावना मुख्यतः जागृत असली पाहिजे. खेडें-गांवच्या सुधारणेंचें कार्य हें अेक व्रत आहे. या भावनेनें कोणतीहीं संकटें कितीही हाल अपेष्टा, किंवा अवहेलना सोसण्यास त्यानें सिद्ध असलें पाहिजे. अशा कार्यकर्त्यांमध्यें प्रथम प्रथम कार्याबद्दल अुत्साह अुत्पन्न झाल्यासारखें वाटेल. परंतु सुरवातीस सोपें पण पुढें आचरणास अवघड अशा अेकाद्या कडक व्रताप्रमाणें पुढें पुढें त्यांच्या अुत्साहास ओहोटी लागण्याची वेळ येअील किंवा लोकांच्या अज्ञानाचा अयोग्य गैरफायदा घेण्याचा मोह त्याग होअून गांव-सुधारण्यास गेला पण गांवचा काळ बनला अशी त्यांची स्थिति होअील. त्यांच्या नैष्ठिक श्रद्धेच्या कसोटीची हीच वेळ आहे. या वेळींच अशा कार्यकर्त्यांच्या नैतिक आचारविचारांचा व निराशा किंवा मोह यांचा झगडा सुरूं होतो. त्यांत कोणतें विकार विजयी होतील यावरच त्या कार्यकर्त्यांची खरी किंमत व अुपयुक्तता सिद्ध होते. कार्यासंबंधीं निष्टा ठेवणें म्हणजे अशा कार्यकर्त्यानें आपलें संसार सोडून फटिंग बनणें, असा कोणी अर्थ करील तर तो चुकीचा ठरेल. कार्याची निष्टा याचा अर्थ विचारांचा प्रामाणिकपणा होय. अशा प्रामाणिक विचारानें राहणाऱ्या कार्यकर्त्यांचा खेडेंगांवांतील संसार केव्हांही सुखाचाच होअील. आपल्या

फायद्याकरतां खेडेंगांवच्या लोकांचा अुपयोग करून घेअून त्यांच्याकरतां आपण केवढा स्वार्थत्याग करतो असा देखावा करणाऱ्या पुढाऱ्यांचें कांहीं दिवस भरभराटीचें गेलें तरी त्यांच्या या दांभिकपणाचा स्फोट लवकरच होतो. तो लोकांच्या अनादरास पात्र होतो. लोकांना सरकारांतून जमिनी मिळवून देतो, तुमच्या गांवांत शाळा अुघडवितो किंवा तेथें रस्ता करतो, अशा भुलथापा मारून आपला स्वार्थ साधणारे व तात्कालिक पुढारीपणाचा मक्ता घेणारे कांहीं अप्पलपोटे ठेकेदार प्रत्येक खेडेंगांवांत असतात. परंतु अशा स्वार्थी लोकांपासून खेडेंगांवच्या अज्ञ जनतेनें सावधपणानें वागलें पाहिजे. व तसा सावधगिरीचा अिषारा खऱ्या कळकळीच्या कार्यकर्त्यांनीं लोकांना वेळींच द्यावा. अलीकडे खेडेंगांवच्या लोकांच्या अुद्धाराचा मक्ता कोणीही अुडाण-टप्पू व चारित्र्यहीन अिसम आपल्याकडे घेतांना आढळून येतो. व अशा लोकांपासून शेतकऱ्यांना वाचविणें हेंच मुख्य काम अशा कार्यकर्त्यांनें हातीं घेणें जरूर आहे.

६ त्याग :—

कोणतेंही कार्य करावयाचें झालें म्हणजे मग तें सामाजिक असो वा राजकीय असो तें करीत असतां कार्य करणाऱ्या व्यक्तीची कोणत्याही प्रकारचा त्याग करण्याची तयारी पाहिजे. खेडेंगांवांत अशा तऱ्हेचें त्यागी कार्यकर्ते जरी हातांच्या बोटावर मोजण्याअितकें मिळाले तरीही फार मोठें कार्य होअील हिंदुस्थानाकरतां स्वातंत्र्याच्या झगड्यांत अुडीं घालणारे मोजकेंच पुढारी केवढे कार्य करूं शकतात याची प्रचीती आज कॉंग्रेसनें मिळविलेल्या नैतिक विजयानें सर्व जगाच्या निदर्शनास आणून दिली आहे. खेडेंगांवची सुधारणा करण्याकरितांही असा निस्वार्थी व त्यागीं कार्यकर्ता प्रत्येक खेड्यांत अेक जरी निघाला तरी पुरें आहे. कोणतेंही सार्वजनिक काम करतांना कार्य करणाऱ्या व्यक्तीनें स्वार्थ निरपेक्ष व त्यागी वृत्ति दाखविल्यास त्याच्या कार्याचें तेज वाढेल. व तो लोकादरास पात्र होअील. त्याग करणें असें वावदूकपणानें म्हणणें ही गोष्ट फार सोपी आहे; परंतु प्रत्यक्ष त्याग करण्याची वेळ आली

म्हणजे मात्र माणसाची स्वार्थीवृत्ती जागृत होते व त्यास हातीं धरलेल्या त्या कार्यापासून परावृत्त करतें. त्याग याचा अर्थ तरी कोणत्याही सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक कार्यांत स्वतःस झीज सोसण्यास व आपल्या नैतिक बलाच्या योगानें आत्यंतिक हालअपेष्टा सोसण्यास तयार राहणें या वृत्तिसच त्याग म्हणतात.

त्यागाचें महत्व पुराणांत व ऐतिहासिक कालांतही वर्णिलें आहे. या गुणांचा विकास खेडेंगांवच्या लोकांमध्यें व्हावा अशी खटपट करणाऱ्या कार्य-कर्त्यांमध्यें त्याग हा गुण प्रामुख्यानें झळकणें अवश्यक आहे. लोकमान्य टिळकांनीं खडतर त्याग करून " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच " या बिरुदावलीचा जयजयकार हिंदुस्थानच्या सर्व कानाकोपऱ्यांतूनच केला. महात्मा गांधीनीं आपल्या नैतिक आचरणानें व आत्यंतिक त्यागी-मनोवृत्तीनें सर्व हिंदुस्थानांतील कानाकोपऱ्यांतील लोकांचीं मनें जागृत करून तुरुंगाचें दार हें स्वराज्याचें सदन अशी स्थिती करून सोडली. व अखेर ' चलेजाव ' ची घोषणा करून राज्यकर्त्यांना नमविलें. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं सन १९०८ सालीं हिंदुस्थानच्या राजकीय क्रांतीची घोषणा करून सर्व युरोपखंडास जागें केलें. पुढें अंदमानचा खडतर कारावास दीड तपाच्यावर सोसला व हिंदुस्थानच्या अितिहासांत आपलें नांव अजरामर केलें. बाबू सुभाषचंद्र बोस सारख्या तेजस्वी हिऱ्यानें आपल्या सर्वस्वावर पाणी सोडून हिंदवी स्वातंत्र्याकरितां अज्ञातवास पत्करला. अझाद हिंद-सेना अुभारून हिंदुस्थानच्या राजकारणाच्या अितिहासांत त्यागाचें अलौकिक व चिरस्मरणीय पान लिहिलें. पंडित जवाहरलाल नेहरूसारख्या गर्भश्रीमंत लक्ष्मीपुत्रानें ऐहिक वैभव झिडकारून देशसेवेचें कंकण हातात बांधून फकिरी-वृत्ति स्वीकारली. बाळासाहेब खेर यांच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनें तुरुंगासारखा खडतर बनवास भोगला; व त्याचेंच फळ म्हणजे आज त्यांच्याकडे चालून आलेलें अिलाख्याचें प्रधानपद होय. आत्यंतिक त्यागाची ही मूर्तिमंत प्रतीकें आहेत. हिंदुस्थानांतील नव तरुण हें वैचारिक क्रांतीच्या मार्गावरून आतां क्रीयेच्या परिसरांत शिरले आहेत या दृष्टीनें राजकीय

कार्य करण्यास त्यागी मनोवृत्तीची जरुरी आहे, याची जाणीव त्यांना होअूं लागली आहे. राजकीय कार्याप्रमाणेंच खेडेंगांवच्या अुन्नतीच्या कार्यासही निष्ठावंत व त्यागी तरुणांची जरुरी आहे. या दृष्टीनें रत्नागिरीचे श्री. आप्पासाहेब पटवर्धन यांचें कार्य मौलिक आहे.

## ७ सत्य :—

सर्व धर्माचा पाया सत्य आहे. या दृष्टीनें समाजपुरुषाची सेवा करण्याचें व्रत ज्यांनीं अंगीकारिलें आहे तें सत्याचें मजबूत पायावरच आधारलेलें असलें पाहिजे. सत्य हा त्यागाचा आत्मा आहे. खेडेंगांवांतील कार्यकर्ता जर त्यागी असावयास पाहिजे असेल तर सत्यव्रतपणा त्याचें अंगीं संपूर्णपणें बाणणें जरूर आहे. सत्य अेका बाजूस व असत्य अेका बाजूस अशा झगड्यांतच त्यागी—वृत्तीची कसोटी लागते व अखेर सत्याचा जय होतो. त्याग व सत्य हें कार्यकर्त्यांच्या जीवनांत न निखळता येणारे दुवें आहेत. कोणतीही चळवळ किंवा सामाजिक कार्य हें सत्याचें आधारावर रचलं असेल तर तें टिकाव धरूं शकतें. या दृष्टीनें गांधी युगांतील खरा सत्याग्रही मोठ्या पाशवी शक्तीसही भारी ठरतो.

## ८ अहिंसा :—

खेडेंगांवांत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांमध्यें त्यागीवृत्ति किंवा सत्य-व्रतानुपालन हें गुण असणें जसें जरूर आहे त्याचप्रमाणें असा कार्यकर्ता पूर्णपणें अहिंसा वृत्तीचा असणें जरुर आहे. त्याग, सत्य व अहिंसा ही अशा कार्य-कर्त्यांची अेकापेक्षां अेकेक तेजस्वी अस्त्रे आहेत. या तिन्ही गुणांचा संगम ज्याच्या ठिकाणीं असेल त्यास जगांत कोणाचीही भिती नाहीं. महात्मा गांधीनी स्वतःच्या अनुभवावरून अहिंसेची थोरवी वारंवार प्रतिपादन केली आहे, व त्याचा विचार माझ्यासारख्यानें करण्याचा प्रयत्न करणें हें मोठे धाष्टर्य ठरेल. परंतु खेडेंगांवांतील कार्यकर्त्यांमध्यें वर लिहिलेल्या गुणापैकीं फारच थोडें गुण असतात व म्हणूनच ग्राम सुधारणेंचा प्रयोग अयशस्वी ठरतो.

त्यागाची सुरवात सत्यापासून होअून त्याची पूर्णता अहिंसेत होतें, कारण कोणताही त्याग करणेचा झाल्यास ज्या तत्वाकरितां त्याग करणेंचा तें तत्त्व पूर्ण शंभर नंबरीं सत्यावर आधारलेलें असणें जरुर आहे व या प्रमाणें सत्यव्रताच्या बैठकीवर आधारलेल्या कोणत्याही ध्येयाकरितां करावा लागणारा त्याग यास अहिंसाव्रताची जरुरी आहे. त्याग हा अहिंसेमुळें पूर्णत्वास पोहोचतो. अंगावर बंदुकीच्या गोळ्या पडत असतांही अेक तसुभरही पाय मागें न घेणाऱ्या सत्याग्रही-वीराचा त्याग अहिंसेवरील अढळ श्रद्धेनेंच पूर्णत्वास जातो. अहिंसा हें अेक प्रभावी शस्त्र आहे व त्याचा महात्मा गांधीनी पुरेपुर अुपयोग करून घेत आहे. हें त्यांनीं वेळोवेळीं केलेल्या अनत्याचारी सत्याग्रहावरून जगाच्या निदर्शनास आलें आहे.

त्याग, सत्य व अहिंसा हीं तत्त्वें प्रत्यक्ष आचरणांत आणणें ही गोष्ट सोपी नाहीं हें खरेंच. परंतु खेडेंगांवांत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यानें आपणांवर मोठीं जबाबदारी आहे याची जाणीव ठेवून वागण्याच्या दृष्टीनें त्यास कोणत्या गोष्टींचा अभ्यास करणें किंवा कोणतें गुण अंगीं आणण्याचे प्रयत्न करणें जरुर आहे याचेंच विवेचन थोडक्यांत वर केलें आहे. खेडें-गांवांतील लोकांमध्यें वावरतांना कार्यकर्त्यानें वरील गुणापैकीं बरेच किंवा सर्व गुण अंगीं आणणेचा प्रयत्न केला तर ग्राम सुधारणेचें कार्य फार जलद पुरें होअील.

# खेडेंगांवांची रचना

नगर वाचनालय
ता.
ना. ना. ग.

३

आज कोणतेही खेडें पाहिलें तरी तेथें आपणांस सर्वसाधारणपणें विस्कळीतपणा दिसून येते. घाण पाणी किंवा हवा यांची नैसर्गिक मदत असूनही आपल्या ओंगळ राहणीनें आजचें खेडें हें सर्व घाणींचें अेक आगर अशी कल्पना होत असल्यास ती चुकीची आहे असें म्हणतां येणार नाहीं. साधारपणें खेडेंगांवांत घरें ज्या तऱ्हेनें बांधलीं जातात ती पद्धतच मुळांत सदोष व आरोग्यास विघातक असते. शेतकरी घर बांधावयास तयार झाला तर तो अेक सोपा, मधघर व मागला सोपा असें तीन जाप्तें असलेलें घर बांधेल व त्यामध्येंच अेखादा मोठा पाटीऊ असेल तर अशा घरापुढें तो फक्त मोठा थोरला चिरेबंदी दरवाजा दोन चार हजार रुपये खर्चून बांधेल पण सोय किंवा व्यवस्थितपणा या दृष्टीनें दोहोंची किंमत सारखीच. गुरें ही शेतकऱ्यांची जीव कीं प्राण असतात हें खरें व तीच त्यांच्या सर्व कष्टांची व मिळकतीची अेकमेव साधन संपत्ति असल्यानें गुरांबद्दल त्यांना प्रेम वाटणे सहाजीकच आहे. व याच भावनेनें शेतकरी घरांतील मुख्य सोप्यावरच आपलीं गुरें बांधतो. परंतु ही गोष्ट त्याच्या कुटुंबांतील मंडळींच्या आरोग्यास अपायकारक ठरते, याची त्यास कल्पना नसते. व सदरची गोष्ट त्यांस समजून सांगण्याचा प्रयत्न केला तर प्रथम त्यास ती पटणारही नाहीं. सर्वसाधारणपणें अुत्तम जनावरें घेण्यांत, किंवा अेकादे घर बांधण्यांत, किंवा लग्नकार्य करण्यांत शेतकऱ्याचा हात सर्वसाधारपणणें सढळच असतो, तो अितका कीं यापैकीं कोणतीही अेक गोष्ट किंवा तिन्हीही त्याचे डोक्यावर कर्जाचा डोअीजड भार अुत्पन्न करण्यास कारणीभूत होतात. पण घर सोअीचे व कमी खर्चांत कसें बांधावें याची कल्पनाच त्यांना नसल्यानें आरोग्यास अपायकारक अशी घरें बांधण्यांत शेतकरी आपला पैसा खर्च करितो. जी गोष्ट जनावरें बांधण्याची तीच गोष्ट हवा किंवा अुजेड यांची. शेतकऱ्यांच्या घरांत सहसा भरपूर अुजेड असलेली व मोकळी हवा खेळणारी अशी जागा सहसा आढळून येत नाहीं. अेकापुढें अेक सोपे व त्यास दरवाजे व चारी

बाजूस भिंती असेंच सर्वसाधारण स्वरूप प्रत्येक शेतकऱ्याच्या घरांचें आढळून येअील. या दृष्टीनें शेतकऱ्यांना अुपयुक्त अशा तऱ्हेच्या घरांचे नकाशे तयार करून जर त्यांची माहिती शेतकऱ्यांना दिली तर त्याचा अुपयोग चांगला होअील. घरांचे नकाशे सर्वसाधारणपणें ५०० तें २००० रु. पर्यंतचें केलें तर सामान्य शेतकऱ्यापासून बऱ्यापैकीं शेतकऱ्यास अेक हुमदार घर होअूं शकेल. बाहेर अेक सोपा त्याच्या आंत मधघर, त्यांत भरपूर अुजेड व मागील बाजूस अेक सोपा त्यामधेच स्वयंपाकाची जागा, न्हाणीं असा घराचा आराखडा धरला तरी पुरें होअील. जनावराकरतां गोठा व सर्पणाकरतां जागा या घराजवळच अेका बाजूस १०।१५ फुटावर धरली तर जनावरांवर देखरेख होअून त्यामुळें घरांत जनावरें बांधण्यानें जे अपायकारक परिणाम होतात तेही टळतील.

नवें घर बांधणाऱ्या शेतकऱ्यास असें प्लॅन ( नकाशे ) समजावून सांगावे किंवा त्याची अुपयुक्तता पटवून द्यावी. ज्या शेतकऱ्यांची जुनीं घरें आहेत त्यांनाही जर गोठा घरालगतच बांधणेंबद्दल समजावून सांगितलें तरीही ते या गोष्टीस राजी होतील. साधारणपणें प्रत्येक शेतकऱ्याच्या घरामागें खताकरितां अेक खड्डा असतोच. तो व्यवस्थित मोठा काढून सर्व शेण, मूत, चघाळा, किंवा अितर घाण त्यांत टाकली तर खत सहज तयार होअील. सध्याही प्रत्येक शेतकऱ्याच्या घराच्या मागे असा खड्डा असतोच. परंतु तो खड्डा कित्येक वेळां घराच्या अितका जवळ असतो कीं पुढील बाजूस गुरें व मागील बाजूस खताचा खड्डा; या रोगांच्या दोन माहेर घरांच्या कात्रीत त्याच्या सर्व कुटुंबियांची जीवन यात्रा चालू असते. खेडेंगांवच्या घरांच्या वर वर्णन केलेल्या आराखड्यांत खताच्या खड्ड्याची जागाही नमूद करावी. अुद्देश अितकाच कीं, अशा तऱ्हेचा खड्डा हा खताच्या दृष्टीनें अुपयोगी असला तरी तो जर घराच्या जवळ असेल तर त्यामुळें आरोग्यास तो अपायकारक होतो ह्या गोष्टीची जाणीव त्यास होअील. ग्रामीण कार्याकरतां जे प्रचारक नेमले जातील त्यांनीं किंवा गांवांतील कार्यकर्त्यांनीं प्रथम खेडेगांवच्या घरांची सदोष रचना शक्य तो सुधारण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. कारण खेडेंगांवच्या सामुदाअीक आरोग्याचा तो पाया आहे. खेडेंगांवांत अेकादी सांथ

अुत्पन्न झाल्यावर त्याचा प्रतिबंध करणें अगत्याचे आहे. परंतु खेड्यांतील घरांच्या दोषपूर्ण मांडणीमुळें सांथीचें निर्मूलन होअूं शकत नाहीं. व यामुळेंच प्रत्येक वर्षीं प्लेगाची सांथ अुत्पन्न होणारी कित्येक खेडी आपण पहातो. शहरामध्यें दाट वस्तीमुळें मोकळी हवा किंवा अुजेड मिळण्यास कष्ट पडतात. परंतु खेड्यांत मात्र यांची विपुलता असतें. फक्त त्याची शेतकऱ्यांच्या अडाणीपणामुळें किंवा कांहीं समजुतीमुळें त्यांना या निसर्गदत्त देणगीचा फायदा घेतां येत नाहीं, या दृष्टीनें पाहिलें तर वर लिहिल्याप्रमाणें अेक आदर्श घर प्रत्येय खेड्यांत सरकारनें बांधावे. घराचे बांधकाम अगदीं साधे मातीचे किंवा दगडाचें असावें. साधेपणा व सोय हेंच प्रमुख गुण त्यामध्यें असावे. खेडेंगांवच्या सुधारणेच्या दृष्टीनें जे गट आज निवडलें आहेत त्यांतील प्रत्येक खेड्यांत जर सरकारी जमिनींत अशा तऱ्हेचे अेक आदर्श घर बांधलें तर मला वाटतें शेतकऱ्यांच्या समोर तो अेक प्रात्यक्षिक नमुना कायमचा राहील.

घरा अितकाच महत्वाचा प्रश्न खेडेंगांवांतील जलाशयाचा आहे. खेडेंगांवांना जें पाणी असतें, त्याचा अुपयोग पिण्याकडे करण्याचा असतो. ही भावना खेडेंगांवच्या लोकांना क्वचितच असते. हा त्यांचा दोष नाहीं. कारण पाण्यांतून कांहीं अपायकारक जंतु शरिरांत जाअुं शकतात याचीही कल्पना बिचाऱ्यांना नसते. या दृष्टीनें खेडेंगांवांत जें सार्वजनिक जलाशय असतील त्याचा अुपयोग पिण्याच्या पाण्याचें जलाशय स्वतंत्र व धुणीं धुणें किंवा जनावरांना पाणी देण्याचें जलाशय वेगळें अशी विभागणी शक्य तो असावी. कित्येक खेडेंगांवांत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न फारच बिकट झालेला आहे; पण सरकार त्याबाबत आतां तत्परतेने विचार करण्यांस तयार झाले आहे. परंतु सरकारनें विहिरी बांधून दिल्या किंवा तलाव खोदून दिले, तरी त्यांची स्वच्छता राखण्याचें काम लोकांचे आहे. ह्या गोष्टींचें ज्ञान अज्ञ शेतकऱ्यांस होणें जरूर आहे. शहरी लोकांनीं हेवा करावा असें हवापाणी आपल्या वाट्यास आले आहे व कोणत्याही संपत्तीपेक्षां ही संपत्ती मोठी आहे, याची जाणीव त्यांच्यामध्यें अुत्पन्न झाली तर मात्र तेंच

शेतकरी गोटा घराबाहेर काढण्यास किंवा पाण्याच्या विहिरीची स्वच्छता राखण्यास अेकदम तयार होतील. गांवांत रोगांची सांथ असो वा नसो अशा तऱ्हेचें जलाशय स्वच्छ ठेवण्याची खबरदारी शेतकऱ्यांनीं ठेवल्यास त्यांच्यामधील मृत्युचें प्रमाण कितीतरी कमी होअील. ही गोष्ट त्यांचे मनांवर पटविण्याचें कार्य सार्वजनिक कार्यकर्त्यांचें आहे. प्रथम प्रथम ही गोष्ट त्यांना पटणार नाहीं. "काय राव सांगता याच तलावांतील पाणी आमचे वाडवडील प्यालें. आम्हीही पितों. आणि आतां तुम्ही म्हणतां कीं, यांत म्हशी बसवूं नका" असें तो म्हणेल, परंतु जाणत्या लोकांच्या सतत प्रचारानें त्याचें मन पालटेल व तो तुमचे अैकूं लागेल.

पिण्याच्या पाण्याअितका महत्वाचा नाहीं, तरी खेड्याच्या दृष्टीनें खेड्यांतील रस्त्याचा प्रश्नही महत्वाचा आहे. खेडेंगांव सर्वसाधारपणें मुख्य रहदारीच्या व पक्या रस्त्यापासून आंत असते. मुख्य रस्त्यापासून खेडेंगांवांना जोडणारे रस्ते किंवा गांवांतील रस्ते हे ग्रामपंचायती किंवा सरकार करेलच. परंतु निव्वळ ग्रामपंचायती करते म्हणून शेतकऱ्यांनीं स्वस्त बसतां कामा नये. कारण सरकारला सर्व रस्ते अेकदम करणें शक्य नाहीं. किंवा ग्रामपंचायतीसही रस्त्याचे अेकच काम नसतें. या दृष्टीनें खेडेंगांव आपले आहे, त्यांत आपण राहतो व तें अुत्तम राखिलें पाहिजे. या जाणिवेनें शेतकऱ्यांनीं ही गोष्ट मनावर घेतली पाहिजे. शेतकऱ्यामधें दर आठवड्यांतून अेक दिवस पाळक म्हणून पाळण्याची वहिवाट आहे. अशा पाळका दिवशीं देवळांत अुगाच चकाट्या पिटत न बसतां गांवची साफ सफाअी करण्यांचे किंवा अेकादा रस्ता गांव मदतीनें करण्याचे गांवकऱ्यांनी ठरविलें तर ते सहज शक्य आहे. आमच्या जहागिरीतील मनेराजुरी, आरग वगैरे गांवीं अशा तऱ्हेचे पक्के रस्ते गांवकऱ्यांनीं गांव मदतीनें केले आहेत. अशा तऱ्हेचे रस्ते तयार केले तर सरकारला किंवा ग्रामपंचायतीला ते दुरुस्त राखणें भाग पडेल. शेतकऱ्यांना ज्या गांवांत ते राहतात तें गांव त्यांचे आहे, रस्ते त्यांचे आहेत, जमिनी त्यांच्या आहेत व त्या सर्वांची सुधारणा आपण केली पाहिजे. या भावनेचा अुदय त्यांच्यामधें झाला तर गांवमदतीने कितीतरी गोष्टी सहज होअूं शकतील.

पण शेतकऱ्यांचीं मनें अशा विचाराकडे वळविण्याचें कार्य फार अवघड आहे.

अुलटपक्षी खेडेंगांवचे रस्ते काय किंवा जलाशय काय ह्या बाबी सरकारनें सुधारल्या पाहिजेत अशा तऱ्हेची कल्पना कांहीं स्वार्थी पुढारी या अज्ञ लोकांची करून देतात. त्यामुळें आपल्या गांवचे रस्ते गांव मदतीनें दुरुस्त करणें म्हणजे सरकारची वेठ करणें अशी विकृत भावना त्या अज्ञ लोकांची होते. पण जर त्या लोकांना सरकार आपले काम करीत आहेच. पण ज्या खेडेंगांवांत आपण राहतो तें आपलें आहे अशी जाणीव त्यांना करून दिली तर तेच लोक आपल्या अडाणी समजुतीस चिकटून न बसतां आपल्या सहकार्याचा हात पुढें करतील. शेतकऱ्यांचें मन हें अेखाद्या स्वच्छ आरशासारखे असतें. त्यामध्यें ज्या तऱ्हेनें पाहणारा मनुष्य असेल, तसें प्रतिबिंब त्यांत पडेल. या दृष्टीनें घराच्या रचनेंत किंवा सार्वजनिक आरोग्याचें कामीं त्यांचा भाग काय आहे याची खरी कल्पना करुन दिली, तर तें केव्हांही आनंदानें नवीन योजना स्वीकारतील यांत संशय नाहीं.

# अन्न व आरोग्य ४

हिंदुस्थान देशाचा अेके काळीं सुवर्णभूमि म्हणून लौकिक होता. या देशास आज जी अवनति अथवा अुतरती कळा प्राप्त झाली आहे त्यास अितर कोणतीही कारणें असलीं तरी त्या सर्वांमध्यें अत्यंत महत्वाचें कारण देशांतील सर्वसाधारण आरोग्याचा झालेला ऱ्हास हें आहे, हें कोणासही नाकबूल करतां यावयाचे नाहीं. प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याची अुभारणी ही तो खात असलेल्या अन्नावरच अवलंबून असल्यानें आपण सध्यां जें अन्न खातो तें पुरेसें आहे काय? ते कितपत सकस आहे? याचा थोडक्यांत विचार करणें अप्रस्तुत होणार नाहीं. खेड्यांतील काय किंवा शहरांतील काय आमच्या लोकांपैकीं बहुसंख्य लोकांपुढें जगावें कसें हा प्रश्न अुभा आहे. मग चांगल्या तऱ्हेनें कसें जगावयाचें हा विचार बाजूसच राहिला. अेका वेळचें भरपूर अन्नही मिळत नाहीं अशी बहुसंख्य जनतेची स्थिती झाली आहे. तसें पाहिलें तर हिंदुस्थानांत लागवडी खालीं येत असलेला प्रदेश मोठा आहे. लागवडीची अेकंदर जमीन छत्तीस कोटी अेकर असून सर्व-साधारणपणें ती सुपीक आहे. हवापाणी ज्या त्या पिकास जसे पाहिजे तसें असून पावसाचीही अनुकूलता आहे. शेतीवर राबणारांचीही संख्या भरपूर आहे. कारण ४० कोट लोकसंख्यापैकीं सुमारे ३५ कोट लोक खेड्यांत राहतात व त्यापैकीं सुमारें ७५ टक्के लोक शेतीवर अुदरनिर्वाह करतात. शेती पिकविण्यासाठीं ज्या जनावरांचा आम्हांस अुपयोग करावा लागतो तीं जनावरेंही आमच्याजवळ विपुल आहेत. सर्व जगांतील अेकंदर गुरांची संख्या अंदाजे ७० कोट असून त्यापैकीं हिंदुस्थानांत सुमारें २० कोटी गुरें आहेत. अितके असूनही आपणांपैकीं सुमारे सात कोटी लोकांस अर्धपोटी राहावे लागते. या गोष्टीची अितर कांहींहीं कारणें असोत पण अेक गोष्ट मात्र आज आपल्यास पदोपदीं भेडसावीत आहे. ती म्हणजे अर्धपोटी अवस्थेंमुळें राष्ट्राच्या मानव संपत्तीचा दिवसेदिवस झपाट्यानें ऱ्हास होत आहे. अन्न कसें मिळेल हीच ज्या ठिकाणीं पंचाअीत तेथें तें चांगले कसें मिळेल याचा

विचार कोठून येणार ! तसा विचार आला तरी त्याचा अुपयोग काय?

अशा तऱ्हेनें रोज आपण खात असलेल्या अपुऱ्या व निसत्व अन्नाचा परिणाम राष्ट्राच्या आरोग्यावर अत्यंत वाअीट झाला आहे. त्याची कल्पनाही आपणांस नाहीं. पण राष्ट्रांतील मृत्यु संख्येचें प्रमाण जर आपण पाहिलें म्हणजे सहजच समजेल. या बाबतींत आपण सर्व जगांत शेवटच्या नंबरास आहों. आपल्या देशांत मृत्यूचें प्रमाण दर हजारीं २२.४ पडतें तर ग्रेट ब्रिटनमध्यें तेंच प्रमाण १२.४ पडतें व अमेरिकेचें तर ११.२ पडतें. आपल्या आशिया खंडांतील जावा, जपान सारख्या देशांचेही मृत्यूचें प्रमाण दरहजारीं अनुक्रमें १८.८, १७ असें पडतें. याहीपेक्षां आपल्या देशांतील बालमृत्यूचें प्रमाण पाहिलें तर कोणासही धक्काच बसेल. जन्म झाल्यापासून अेक वर्षाचें आंतील वयांत दरवर्षी १० लक्ष बालकें मृत्युमुखीं पडतात व सदर मृत्यूचें दर हजारी प्रमाण काढल्यास तें आपल्या देशांत १६२ पडतें. जपानमध्यें तेंच प्रमाण १०६ तर ग्रेटब्रिटन व अमेरिका या देशांत अनुक्रमें दर हजारीं ५८ व ५४ असें बाल मृत्यूचें प्रमाण पडतें. म्हणजे ग्रेटब्रिटन किंवा अमेरिका यापेक्षां जवळ जवळ तिपटीनें आमचे देशांत बालमृत्यू घडतात. बाळंत होअून मरणाऱ्या बायकांचेही प्रमाण हिंदुस्थानांत अितर सर्व देशांपेक्षां जास्त आहे. बाळंत झालेल्या अेक हजार स्त्रियापैकीं सुमारें ३० बायका मरण पावतात. यावरूनही देशाच्या आरोग्याच्या अेकंदर हलाखीचें भयानक चित्र आपल्यासमोर अुभें राहतें. देशाला सुधारणारी पिढी म्हणून ज्यांच्याकडे आशेनें पाहावें अशीं मुलें किंवा त्यांना जन्म देणाऱ्या माता यांना शारीरिक दुर्बलतेमुळें व योग्य अन्नाचे अभावी अकाली मरणाचे दारीं जावें लागते. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणजे हिंदुस्थानच्या लोकांच्या सर्वसाधारण आयुष्याची मर्यादा २७ वर्षांवर येअून ठेपली आहे. जपानमध्यें हें प्रमाण ४७ वर्षांचें आहे तर ग्रेटब्रिटन किंवा अमेरिका

यामध्यें हें प्रमाण सरासरीनें ६२ वर्षांचे आहे. सर्व जगांत न्यूझिलंडमध्यें तर हें प्रमाण ६७ वर्षांचें पडतें.

आयुष्याची मर्यादा अितकी कमी होण्यास कारणें अनेक आहेत हें खरें. परंतु सर्वांत मोठें कारण सकस व पोषक अन्नाचा अभाव व त्याचा सार्वजनिक आरोग्यावर होणारा परिणाम हें अत्यंत महत्त्वाचें कारण असून त्यांचाच मुख्यतः आपणांस विचार करणेचा आहे. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे. चाळीस कोटी लोकांपैकीं पस्तीस कोटी लोक खेड्यांत राहतात. या दृष्टीनें लोकांच्या अन्नाचा प्रश्न सोडविला म्हणजे जवळ जवळ हिंदुस्थानचा अन्न प्रश्न सोडविल्यासारखे होणार आहे. अन्नाची वाढ कशी करतां येअील या बाबतचा विचार पुढें करण्याचें ठरविले असून प्रस्तुत प्रकरणीं जें अन्न रोज आपण खातो तें आहे त्या परिस्थितींतच शरिरास पोषक कसें होअूं शकेल याचाच विचार करणेचा आहे.

आपण रोज जें अन्न खातो ती अेक नेहमींच्या अितर व्यवहारापैकीच अेक गोष्ट म्हणून करतो. त्यापासून आपल्या शरिरास कोणते फायदे होतील किंवा काय तोटे होतील याचा आपण क्वचितच विचार करतो. अन्नाचा मुख्य अुपयोग आपल्या शरिरास शक्ति अुत्पन्न करण्यासाठीं पोषक द्रव्यांचा पुरवठा करणें हा आहे. आगगाडीस जसा दगडी कोळसा किंवा मोटारीस जसें पेट्रोल तसेंच शरीरास अन्न. अन्नानें ज्याप्रमाणें आपल्या अंगांत ताकद अुत्पन्न होअून कोणतेहीं काम करण्यांस शक्ति निर्माण होते. त्या प्रमाणेंच वेगवेगळ्या अन्नांतील वेगवेगळ्या गुणधर्माच्या द्रव्यांनी शरीर मजबूत अगर धाटदार करण्याकडेही त्याचा अुपयोग होतो. मांस, रक्त व हाडें याचेंच शरीर बनतें. या तिन्हींची अन्नांतील निरनिराळ्या घटकांनीं योग्य प्रमाणांत वाढ होतें. यामुळेंच शरीरास पोषण करणाऱ्या व वाढीस लावणाऱ्या ' अ, ब, क, ड, अशा सारख्या जीवन सत्वांचा ' शोध लागला. कोणत्या खाद्यपदार्थांत कोणतें जीवनसत्व आहे याचें विवेचन करणारें ग्रंथ हळू हळूं प्रकाशीत होअूं लागलें. खेडेंगांवांमधील अन्नाबाबत व तें

घेणाऱ्या शेतकऱ्यांबाबत अ, ब, क, ड, सर्व जीवन सत्वांनी युक्त असा चतुर्विध आहाराचा तक्ता निरुपयोगीच आहे. कारण जगणें अेवढेच कार्य जेमतेम जें अन्न करूं शकतें व तेंहीं मिळविण्यांस ज्यांना अुन्हातान्हांतून सतत राबावे लागते त्यांना तुम्ही चोरस आहार घ्या. सर्व जीवन सत्वांनीं-युक्त अन्न खा, असा अुपदेश करणें म्हणजे त्याच्या दारिद्र्याच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखेच आहे.

पण अेवढें खरें कीं, जरी आहार शास्त्राबाबत शेतकऱ्यांना सांगोपांग माहिती करून देण्याची आवश्यकता सध्या नसली तरी तें जें अन्न खातात त्यांत सकस कोणतें त्याचें सामर्थ्य वाढविण्यास अधिक अुपयोगी कोणते याची माहिती त्यांना करून देणें जरूर आहे. कारण अेवढ्या माहितीनें त्यांच्या आरोग्यांत पुष्कळ सुधारणा होण्यासारखी आहे. कारण शेतकऱ्यांची शरीर-प्रकृती आत्याच बळकट व निरोगी असतें. जर त्यानें मुंबअीची गिरण-गांवची वारी केली नसेल तर त्याचें आयुष्यही सरासरी आयुर्मानापेक्षां किती तरी जास्त असतें.

सामान्य शेतकरी साधारणपणें सकाळीं अेकदां न्याहारी करतो. त्या-वेळीं तो कांदा, जोंधळा, बाजरी अगर नाचण्याची भाकर व अेकादे कोर-ड्यास याचा अुपयोग करतो. दुपारी काम आटोपल्यावर तो पुन्हां अशाच तऱ्हेचें जेवण करतो व रात्रीं घरीं गेल्यावरही याच पद्धतीचें जेवण तो घेतों. मध्यम स्थितितील शेतकरी आठवड्यांतून दोन तीन वेळा तांदूळ किंवा मटणाचा अुपयोग करतो. शिवाय घरीं जनावरें व दूध दुभतें असणारा याच आहारांत दह्याचा किंवा ताकाचा अुपयोग करतो. यामुळेंही त्याची तब्येत चांगली राहते. हें जरी खरें तरी अेकंदर पुढील पिढी चांगली निपजण्याचें दृष्टीनें व सर्व साधारणपणें अन्न सेवनांत अेकसूत्रीपणा येण्याच्या दृष्टीनें शेतकऱ्यास जें अन्न मिळतें किंवा तो जे धान्य पिकवितो त्याचाच योग्य तऱ्हेनें त्यानें अुपयोग केल्यास त्यास जीवन सत्वाकरितां बाहेर शोध करीत जावे लागणार नाहीं. ज्यांच्या खाण्यांत तांदूळ आहे त्यांनीं तो सडून पूर्ण पांढरा

न करतां करडीसकट खाल्यास सर्व पोषक द्रव्यें त्यास मिळतील. गहूं किंवा जोंधळा भरडल्यानेंही असेंच परिणाम होतात. कोंडा असलेल्या पिठाच्या पोळ्या अगर भाकरी जास्त पौष्टिक असतात. खेडेगांवांत शाकभाज्या पुष्कळ असतात. त्याचा अुपयोग जर जेवणांत केला तर त्याचाही फायदा शरिरास होतो. कितीही गरीब शेतकरी असला तरी तो कडधान्ये थोड्याफार प्रमाणांत वापरतोच. शरिरास अवश्य असणाऱ्या 'प्रोटिन्स' चें प्रमाण त्यांत असतें. त्यास मोड आणून त्याचा अुपयोग केल्यास त्याचा जास्त चांगला अुपयोग होतो. सर्व अन्नांत दूध हें पहिल्या प्रतीचें अन्न समजलें जातें. त्यांत सर्व प्रकारचीं जीवन सत्वें असतात. पण ज्या शेतकऱ्यांच्या घरीं जनावरें व दूधदुभतें आहे, तोही दुधाचा क्वचितच अुपयोग करतो. मांस, अंडीं यामध्यें प्रोटिन्स भरपूर प्रमाणांत आहेत व खेडेंगांवांत त्याचा अुपयोग केव्हां तरी व कसातरी केल्यानें त्याचा शरीर-वाढीच्या दृष्टीने फारसा फायदा होत नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे सर्व-सामान्य शेतकरी जें पिकवितो त्यामध्येंही जीवनास व शरीराचे अुपयोगी पडणाऱ्या बऱ्याच सत्वांचा समावेश होतो. पण त्या सर्वांचा अुपयोग्य अन्न या दृष्टीनें करण्यास त्यास शिकविणें हेंच महत्वाचें आहे. सर्व दिवस भाकरी व कोरड्यास कांदा खाल्यानें जेवणही अेक कंटाळवाणी बाब होते. पण नेहमीचेच पदार्थ जर आलटून पालटून व व्यवस्थित रीतीनें घेतले तर जेवण कंटाळवाणें न होतां आपल्या आयुष्यांतील तो अेक आनंदाचा भाग आहे असें वाटूं लागेल. चौरस आहाराचें आराखडे तज्ञ लोकांनीं पारखून तयार केलेले खेडेंगांवांत जसेच्या तसेंच लागूं पडणार नाहींत. कारण खेडेंगांवची सांपत्तिक स्थिती व तेथील लोकांची क्रयशक्ति यांचा विचार करून कमींत कमी खर्चांत पण जास्तीत जास्त अुपयोगी असा कोणत्या पद्धतीचा आहार खेडेंगांवच्या लोकांनीं घ्यावा याची माहिती शेतकऱ्यांना करून देणें जरूर आहे. त्या दृष्टीनें खेडेंगांवांतील शेतकरी अगर सामान्य लोक यांना कमीतकमी खर्चाचा आहाराचा आराखडा खालील स्वरूपाचा होअूं शकेल.

## खेड्यांतील नागरिकांना उपयुक्त असा आहाराचा आराखडा.

| अ. नंबर | धान्य किंवा खाद्य पदार्थ | रोजचे प्रमाण तोळे | महिन्याचे प्रमाण | सध्या पडणारी सरासरी किं.रु. | युध्दापूर्वी सरासरी किं. रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | तांदूळ, जोंधळा नाचणे, गहू अगर सर्व मिळून | ६० | १८०० | ५ | २-८-० |
| २ | कडधान्य | १० | ३०० | १ | ०-३-० |
| ३ | भाज्या, फळें, पालेभाज्या | २० | ६०० | १ | ०--४० |
| ४ | तेल | ३ | ९० | ०-११-० | ०-६-० |
| ५ | दूध | २० | ६०० | ०- २-० | ०-१-० |
| ६ | साखर | ५ | १५० | ०-१५-० | ०-१२-० |
| ७ | मांस, मासे, अंडी | ८ | २४० | ३- ६-० | १- ८-० |
| | | | | १४ रु. | ६-१२-० |

ज्यांना मांसाहार घेणेचा नाहीं त्यांना दुधाचें प्रमाण दररोज ४० तोळे जादा याप्रमाणें ठेवावें.

सदरहू आराखडा पाहून कोणी असा आक्षेप घेअील कीं, चौदा रुपये प्रत्येक माणसीं खर्च करण्यासारखीं शेतकऱ्यांची सांपत्तिक स्थिती कोठें आहे? हिंदुस्थानचें माणसीं अुत्पन्न दरसाल ७८ रुपयेचें पडतें. मग हा गरीब शेतकरी अेवढा खर्च कोठून करेल? सकृतदर्शनी हा आक्षेप जरा निरुत्तर करणारा वाटेल. पण थोडा विचार केला तर शेतकऱ्यांस यांतील बरेच पदार्थ विकत घ्यावे लागत नाहींत. हे यादी पाहिली तर दिसून येअील. तांदूळ, नाचणा, जोंधळा, गहूं यापैकीं अेकादें धान्य तरी, शेतकऱ्यांजवळ निर्वाहापुरतें असतें. कडधान्याची स्थितीही अशीच असते. खेडेगांवांत अमूक अेक प्रकारची भाजी मिळूं शकणार नाहीं हें खरें. पण प्रत्येकाचे परड्यांत

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

दारची भाजी म्हणून किंवा वेल म्हणून लावलेले असतात. त्याचा अुपयोग शेतकऱ्यांस थोडा फार आपल्या आहारांत करतां येअील. जनावरामुळें दुधाचा प्रश्न सुटतो. फक्त त्यास विकत घ्यावें लागते म्हणजे तेल, मीठ, साखर किंवा मांस हे जिन्नस विकत घेण्यास त्यास महिना ३-४ रुपये खर्च येअील. शेतकऱ्यांनीं मनांत आणले किंवा त्यांना सांगणारा व पटविणारा कोणी भेटला तर आस्ते आस्ते योग्य आहाराचें महत्त्व त्यांना पटेल व ते पटले म्हणजे वाअीट अन्न खाल्यानें त्यांना मृत्युमुखी पडण्याची जी पाळी येते ती कालांतरानें खास येणार नाहीं.

सार्वजनिक आरोग्यांत अन्न हा महत्वाचा घटक असलेनें त्याचें विवेचन अेवढ्या विस्तारानें केलें. कारण आरोग्याचें मूळ जसें चांगलें अन्न आहे तसें सर्व रोगांचे मूळही वाअीट अन्न हें आहे.

गांवची स्वच्छता व योग्य तऱ्हेचे अन्न या दोन गोष्टींचे महत्व खेडें-गांवच्या गरीब शेतकऱ्यांस समजले म्हणजे सार्वजनिक आरोग्याबाबत प्राथमिक अुपाययोजना करण्याचें कारण नाहीं. फक्त प्रभावी प्रतिबंधक योजना ज्यावेळीं रोगराअी होअील, तेव्हां केल्यास त्या खेड्याचें सर्वसाधारण आरोग्य अुत्तम राहील. कोल्हापूर दरबारनें जहागिरीसुद्धां सर्व अिला-ख्यांतील खेड्यांत ३०० ग्रामीण वैद्यकीय केंद्रें स्थापन करण्याचे ठरविले आहे. सध्या १५० केंद्रें अशा तऱ्हेचें काम प्रत्यक्ष करीत आहेत. खेडें-गांवांतील लोकांना सर्वसाधारण रोगांवर अुपचार करण्याकरतां वेळप्रसंगीं ५-१० मैल अंतरावर तालुक्याचे ठिकाणीं पळत जावे लागे. पण या योजने-मुळें थोड्या व अल्प मोबदल्यांत लोकांना सर्वसाधारण रोगावर अुपचार मिळतो. अशा तऱ्हेची वैद्यकीय केंद्रें स्थापन झालीं तरी सांथीसारख्या प्रसंगीं लोकांना मोफत अिनॉक्युलेशनची सोय सर्रास होणें जरूर आहे. साधारण दहा हजार लोकवस्तीस अेक सुसज्ज दवाखाना याप्रमाणें तालुक्याचें ठिकाणीं सरकारी दवाखानें स्थापन करणें जरूर आहे. सदर दवाखान्यांत तज्ञ डॉक्टर व नर्स यांची नेमणूक करून प्रसूतिगृह हा अशा दवाखान्याचा आवश्यक विभाग करणेंत यावा. यामुळें तालुक्यांतील कोणत्याही दर्जाचे

लोकांना साधारपणें सर्व रोगांवर औषधोपचार मिळूं शकेल. प्रत्येक जिल्ह्यास अेक नमुनेदार आरोग्य भुवन असावे व त्यामध्यें अेक्सरे किंवा ऑपरेशनसारखी मोठीं कामें सुलभतेनें करतां येतील; अशी सर्व व्यवस्था असावी. सदर आरोग्यभुनामध्यें सर्व तऱ्हेच्या मोठ्या रोगांवर औषधोपचार करणेंची सोय होण्याची असल्यानें तें आधुनिक सर्व सुखसोअीनी व अुपकरणानीं परीपूर्ण असावे. अशा तऱ्हेनें ग्रामीण वैद्यकीय केंद्रावरून तो जिल्ह्याच्या ठिकाणचें नमुनेदार आरोग्य–भुवनापर्यंत ज्या त्या लोकांच्या आर्थिक परिस्थितीस मानवेल अशा तऱ्हेच्या औषध-पाण्याची सोय झालेस खेड्याचे व तसेंच नागरी लोकांचेही आरोग्य सुधारेल. आज बालमृत्यू किंवा अकालीं मरणाचे जे भीतीदायक आंकडे हिंदुस्थानांत दिसून येतात; तेही आस्ते आस्ते कमी कमी होत जातील.

———

# शिक्षण



खेडेंगांवांत रस्ते चांगले झाले, गांवचें आरोग्य सुधारलें, सांपत्तिक परिस्थिती समाधानकारक झाली व शेतींत सुधारणा होअून खेडेगांव स्वयंपूर्ण झालें तरी त्यामध्यें जोपर्यंत शिक्षणाची प्रगति झाली नाहीं व तेथील लोकांना जोपर्यंत जगाचें ज्ञान संपादन करण्याची गुरुकिल्ली मिळाली नाहीं; तोपर्यंत त्या खेड्यांची सुधारणा पुरी झाली असें म्हणतां येत नाहीं. अितकेच नव्हेतर शिक्षण हा सर्व सामाजिक जीवनाचा पाया आहे. तोच कच्चा असेल तर त्यावर आधारलेली अिमारत कितीही सुंदर असली तरी ती कायम व टिकाअू अशी होणार नाहीं. पृथ्वीवरील अंधार नाहींसा करणारा जसा सूर्य त्याचप्रमाणें लोकांच्यामधील अज्ञानरूपी अंधार घालविणारा सूर्य म्हणजे शिक्षण. खेडेंगांवांतील शिक्षण हा अेक सध्यां सर्व लोकांच्या व सरकारच्या कळकळीचा विषय होअून बसला आहे. साक्षरता प्रसाराच्या मोहिमा जोरानें चालू आहेत. हिंदुस्थानांतील लिहितां वाचतां येणाऱ्या लोकांचें प्रमाण फक्त शेंकडा १३ पडतें. अितका अडाणीपणा आपल्या देशांत आहे. ही शिक्षणाची वाढ खेड्यांत नसून जे काय थोडें सुशिक्षित लोक आहेत त्यांचा बहुतांशीं भरणा शहरांतच आहे. या दृष्टीनें पाहतां खेडें-गांवची शैक्षणिक-पुनर्घटना करण्याची वेळ आतां आली असून त्याबाबतचे विचार आतां अधिक मूर्तस्वरूप घेअूं लागले आहेत. फक्त शहरें सुधारून किंवा शैक्षणिक सुधारणांचा विकास शहारामध्यें करून देशाची प्रगती करतां येअील अशी कल्पना पूर्वी वावरत होती व त्यामुळें खेडेगांव हा पूर्वी पूर्णपणें अुपेक्षिलेला घटक होता. हिंदुस्थानच्या ४० कोट लोकसंख्येपैकीं ३५ कोटी लोक खेड्यांत राहतात. त्यापैकीं शेंकडा ७० टक्के लोक शेतीवर अुपजीविका करतात. अशी स्थिती असलेनें खेडेंगांवची सुधारणा ही सर्व सुधारणेंचा पाया आहे, याची जाणीव विचारी लोकांस होअूं लागली आहे. अुदाहरणच द्यावयाचें झालें तर शरिरांतील डोकें हा भाग जर शहरें मानली तर हातपाय किंवा अितर अवयव कीं त्यावर मेंदूची वाढ किंवा

जोपासना अवलंबून आहे ती खेडी होत. त्या अिंद्रियांना निर्बल ठेअून मेंदूचें भरण पोषण होअील अशी कल्पना करणें चुकीचे ठरेल. म्हणून खेडेंगांवाना बाजूस ठेअून फक्त शहरें सुधारल्यानें आपल्या राष्ट्राची खरी व अुत्तम वाढ होअूं शकणार नाहीं. खेडेंगांवच्या लोकांनाही सरकार किंवा पुढारी यांना त्यांच्याबद्दल अलीकडे अितका आपलेपणा का आला याचें आश्चर्य वाटतें. अज्ञानामुळें ते त्यांत सरकारचा कांहीं कावा नाहींना असा संशयही प्रकट करतात. परंतु खेडेंगांव व खेडेंगांवचें लोक यांच्या सुस्थितीवरच देशाची सुस्थिति अवलंबून असते ही गोष्ट त्यांना पटवून देणें जरूर आहे.

युद्धोत्तर पुनर्रचनेसंबंधीं कोणत्याही संस्थानचे काय किंवा ब्रिटिश अिलाख्याचे काय अहवाल किंवा रिपोर्ट चाळले तर अेक गोष्ट प्रामुख्यानें दिसते ती ही की, लोकांना घेअून कारभार करण्याची वृत्ति सरकारमध्ये जागृत झालेली आहे. कोणत्याही सुधारणायोजना पाहिल्या तरी त्यामध्यें शिक्षणासंबंधीं विचार प्रदर्शित करतांना नागरिकत्वाचें शिक्षणावर भर देणें व जनतेने स्वराज्यास पात्र व्हावे या करितां विद्यार्थी-दशेंतील आजच्या पिढ्यांचे मनांत समाजसेवेची व नागरिकत्वाची जागृति करणें हाच सुधारणा योजनांचा मूलभूत हेतू आहे असे सरकार घोषित करतें.

राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या अेकाद्या संस्थेचें हेतू व सरकारने शिक्षणाबाबत व्यक्त केलेल्या वरीलप्रमाणें अिच्छा यांत वस्तुतः काय अंतर आहे ? या गोष्टी लोकांना समजतील अितके शहाणे व सुजाण त्यांना करणें हेंच आतां जनतेचें कर्तव्य आहे. कोणत्याही शिक्षणाचा हेतू सही करणें किंवा अेकादा दस्तअैवज किंवा अर्ज लिहितां येणें अितका मर्यादित नसून मनुष्याची विचारशक्ति जागृत करणें किंवा स्वतंत्रपणें विचार करून हें बरें अगर वाअीट असें ठरविण्याची त्याचें अंगांत पात्रता आणणें हा आहे. अेकाद्या खोलींत अंधार असला व त्यामध्यें जर दिवा नेला तर ताबडतोब खोलीतील कोनाकोपऱ्यांतही अुजेड पडतो. मनुष्याचें मनाची स्थितीही अेकाद्या अंधाऱ्या खोलींप्रमाणेंच झाली आहे. त्याला असें शिक्षण दिलें पाहिजे कीं,

२।५१ ० २८ १९-१-५७



त्याच्या मनांतील कानाकोपऱ्यांतही जाणतेपणाचा अुजेड पडेल. अर्थात् ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाहीं, अुलट अनेक वर्षाच्या समजुतीने व सवअीने लोकांची या तऱ्हेनें तयारी करणें हें कामही अत्यंत दुर्घट आहे.

खेडेंगांवच्या शिक्षणाचा प्रश्न फक्त प्राथमिक शिक्षणाची वाढ करून सुटणारा नाहीं. कारण यापूर्वी शिक्षण मिळालेले नाहीं असेंच लोक ज्या खेड्यांत शें. ९०–९५ आहेत अशा प्रौढ माणसांच्या शिक्षणाचा प्रश्न हाही लहान मुलांचे शिक्षणाअितकाच महत्वाचा आहे. या दृष्टीनें खेडेंगांवच्या अेकंदर शैक्षणिक पुनर्घटनेबाबत विचार करतांना लहान लहान मुलांच्याकरितां देणेंत येत असलेल्या प्राथमिक शिक्षणाची योजना व प्रौढांना कोणत्या प्रकारे शिक्षण देतां येअील. ही योजना अशा दुहेरी दृष्टीनें विचार करणें भाग आहे. प्रथमतः मुलांच्या प्राथमिक शिक्षणाबद्दल विचार करूं. सध्यां बहुतेक ठिकाणीं प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत सुरूं केले आहे. प्राथमिक शिक्षणाचा खेडेंगांवच्या दृष्टीनें विचार करतांना पांचशे वस्तीच्या आंतील खेडी व पांचशे वस्तीवरील खेडीं असा पुनर्घटनेचा पाया धरून विचार करणें योग्य होअील.

ज्या खेडेंगांवीं लोकसंख्या ५०० च्या वर आहे अशा प्रत्येक खेडेंगांवी ४ अियत्तेपर्यंत सरकारी मराठी शाळा असावी व अेकंदरीत हजार वस्तीच्या वरच्या गांवीं सर्व साधारणपणें मुलकीपर्यंत शिक्षण देणाऱ्या सरकारी शाळा असाव्या. पांचशे वस्तीपेक्षां कमी वस्तीच्या गांवीं प्रथम मदतीच्या *(Grant in aid)* शाळा असाव्या परंतु मदतीचा शिक्षक काय किंवा सरकारी शिक्षक काय त्यांच्या शैक्षणिक दर्जात मात्र अंतर असूं नये. कारण सध्या ज्या खेडेंगांवांत मदतीच्या शाळा आहेत तेथील शिक्षक हें शाळा मास्तरचें काम अेक दुय्यम धंदा म्हणून करतात. कारण मिळणाऱ्या मदतीच्या रकमेंत त्यांचें पोट भरूं शकत नाहीं. गांवच्या पाटलाच्या अगर कुलकर्ण्याच्या आधारावरच किंवा धाकावर त्यांचे जीवित अवलंबून असतें. पाटलाच्या घरचीं बारीकसारीक कामें त्यांस करावी लागतात. कारण आर्थिक दृष्ट्या स्वतंत्रपणें राहण्याअितके वेतन त्यास मिळत नाहीं. अर्थात भावी-पिढीची घडण ज्या लोकांनी करावयाची

त्यांचा योगक्षेम चांगला चालेल अितका पगार किंवा मदत त्यास मिळणें अवश्यक आहे. पण दुर्दैवानें कोणत्याही संस्थानांतील वार्षिक रिपोर्टांतील प्राथमिक शिक्षणावर खर्च होणाऱ्या खर्चाचे आंकडे पाहिले तर ते खेदजनक वाटतात. संरक्षण किंवा सार्वजनिक शांतता अशा सारख्या खात्यावर सरकार आपल्या अुत्पन्नापैकीं शेंकडा १५ ते २० अितकी रक्कम खर्च करूं शकते. हें करणें अयोग्य आहे असें नाहीं. पण प्राथमिक शिक्षणावर होणाऱ्या खर्चाचें प्रमाण पाहिले तर ते वट्ट अुत्पन्नाच्या शेंकडा ३ किंवा ४ सुद्धां पडत नाहीं. ही स्थिती पालटणेस सरकारनें तयार झालें पाहिजे. हीच आर्थिक बाब प्राथमिक शिक्षण चांगले मिळण्याचें कामीं आड येते. शाळेवरील खर्च हा फुकट होतो. कारण त्यांत अुत्पन्नाची बाब कांहीं नाहीं हें खरें, पण निव्वळ अुत्पन्न काढल्यानें कोणताही कारभार योग्य तऱ्हेनें चालला आहे असें मानतां येणार नाहीं. या दृष्टीनें पाहतांना प्राथमिक शाळेंत काम करणाऱ्यास निवडले जाणारे शिक्षकांना भरपूर वेतन मिळण्याची व्यवस्था प्रथम झाली पाहिजे. कोणत्याही खात्यांत नालायक ठरलेले लोक शाळेंत चालतात. या घातुक विचारसरणीनें आपण पुढील पिढ्यांचें नुकसान करण्यास कारणीभूत होतो याची कल्पना सरकारास येणें जरूर आहे. अुलटपक्षी कोणत्याही खात्यांत शैक्षणिक पात्रतेनें लायख व हुशार असें जे लोक असतील त्यांना शाळा खात्यांत बदललें पाहिजे. वरील दुःस्थितीमुळें प्राथमिक शाळामास्तर म्हणजे अेक केविलवाणा, लाचार, व स्वाभिमानशून्य असा समाजांतील अेक अुपेक्षित अिसम असें जें चित्र डोळ्यासमोर अुभें राहतें; याचें कारण त्याची शैक्षणिक अपात्रता किंवा बौद्धिक कमीपणा नसून त्यास मिळणारें अत्यल्प वेतन हेंच आहे. प्राथमिक शाळांत नालायख लोकांची भरती झालीच असेल तर ती याच आर्थिक कारणामुळें झाली आहे. जी स्थिती सरकारी मास्तरांची तीच स्थिती मदत मास्तरांची. त्यालाही मिळणारी मदत ही त्यांचा योगक्षेम चालविणेंस अगदीं अपुरी असते. मदत मास्तरांना जास्त वेतन देणें सरकारला शक्य झाले नाहीं तर गांवच्या लोकांनीं तो आपल्या मुलांना शिक्षण देणारा तसेंच आपणांसही बाहेरील जगाची ओळख करून देणारा अेक ज्ञानदीप आहे अशी भावना त्याचेबद्दल ठेअून

त्याचा योग्य क्षेम चालविण्यास सिद्ध झाले पाहिजे. आपली पूर्वीची खेडें-गांवची कारभारपद्धती [Village System] पूर्णावस्थेला गेली होती. खेडें सर्व बाजूनें स्वयंपूर्ण होतें. पाटील, कुलकर्णी, तलाठी, महार, सुतार, लोहार, चांभार यांचा खेडेंगांवच्या कामांत अेक ठराविक भाग होता. जो तो आपला भाग फार दक्षतेनें अुचलण्यास तयार होता. त्यावेळीं गांवचा मास्तर हा त्या खेडेगांवचें भूषण असें मानीत. शिवाजी महाराजांचा गुरु दादोजी कोंडदेव हा कोणी विद्वान प्राध्यापक ( प्रोफेसर ) किंवा पदवीधर नव्हता पण अेक नैतिक व आचारसंपन्न असा सामान्य मनुष्य होता.

गांवगाड्याचीं हीं चाकें मध्यंतरीच्या काळांत खिळखिळी झाली व प्रत्येक गोष्टीकरतां शहराप्रमाणें खेडेगांवासही बाहेरील अयातीवर अवलंबून रहावे लागले. त्यामुळेंच चांगल्या शाळा पंतोजींची परंपरा हळूंहळूं लुप्त होअून त्याठिकाणीं सरकारचे मदतीने अुभा राहिलेली ही कर्तृत्वशून्य व अर्धपोटी बाहुली आज आपल्यापुढें शिक्षक म्हणून अुभी राहिली. खेडें-गांवचा शिक्षक हा आपला आहे. त्याचें मोठेपणावर खेडेगांवची अन्न अव-लंबून आहे व तो खेडेगांवचा नेता आहे ही जाणीव लोकांमध्यें अुत्पन्न होअील असें शिक्षण आज त्यांना पाहिजे आहे. असो.

प्रत्येक खेडेगांवांत प्राथमिक सरकारी शाळेकरतां किंवा मदतीच्या शाळेकरतां अेक लहानशी टुमदार अिमारत व त्याचे आवती-भोंवतीं क्रिडांगणा-सारखा अुपयोग करतां येअील अशी मोकळी हवेशीर व प्रशस्त जागा असावी. खेडेंगांवांत जागेची फारशी पंचाअीत पडत नाहीं. गांवचे लोकांनीं मनांत आणल्यास अशी जागा सहज मिळू शकते. अिमारती बाबतही सरकारला सर्व खेड्यांमध्यें अेकदम अिमारती बांधणें शक्य होणार नाहीं. परंतु लोकांनीं शाळेचें कामीं अंगमेहनत करण्याचें मनांत आणल्यास थोडक्या खर्चांत चांगली अिमारत होअूं शकेल. तशी तयारी असलेबद्दल गांवकऱ्यांनीं आपल्या कार्यकर्त्यां मार्फत सरकारला कळविले पाहिजे. सध्यां कांहीं खेडेगांवांत चावडींत अगर सार्वजनिक देवळांत शाळा भरतात. परंतु चावडी काय किंवा

देअूळ काय या दोन्ही अिमारतींचे अुद्देश भिन्न आहेत. व त्यामध्यें प्रवेश करतांना अुत्पन्न होणाऱ्या भावनाही वेगवेगळ्या तऱ्हेच्या आहेत. त्यादृष्टीनें शाळा ठेवण्यास या दोन्ही अिमारती निरुपयोगी आहेत. शिवाय शाळेची अिमारत किती का लहान असेना ती स्वतंत्र असण्याचा मुख्य हेतू ही "माझी शाळा" असें त्यांत शिक्षण घेणाऱ्या मुलांस पुढें अभिमानानें म्हणता यावे हा आहे. या शाळेंत शिक्षण घेणारा मुलगा पुढें मोठा होअून दैववशांत जर आपल्या खेडेगांवास परत आला तर ही माझी शाळा असें अभिमानानें तो या अिमारतीकडे बोट दाखवून म्हणूं शकेल. व ज्या चिमुकल्या शाळेंत त्याने 'श्रीगणेशा' गिरविला त्या शाळेच्या अुन्नतीकरतां कांहीं तरी करण्याची भावना सहजच त्याच्या मनांत अुत्पन्न होअील.

शाळा हें गांवचें अेक विद्यादानाचें मध्यवर्ति केंद्र आहे अितका आकर्षकपणा, शाळेच्या अिमारतींत, क्रीडांगणांत व अेकंदर वातावरणांत निर्माण झाला पाहिजे. सरकार नागरी जनतेचें जीवन सुखकर होण्यासाठीं हॉस्पिटल्स किंवा ड्रेनेज यासारख्या प्रचंड खर्चाच्या योजना हातीं घेते किंवा शहरांतील मुलांच्या कॉलेज शिक्षणासाठीं हजारों रुपये वार्षिक खर्चाची कॉलेज अुघडतें अर्थात् त्यावर सरकारनें खर्च करूं नये असें नाहीं पण शेंकडा २० टक्के लोकांच्या सुखसोयीवर अुत्पन्नापैकीं बराचसा खर्च होतो व शेंकडा ७० लोक ज्या खेड्यांत राहतात त्यांच्या अुन्नतीकरतां कांहीं रक्कम खर्च करणें सरकारला अवघड नाहीं. या दृष्टीनें प्रत्येक खेड्यांत अेक सरकारी शाळागृह बांधणेंत यावें. साधारण चार अियत्तेच्या शाळेस प्रथमतः तीन खोल्या व अेक प्रशस्त व्हरांडा अेवढी अिमारत पुरें आहे. या अिमारतीस सर्वसाधारणपणें चार ते पांच हजार रुपये खर्च येअील व शाळेंत बाकें, टेबल खुर्ची, व छोटीशी लायब्ररी याकरितां अेक हजार रुपये मिळून प्रथम सहा हजार रुपये खर्च करावें लागतील. अेकंदर लोकवस्तीच्या मानानें पांचशेच्यावरच्या खेड्यास अेक सरकारी शाळा व आंतील गांवास मदतीच्या शाळा या प्रमाणांत किती शाळा होतील याची पाहणी करून पांच वर्षांत सर्व अिमारतींचें काम पुरें करण्याची योजना आखावी. सरकारची अेवढी सिद्धता झाली

म्हणजे त्यास जागेची किंवा वेळप्रसंगीं अंगमेहनतीची मदत करणें हें लोकांचें काम आहे. व तशी मदत करण्यास त्यांना अुत्तेजन देणें हे स्थानिक अधिकारी किंवा कार्यकर्ते यांचें काम आहे.

शाळेच्या अिमारतीची सोय करूनही बहुतेक खेड्यांत प्रथम प्रथम मुलेही पुरेशीं जमणार नाहींत हें खरें. कारण शिक्षणाचा त्यांच्या आयुष्याशीं कांहीं संबंध आहे याची जाणीवच खेडेगांवच्या लोकांना नसते. आमच्या तालुक्यांतील अेका खेडेंगांवांत सरकारी शाळा होती. पण त्यांत मुलें भरपूर नसल्यानें ती बंद करून मदतीची करावी अशी सूचना वरिष्ठ अधिकाऱ्याकडून आली. तेव्हां त्या गांवचें लोकांचें म्हणणें तरी काय आहे याची चौकशी करण्यासाठीं मी त्या गांवीं गेलो. लोकांना बोलावून विचारतां "रावसाहेब आमच्या मुलांना कशाला शिक्षण ? त्यांना कुठें कामदार व्हावयाचें आहे ? चार गुरें वळवितात त्याचे महिना तीन रुपये मिळतात तेवढें मात्र बुडतील झाले " असें अुत्तर जमलेल्यापैकीं प्रत्येकानें दिलें. शेतकऱ्यांच्या जीवनांत आर्थिक प्रश्न हा फार तापदायक असतो हे खरें व त्याच्या कुटुंबांतील प्रत्येक घटकानें कांहीं तरी मिळविल्या खेरीज त्यास गत्यंतर नसतें हेंही तितकेंच खरें. परंतु त्यांची विचार करण्याची पद्धत मात्र सदोष असते. हें भाषण चावडीत चाललें असतां समोरून अेक लहानसा पाडा चालला होता त्याचेकडे बोट दाखवून मी अेकास म्हटले " कायरे हा पाडा अुगीच गांवांतून हिंडतो गुलामाला ओतास कां जुंपत नाहीं. " " हां काय रावसाहेब " जमलेल्या लोकांतील अेका वृद्ध अिसमानें अगदीं वाअीट चेहरा करून म्हटलें, " हेंच त्याचे अुनाडपणानें हिंडण्याचें दिवस. त्याला ओताला जुंपून कसें चालेल जरा निबर तर व्हायला होवा. " या बोलण्यानें मात्र तो चांगल्या कात्रींत सांपडला. मी त्यास लगेच म्हटलें " पाड्यानें चार दिवस हुंदडावें असें तूं म्हणतोस कारण पुढें त्याच्याकडून तुला काम घ्यावयाचें असतें, पण तुझ्या प्रत्यक्ष-मुलानें मात्र निबर होण्यापूर्वींच कामास लागावें अशी तुझी अिच्छा ! पाड्या अितकीही किंमत तूं पोटच्या मुलास द्यावयास तयार नाहीस ना ? मुलालाही चार दिवस मोकळेपणानें हिंडूं द्या; शाळेंत जाअून चार अक्षरे

गिरवूं द्या; मग जन्मभर काम आहेच कीं." माझा युक्तिवाद बिनतोड होता. पाटील कुलकर्ण्यांस सक्तीचें हुकूम देअूनही जें काम होणार नाहीं ते माझ्या वरील बोलण्यानें केले. पाड्या अितकी किंमत मुलास देत नाहीं या जाणिवेने त्यांच्या भावना जागृत झाल्या व प्रत्येकाचे चेहरे गंभीर झाले. "रावसाहेब तुम्ही म्हणता तें खरें आहे." असें म्हणून त्यांच्यापैकीं जमलेल्या सर्व मंडळीस सांगितले, "कायरे रावसाबांचे म्हणणें अैकलेत कां! आतां घरटीं सहा वर्षांवरील पोर शाळेंत गेल पाहिजे" सर्वांनीं त्यांस अनुमती दिली. दुसऱ्या दिवसापासून ती शाळा मुलांनी भरून गेली. आज तागायत त्या शाळेंत मुलांची वाण नाहीं.

तात्पर्य अितकेंच कीं, मुलांचा प्रश्नही कांहीं प्रयत्नानी सुटतो. त्या बाबत अितके निराश होण्याचें कारण नाहीं. मुख्य गोष्ट आहे ती ही कीं खेडेंगांवचे लोकांना विश्वासांत घेअून त्यानां त्यांच्या पध्दतीच्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत. शाळेची अिमारत व शाळेंत साधारण २०।२५ मुलांची संख्या अितकी सिध्दता झाल्यावर मुलांच्या शालेय व पुस्तकी शिक्षणाचा जो भाग असेल तो शिक्षकानें मुलांच्याकडून तयार करून घ्यावयाचाच. पण त्या खेरीज मुलांची शारीरिक व बौध्दिक वाढ कशी होअील अिकडेही शिक्षकांनें लक्ष्य देणें जरूर आहे. खेडेंगांवच्या मुलांची प्रकृति सर्वसाधारपणें शहरांतील मुलांच्यापेक्षां निरोगी असते हें खरेच, परंतु शरिराची योग्य तऱ्हेनें वाढ होण्याच्या दृष्टीनें सांघिक तऱ्हेच्या व्यायामपध्दतीचा प्रसार खेड्यांतील शाळामधून होणें जरूर आहे. अेकतर यामुळें मुलांना व्यायाम मिळतो व शिवाय सामुदायिक शिस्तीची संवय त्यास लहानपणापासूनच लागते. सांघिक व्यायामाकरितां लाकडी जोड्या किंवा डंबेल्स गांवच्या लोकांकडून गांव–मदतीनें मास्तरांनी मनांत आणले तर सहज करून घेतां येतील. सांघिक व्यायामाचें शिक्षण खेडेंगांवांतील प्रत्येक मदत अगर सरकारी शाळेंतील अेका शिक्षकांस देणें जरूर आहे. प्रत्येक खेड्यांतील शिक्षकांस कांदिवलीसारख्या खर्चाच्या शिक्षणाला पाठविणें शक्य नाहीं तरी असें शिक्षण घेअून आलेल्या तज्ञ शिक्षकांच्या हाताखालीं वर्षांतून निदान अेक महिना शिक्षण शाळेंतील

अेक किंवा दोन शिक्षकांना दिल्यास खेडेंगांवचें शाळेस तें पुरें आहे. अशा तऱ्हेचे ट्रेनिंग क्लासेस वर्षांतून मे महिन्यांत काढावे व त्यामध्यें खेडेंगांवचे शाळेंतील अेक किंवा दोन शिक्षक पाठवून त्यांना तयार करावे. मुलांच्या शरीरप्रकृतीच्या दृष्टीनें दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे खेडेंगांवांतील शाळे-मधील प्रत्येक विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी वर्षांतून दोनदां होणें जरूर आहे. कारण यामुळें खेडेंगांवांतील सार्वजनिक आरोग्य किती कसाचें आहे हें समजून येअील. व अपुऱ्या अन्नामुळें किंवा निकस आहारानें मुलांच्या प्रकृतींत कांहीं बिघाड झाल्याचें अुघडकीस येअून त्यावर जरुर ती अुपाय योजना मध्यवर्ति आरोग्य खात्याकडून करणेची व्यवस्था होण्यास सुलभ जाअील. खेडेगांवांतील निव्वळ जन्ममृत्यूची सरासरी काढण्यानें राष्ट्रीय आरोग्याची सुधारणा होणार नाहीं. तर असें प्रमाण पडण्याचें मूळ कारण शोधून काढून त्यांवर त्वरित अुपाय योजना करण्याचेंच खेडेगांवचें सार्वजनिक आरोग्य सुधारूं शकेल. या दृष्टीनें खेडेंगांवांतील काय किंवा शहरांतील काय प्राथमिक, दुय्यम व कॉलेज शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांच्या आरोग्याची बाब सरकारनें आपल्या मध्यवर्ति आरोग्य खात्याच्या निष्णात डॉक्टरवर सोपवावी व त्यांच्या कार्यक्रमांत शाळांचे आरोग्य हा भाग समा-विष्ट करावा.

खेडेगांवांत प्राथमिक शाळांत शिक्षण घेणाऱ्या मुलांपैकीं बऱ्याच मुलांना पुढें दुय्यम शिक्षण घेण्याकरितां परगांवीं जाण्यासारखी सांपत्तिक-स्थिति आजच्या परिस्थितींत नसल्यानें सर्वसाधारणपणें प्राथमिक शिक्षण हीच त्यांच्या शिक्षणाची अखेरची मर्यादा ठरूं पाहते. या दृष्टीनें प्राथमिक शिक्षण क्रमातील शालेय अभ्यासक्रमाबरोबरच, किंबहुना त्यापेक्षांही थोड्या जास्त आस्थेवाअीकपणानें या मुलांना बुध्दी वाढविणारें, ज्ञान ( *General Knowledge* ) मिळेल अशी योजना प्राथमिक शिक्षणक्रमांत समाविष्ट करणें जरूर आहे. व हा हेतू पुढें ठेअून मुलांना आठवड्यांतून अेकादा दिवस नेमून शिक्षकांनी सोप्या शब्दांत देशांतील पुढाऱ्यांची किंवा अिति-हासांतील थोर पुरुषांचा ओळख करून द्यावी, त्यांची माहिती सांगावी, व

महिन्यांतून अशा विषयांवर अेकादा निबंध लिहून घ्यावा. व बोल-ण्याची संवय राहावी म्हणून चर्चा मंडळासारखे मंडळ बनवून लहान लहान मुलांना त्यांचे चार शब्द बोलण्यास शिकवावे. शाळा शिकावयाची ती नोकरीकरतां अशीच जी सर्वसाधारणपणें समजूत रूढ झाली आहे ती प्रथमतःच दूर करणें अवश्य आहे. खेडेंगांवांतील कोणीही अिसम मग तो शेतकरी, सुतार, लोहार, चांभार, महार किंवा अितर कोणताही धंदा करणारा अिसम असो, त्याला थोडें फार शिक्षण पाहिजे ही भावना जागृत झाली म्हणजेच शिक्षण व नोकरी हें रूढ होअूं पाहणारें समीकरण हळूं हळूं नष्ट होअील व ही कल्पना नाहींशी होण्यास मुलांना बाह्य परिस्थितीची ओळख करून देणें जरूर आहे. व त्यासच बुध्दिचें वाढ करणारें ज्ञान म्हणतां येअील प्रत्येक प्राथमिक शाळेस अेक छोटीशी लायब्ररी असावी. त्यामध्यें अैतिहासिक थोर पुरुषांचीं व साधुसंतांची सोप्या भाषेंत लिहिलेलीं चरित्रें असावी. तसेंच सध्याच्या काळांतील थोर पुरुषांचे चरित्रांचा त्यांत अंतर्भाव असावा. अशा तऱ्हेच्या पुस्तकांचे सेट शाळा खात्याच्या मुख्याधिकाऱ्यांनींच खरेदी करून ज्या त्या शाळेकडे अुपयोगाकरतां पाठवावे. हल्लीं कांहीं ठिकाणीं शाळा-मधून 'गेम' फीतून अशा तऱ्हेचीं पुस्तकें देण्याची योजना केलेली आढळून येते. पण त्यामधून चित्रमयजगत् किंवा किर्लोस्कर सारखी मासिकें व लघुकथा संग्रह खरेदिले जातात. हें वाङ्मय वाअीट आहे असें मुळीच म्हणणें नाहीं. पण मराठी चार अियत्तापर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलांना तें अुपयोगी नाहीं. त्यांना अगदीं सोपी व सुबोध अशीच पुस्तकें पाहिजेत.

मुलांच्या या बौधिक वाढीबरोबरच त्यांना निरनिराळ्या हस्त व्यवसा-याचेंही थोडें शिक्षण देणेची व्यवस्था प्रत्येक प्राथमिक शाळेंत असावी. खेडें हें स्वयंपूर्ण करण्याचें दृष्टीनें या गोष्टीस फार महत्व आहे. अेकाद्या मुलास सुतार कामाची आवड असल्यास किंवा कोणी कातरकाम करणारा असल्यास त्याचेकडून असें काम करवून घ्यावें. शाळेपुढें पटांगणांत फुलझाडांची बाग मुलांच्या कडून करून घेतलेस रानांत कष्ट करण्याची त्यास सहजच आवड अुत्पन्न होअील. ज्याठिकाणीं शक्य आहे अशा खेडेंगांवांत शाळेस जोडूनच

अेक लहानसा शेताचा तुकडा मुलांना शेतकी-शिक्षण देणेसाठीं अुपयोगांत आणावा. त्यामुळें मुलांना शेतामध्यें काम करण्याची संवय लागेल व मुलगा मुल्की पास झाला म्हणजे तो शेतकामास निरुपयोगी होतो ही समजुतही यामुळें नाहींशी होअील. निव्वळ पुस्तकी शिक्षण सध्यां अुपयोगाचें नाहीं व खेडेगांवांत तर त्याची वाढ ही व्यवहारोपयोगी शिक्षणाच्या कुंपणाबाहेर होअूं देतां कामा नये. आदर्श--नागरिक बनण्यास लिहितां वाचतां आलें तरी पुरें होतें. अुद्योगाची आवड, कष्ट करण्याची तयारी, स्वार्थ--निरपेक्षता व माणुसकी हे गुण अंगीं आणण्यास जास्त शिक्षण नको तर या तऱ्हेच्या व्यक्ति मुलांच्या पुढें आदर्श म्हणून सतत अुभ्या पाहिजेत.

वरीलप्रमाणें मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचा आराखडा असल्यास पांच दहा वर्षांमध्यें खेडेंगांवांतील मुलेंही निःसंशय सुधारलेली, जिवंत व प्रगतीच्या मार्गावरील बळकट विचारवंत व अुत्साही वाटाडे होतील यांत शंका नाहीं.

खेडेंगांवांतील फक्त प्राथमिक शिक्षणाचा विचार करून खेडेंगांवची शैक्षणिक प्रगति पूर्णतेस पोचणार नाहीं. कारण प्राथमिक शाळेंत फक्त लहान मुलेंच येणार व ती पिढी पुढें कर्तृत्वान होण्यास निदान वीस वर्षांचा काल तरी लोटावा लागणार. परंतु तोपर्यंत खेडेंगांवांत निरक्षर व अडाणी असे जे प्रौढ लोक आहेत त्यांना शिक्षीत करणे व अशा लोकांना बाह्य जगाचें ज्ञान करून देणें हा प्राथमिक शिक्षणा अितकाच किंबहुना जास्त महत्वाचा भाग आहे व त्यासच आपण प्रौढ शिक्षण असें म्हणतो. मोठ्या लोकांस साक्षर करण्याच्या योजना पुष्कळ निघाल्या आहेत. व त्यांचे प्रयोग खेडें-गांवांत सुरू आहेत. परंतु प्रौढ अिसमास फक्त साक्षर करून किंवा कांहीं तासांत सही करतां येण्याअितपत त्यांची तयारी करून हा प्रश्न सुटणार नाहीं. कारण अक्षर ओळख किंवा सहीपुरतें शिक्षण हा शिक्षणाचा अंतीम हेतू नाहीं. शिक्षणाचें तें अेक दृश्य अुपांग आहे. आज खेडेंगांवच्या लोकामध्यें ज्या अडाणी समजुती आहेत त्यांच्यामध्यें बाहेरच्या जगाचें व त्यांतील

सुधारणेंचें जें गाढ अज्ञान पसरलेलें आहे, किंवा त्यांच्यांत दिवसे दिवस जी व्यसनाधीनता, कर्ज्येदलाली बोकाळत चालली आहे त्या सर्व गोष्टीपासून या अडाणी लोकांना परावृत्त करण्याचा प्रयत्न म्हणजेच प्रौढ शिक्षणाची योजना असें मला वाटते. अेकाद्या खेडेंगांवचा शेतकरी, घरीं मुलगा आजारी पडला व त्यास टायफाअीड झाला किंवा क्षयासारख्या अेकाद्या दुःसाध्य आजारानें आजारी पडला तर योग्य औषधोपचार करण्याचा विचार त्यास पटणार नाहीं. देव देवर-कीवर मात्र तो कर्ज काढूनही पैसा खर्च करेल. हा दोष त्याचा नाहीं. तो ज्या परिस्थितींत वाढला त्या परिस्थितीचा व त्या वातावरणाचा हा दोष आहे. तो जगाच्या जसजसा जवळ येअील किंवा त्यास जवळ आणण्याचा जसा प्रयत्न केला जाअील तसतसा तो अडाणी समजुतींतून बाहेर पडेल. आज बाह्य जगाची व खेड्याची जण फारकतच झाली आहे. अिंग्लंडमधील प्रत्येक शेतकरी रोज अेक तरी वर्तमानपत्र विकत घेअून वाचतो. व त्यामुळें पेशानें तो जरी शेतकरी असला तरी निवडणुकींत कोणाला मत द्यावयाचें ही गोष्ट तो कोणाचा पक्ष जास्त अुपयुक्त काम करतो हें पाहून मनाशी ठरवतो. शहरांतील आचार–विचारांच्या समपातळीवर तो अुभा असतो. म्हणूनच त्यास हें शक्य होतें. हिंदुस्थानांत ही गोष्ट शक्य नाहीं. कारण देशाची अेकंदर आर्थिक परिस्थिती अितकी निकृष्ट दर्जास पोहोचली आहे कीं, शेतकऱ्यांच्या राहणीचा दर्जा सुधारल्याशिवाय तो शहरांतील राहाणीच्या व आचार-विचारांच्या समपातळीवर येअूच शकणार नाहीं. शेतकऱ्यांचें अज्ञानास त्याचें दारिद्र्यच बहुतांशीं कारणीभूत असलें तरी आहे त्या परिस्थितींतूनच मार्ग काढणें जरूर आहे. शेतकऱ्यांची स्थिती अेका दिवसांत सुधारणार नाहीं. कीं तो कोणत्याही झटपट मार्गानें शहाणा होअून आपल्या पायावर अुभा राहूं शकणार नाहीं. या दृष्टीनेंच प्रौढ शिक्षणाचा प्रश्न फार बिकट व गंभीर आहे. कारण पुढची पिढी व मागील पिढी यामधील हा दुवाच अगदीं ढिला व बलहीन असा झाला आहे.

प्रौढास साक्षर करणें, लिहितां वाचतां येअील असें शिक्षण त्यांना देणें जरूर आहे, परंतु त्यापेक्षांही त्यानां भोंवतालचे परिस्थितीचें ज्ञान करून देणें

जरूर आहे. आज त्यांच्या अज्ञानाचा फायदा स्वार्थसाधू लोक आपल्या कामाकरतां करून घेतात. तळें दुरुस्त करावयाचें आहे असें सांगून अेकादा स्वार्थसाधू अिसम खुशाल त्यांचे आंगठे अेकाद्या खोडसाळ मजकुराचें अर्जावर घेतो. ही परिस्थिती पालटणें जरूर आहे. सबब शाळाखात्यानें प्रत्येक खेड्यांतील शाळेंत प्रौढाकरतां शिक्षणाचे वर्ग भरविण्याची सोय करावी. शाळेंतील मास्तरास हें काम करण्यासाठीं दुय्यम शिक्षक द्यावेत. दररोज संध्याकाळीं किंवा रात्रीं अेक तास वीस वर्षाचे वरील व ५० वर्षाचे आंतील प्रौढास शिक्षण द्यावें. प्रथमत; हें काम किचकट व कंटाळवाणें होअील. शिक्षण देतां देतांच त्यांना परदेशांतील शेतकऱ्यांच्या गोष्टी सांगाव्या किंवा हें शिक्षण म्हणजे कांहीं जुलूम नाहीं, डोळे असून त्यांना आलेलें अंधत्व घालवणेचा मार्ग आहे. ही गोष्ट त्यांचे मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करावा. लग्नापायीं होणारा अवास्तव खर्च व त्यापासून होणारें कर्ज हें किती घातुक आहे याची माहिती संभाषणांतच त्यांना द्यावी. आठवड्यांतून अेक वेळ पाळक असतो त्या दिवशीं अेकादे वर्तमानपत्र नेमानें, त्यांना सामुदाअीक-रीतीनें वाचून दाखवावें. प्रथम प्रथम त्यांना वर्तमानपत्रांतील कांहींही मजकूर समजणार नाहीं हें खरें. पण वाचून झाल्यावर त्यांना वर्तमानपत्रांतील हकीकत संवाद रूपानें सांगावी. प्रथम त्यांना सर्वच गोष्टींचें शिक्षण द्यावें लागेल. अिंग्लंड म्हणजे काय, अमेरिका हा देश आहे कीं दुसरें काय आहे, मंत्री म्हणजे कोणास म्हणतात यांतील अेक अवाक्षरही त्यांना समजणार नाहीं. या दृष्टीनें प्रौढांचे वर्ग ज्या ठिकाणीं भरवावयाचें त्याठिकाणीं जगांतील सर्व मोठ्या देशांचे स्वतंत्र नकाशें युरोप, अमेरिका या खंडांचा व हिंदुस्तान, रशिया, जपान वगैरे राष्ट्रांचें नकाशें लावलेले असावे. विद्यमान पुढाऱ्यांचे व परदेशांतील थोर लोकांचे फोटो वेळोवेळीं वर्तमानपत्रांतून प्रसिध्द होतात त्यांची कात्रणें कार्डबोर्डवर चिकटवून तीहि लावावी. मोठ-मोठ्या पुरुषांची देशभक्तांची व लोकाग्रणींची छोटीं छोटीं चरित्रें यांचा संग्रही त्या ठिकाणीं असावा. अितकी सामुग्री प्रत्येक खेडेंगांवांत सज्य ठेवण्यास साधारपणें १०० ते १५० रुपये पुरें आहेत, अशा साधन सामुग्रीनें सज्य अशा ठिकाणीं प्रौढांचे वर्ग भरविले म्हणजे वर्तमानपत्र वाचत असतां

कोणत्याही देशाचा अगर पुरुषाचा अुल्लेख आलातर त्यांना तो देश नकाशावर दाखविता येअिल असा प्रयोग सुरु करणे कंटाळवाणे आहे हे खरें ; पण थोड्या अवधितच त्यांना बेताबेतानें बाह्य जगाचें ज्ञान होअूं लागेल, व त्या दृष्टीनें ते प्रश्नही विचारूं लागतील-प्रथमतः त्यांचे प्रश्न हे हास्यास्पद वाटतील. चीन ही कोणत्या देशाची राजधानी म्हणून कोणी विचारील. किंवा चर्चिल हा कोणत्या देशाचा राजा असा प्रश्न ते करतील. पण त्यामुळें अस्वस्थ न होता शिक्षकानें त्यास खरी माहिती द्यावी. प्रौढ शेतकऱ्यांस अशा तऱ्हेनें रोज माहिती देत गेल्यास अेका वर्षांतच ते स्वतःस वाचता आलें नाहीं तरी अेकादे वर्तमानपत्र नियमानें कोणाकडून तरी वाचवून घेतील. अशा तऱ्हेच्या विषयावर मुद्दाम तयार केलेले चित्रपटही त्यांना महिन्यांतून अेकवेळ दाखवावे म्हणजे त्यांची करमणूक होअून त्यांच्या ज्ञानांत भर पडेल. तसेंच केव्हां त्यांना अैतिहासिक थोर पुरुषांच्या चरित्रांतील कांहीं गमती सांगाव्या. केव्हां चालू युगांतील पुढाऱ्याची तोंड ओळख करून द्यावी. प्रौढ शिक्षण हा दीर्घकाल चालणारा अेक प्रयोग आहे हें विसरतां अुपयोगी नाहीं. वर्षांतून जत्रा होतात, अुत्सव होतात किंवा सार्वजनिक समारंभ होतात त्या त्या वेळीं शेतकऱ्यांना थोडेफार सांगण्याची संधी दवडूं नये. या सर्व गोष्टी पगारी मास्तर करूं शकणार नाहीं तर त्या खेड्यांतील कार्यकर्त्यांनीं हें मनावर घेतले पाहिजे. शेतकऱ्यांच्या अुद्योग धंद्यासंबंधीं कर्जबाजारीपणाचें चित्र किंवा व्यसनाचे दुष्परिणाम यासारख्या विषयांवर शैक्षणिक चित्रपट सरकारने तयार करून ते महिन्यांतून अेक वेळ तरी शेतकऱ्यास दाखविले पाहिजेत. त्यायोगे करमणूक व शिक्षण या दोन्ही गोष्टी साध्य होतील.

सर्व जगांत लोकसंख्येचे दृष्टीनें दुसऱ्या नंबरच्या आपल्या या देशास आज अवनत दशा प्राप्त झाली आहे. याची अितर कोणतीही कारणें असली तरी आपल्यामधील अज्ञान हें मुख्यतः जबाबदार आहे. अितकी मोठी मानवशक्ति आज निरुपयोगी होअून बसली आहे. व नदीवर तरंगणाऱ्या लाकडी ओंढ्याप्रमाणें ध्येयशून्य आयुष्य कंठीत आहे. वरीलप्रमाणें शिक्षणाचा कार्यक्रम आखल्यास निराशेतून आशेचे किरण दिसूं लागतील. पण

त्यांस वैयक्तिक स्वार्थ बाजूस ठेवून काम करणारे लोक पुढें येणें जरूर आहे. व तसें लोक तयार झाले तरच हा प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम यशस्वी होईल.

खेडेंगांवांतील काय किंवा शहरांतील काय मानवजात ही सर्व अेक आहे. पण आज दोहोमध्यें जें अंतर निर्माण झाले आहे तें जितक्या प्रमाणांत कमी होईल तितक्या प्रमाणांत खेडेंगांवची प्रगति होईल व हें कार्य म्हणजेच शिक्षण.

# शेती

वाचनालय ता. सातारा



गेल्या प्रकरणांत शिक्षणासंबंधीं विचार केला व त्यावरून खेड्यांतील प्रत्येक मनुष्याची मानसिक वाढ होण्याकरितां व विचारामध्यें भरीवपणा येण्याकरितां शिक्षणाची जरुरी आहे हें पहिलें. शिक्षण मनाची भूक भागवूं शकेल. पण मनाचा तरतरीतपणा शरीराचे बळकटीवरच अवलंबून आहे व ते शरीर वाढविण्याची शक्ति शिक्षणामध्यें नाहीं. "बळकट शरिरांतच खंबीर मन असतें" अशी अेक म्हण आहे. तेव्हां शरीर बळकट करण्याकरतां चांगल्या सकस अन्नाची जरुरी आहे व ते जर मिळाले नाहीं तर शिक्षण घेअूनही तें निरुपयोगी ठरेल. हिंदुस्थानांत शेंकडा ७० लोक शेतीवरच अुदरनिर्वाह करीत असल्यानें अन्नाचा विचार करतांना प्रामुख्यानें शेतीचाच विचार करणें जरुर आहे. कारण अन्न अुत्पादनाचा शेती हा अेकमेव मार्ग आहे. आज शेतीवर जेवढें अन्न पिकतें तें हिंदुस्थानांतील सर्व लोकांस पुरेल अितकें आहे काय? व नसल्यास अधिक अन्न अुत्पन्न करण्याचे मार्ग कोणते? किंवा कोणत्या साधनानी सर्व लोकसंख्येस पुरेल अितकें अन्न पिकविता येअील? अित्यादि अनेक प्रश्न या अन्नाबाबत विचार करतेवेळीं अेकदम पुढें राहातात. हिंदुस्थान हा शेती-प्रधान देश असल्यानें शेती सुधारणें बाबतींत विचार केल्यास हे प्रश्न सुटणारे आहेत.

शेती सुधारणेंबाबत विचार करावयाचा म्हणजे त्या शेतीवर जे लोक अवलंबून आहेत त्या लोकसंख्येचाही विचार करणें क्रमप्राप्तच आहे. शेतीचा मुख्य हेतु अन्न पिकविणें हा आहे. व तें अन्न देशांतील अधिकाधिक लोकांस जितक्या प्रमाणांत मिळेल तितक्या प्रमाणांत तो देश सुखी म्हणतां येअील. देशांतील जमीन वाढत नाहीं परंतु लोकसंख्या मात्र सारखी वाढत आहे. व यादृष्टीनें अन्न अुत्पादनाचीं क्षेत्रें मर्यादित व वाढती लोकसंख्या यांच्या मधील अंतर जितक्या प्रमाणांत वाढेल तितक्या प्रमाणांत भुके कंगालांची फुगेल. या सिद्धांताचा सांगोपांग विचार करण्याचें हे स्थळ नव्हें.

परंतु अन्नाचा व लोकसंख्येचा फार जिव्हाळ्याचा संबंध आहे म्हणून माल्थसच्या सिद्धांताचे थोडक्यांत विवेचन करणें अस्थानी होणार नाहीं. माल्थसच्या म्हणण्याप्रमाणें मानवी जीवितास अन्न हे अवश्य आहे. मनुष्याचें ज्ञान कितीही वाढलें, त्याची केवढीही सुधारणा झाली व त्यानें योगसाधनानें आपल्या मानसिक शक्ति कितीही वाढविल्या तरी मानवी आयुष्यास व मानवी कर्तबगारीस अन्नाची आवश्यकता आहे हे निर्विवाद आहे. माल्थसच्या मतें मनुष्य प्राण्यांत असलेली दुसरी गोष्ट म्हणणे लग्न करण्याची सनातन प्रवृत्ती. मानवी आयुष्यांतील या दोन गोष्टी अेकदा कबूल केल्या म्हणजे माल्थसच्या लोकसंख्येबाबतच्या मीमांसे विषयीं फारसा वाद रहात नाहीं. माल्थसच्या या मीमांसेचें रहस्य खालील विवेचनावरून स्पष्ट होअील.

कोणत्याही देशांतील लोकसंख्या ही अुपजीविकेच्या साधनांनी मर्यादित झालेली असते. त्याच्या मतें अन्नाची वाढ गणित श्रेढीनें होतें तर मनुष्याची वाढ भूमिती श्रेढीनें होते. अन्न व लोकसंख्या यांचा मेळ अखेरीस कधींच बसत नाहीं. अुपजीविकेच्या साधनांत धान्य हेंच मुख्यतः असल्यानें धान्याची व लोकसंख्येची वाढ कोणत्या प्रमाणांत होते व शेवटी त्याचा मेळ कितपत बसतो यावर देशाची भरभराटी अवलंबून आहे. कारण अेक तर सुपिक जमीन पृथ्वीवर मर्यादित आहे, आणि जमिनीच्या अेकंदर क्षेत्रांतही वाढ होण्यासारखी नाहीं. तेव्हां धान्य वाढविण्याचा अुपाय म्हणजे जी जमीन लागवडीखाली नाहीं ती लागवडीस आणणें व जी जमीन लागवडीस आहे त्यामध्यें जास्त प्रमाणांत खतमूत घालून अधिक धान्य पिकविणें. या अुपायांनी अधिक धान्य मिळेल. पण धान्य पिकविण्याच्या जमिनीची अेक ठराविक मर्यादा असतें तो पर्यंतच अधिक खतमूताचा किंवा मशागतीचा अुपयोग त्या जमिनीमध्यें केला तर धान्यवाढीचें कामीं त्याचा अुपयोग होअील. पण ही मर्यादा ओलांडल्यावर अधिक खतमूत किंवा मशागतीनें वाढत्या प्रमाणांत धान्याचें अुत्पादन होणार नाहीं. कारण त्या ठिकाणीं 'Principle of diminishing returns लागू पडतें व या सर्वांचा परिणाम असा होअील कीं, वाढत्या लोकसंख्येस अन्नाचा तुटवडा पडूं लागेल. जगांतील वाढत्या

लोकसंख्येस जर पुरेसें धान्य मिळणार नाहीं तर संतती पूर्ण वाढीची व निरोगी होणार नाहीं. या दृष्टीनें वाढत्या लोकसंख्येस तोंड देण्यास तितक्याच प्रमाणांत अन्नाची वाढ झाली पाहिजे. लोकसंख्या व अन्नाचें अुत्पादन यांचे प्रमाण व्यस्त पडूं लागेल तर त्या देशांत कलह, अशांतता आणि गुन्हेगारी प्रवृत्ति वाढेल म्हणून वाढत्या लोकसंख्येस आळा घालणेकरितां व ती अन्नाचे पातळीवर यावीं म्हणून मनुष्य जातीतील लग्नाची जी नैसर्गिक प्रवृत्ति ती कांहीं काल पुढें ढकलणे खेरीज माल्थसच्या मते दुसरा मार्ग राहात नाहीं. आपल्या कुटुंबाचे व भावी काळांतील आपल्या मुलांचे संगोपन करण्याचें सामर्थ्य येअीपर्यंत शुध्द राहून लग्न लांबणीवर टाकणें यासच माल्थसने ब्रम्हचर्य म्हटले आहे. लोकसंख्या रोगराअीनें किंवा नैसर्गिक मरणानें कमी होते. परंतु तितक्याच प्रमाणांत ती जननामुळें वाढतेही व त्यास आळा बसण्याच्या दृष्टीनें ज्या ठिकाणीं अन्नाचे अुत्पादन कमी आहे त्याठिकाणीं ब्रम्हचर्यानें किंवा अनकूल परिस्थिती येअीपर्यंत लग्न पुढें ढकलून जनन थांबविणें असें माल्थसचे म्हणणें. अन्नाचें अुत्पादन व त्यावर अवलंबून असणारी लोकसंख्या यांचा समन्वय करण्याचा प्रयत्न प्रत्येक अर्थशास्त्रज्ञ करतांना आढळून येतो व ज्यावेळीं अुत्पादित अन्नाचा व लोकसंख्येचा मेळ बसेना त्यावेळीं प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ माल्थस याचे लोकसंख्या वाढीच्या मीमांसेंचा अुगम झाला. माल्थसच्या या निबंधानें त्या वेळच्या लोकांत खळबळ अुडाली परंतु हा निबंध लिहिण्यामध्यें समाजांतील दारिद्र्याचें अेक कारण दाखविणेंचा माल्थसचा मुख्य हेतू होता. मनुष्यामध्यें लग्नाची स्वाभाविक अिच्छा आहे, व तिचा परिणाम लोकसंख्या वाढविण्याचें कामीं होतो व वाढत्या लोकसंख्येस अन्न मिळालें नाहीं तर समाजांत दुःख, संकटे, अर्धपोटीपणा व गुन्हे अुत्पन्न होतात. आणि हें अनर्थ नाहींसे करण्याकरितां ब्रम्हचर्याची कल्पना खालच्या लोकांत रूढ करणें जरूर आहे. असा माल्थसच्या सिध्दांताचा थोडक्यांत निष्कर्ष आहे. आपल्या कुटुंबाचे व भावी पिढीचें संगोपन करण्याचें सामर्थ्य आल्याखेरीज लग्न करावयाचे नाही. अशा प्रकारची भावना लोकांमध्यें अुत्पन्न झाली पाहिजे व तसें शिक्षण खालच्या वर्गास मिळालें पाहिजे. असें त्याचें म्हणणें होते. याचा अर्थ

कोणी कधीं लग्नच करूं नयें असा नसून अुलटपक्षीं अुपजीविकेचीसाधनें वाढतील आणि अन्नाची पैदास जितक्या जास्त प्रमाणांत होअील त्यामानानें लोकसंख्या वाढावी असें त्याचे म्हणणें होतेच. फक्त जी लोकसंख्या वाढेल तिला प्रथम भरपूर व निर्वाहाची सोय भागविणारें अन्न अगोदर अुत्पन्न झाले पाहिजे. माल्थसच्या या विवेचनांत मतभेदाचे मुद्दे असतील, नाहीं असें नाहीं, पण त्यामुळें अेक गोष्ट मात्र आपल्यास समजून येते ती ही कीं, वाढत्या लोकसंख्येच्या पोषणास तितक्याच प्रमाणांत अन्नाची पैदास होणे जरुर आहे व तशी पैदास झाली नाहीं तर देशांत दारिद्रय, अशांतता व गुन्हेगारीचा जोर होअील.

अन्नाची वाढ व लोकसंख्या यांचा परस्पर संबंध वरील विवेचनावरून स्थूलमानानें दिसून आलेला आहे व या दृष्टीनें विचार करतां हिंदुस्थानची आजची लोकसंख्या ही बेसुमार वाढली आहे काय? अन्नधान्य पिकविण्याचे अुपलब्ध मार्ग आज त्या वाढत्या लोकसंख्येचे भरण पोषण करण्यास असमर्थ आहेत काय ? व तसें असल्यास अन्नधान्याची अुत्पत्ति वाढविण्याचे कांहीं अुपाय आहेत काय ! या सर्वांचा क्रमशः विचार करणें जरूर आहे.

हिंदुस्थानची लोकसंख्या सुमारे ७५ वर्षांपूर्वी अंदाजे २० कोटी ६० लक्ष होती. सन १९३१च्या खानेसुमारीस ती ३५ कोटी झाली व सन १९४१ चे खानेसुमारीस सदर संख्या ३८ कोटी ९० लक्षापर्यंत वाढली. म्हणजे सर्वसाधारणपणें लोकसंख्येच्या वाढीचें प्रमाण वर्षास ५० लाख पडतें जगांतील लोकांत लोकसंख्येची वाढ करण्यामध्यें हिंदुस्थानानेंच विक्रम केला आहे. असें म्हणण्याचें कांहींच कारण नाहीं. अिंग्लंड, अमेरिका, रशिया व जपान या देशांचीही लोकसंख्या गेल्या ५०-६० वर्षांत भरमसाट वाढली आहे. लोकसंख्या वाढीचे प्रमाण हिंदुस्थानचे शेंकडा ३० टक्के पडतें तर अिंग्लंड, रशिया व जपान यांचें प्रमाण शेंकडा अनुक्रमें ७७।११३।११५ पडतें परंतु ते देश स्वतंत्र आहेत. त्यांनीं औद्योगिक वाढ केली आहे; वसाहती संपादन केल्या आहेत व शेतीच्या अुत्पन्नांचें प्रमाण मोठ्या प्रमाणावर शेत

करून किंवा सुधारलेली शेती करून शेतीवर खतपाणी जास्तींत जास्त चांगलें व अुत्तम वापरून व अधिकाधिक पीक काढून त्या देशांनीं वाढलेल्या लोकसंख्येच्या पोटाची सोय केली आहे. हिंदुस्थानची परिस्थिति मात्र वेगळी राहिली. देशास स्वातंत्र्य नसल्यानें औद्योगिक वाढ बिलकूल झाली नाहीं व सर्व लोकसंख्येस बहुतांशीं शेतीवर राहण्याचा प्रसंग आल्यानें अुपासमारीचें भेसूर चित्र समोर दिसूं लागलें हिंदुस्थानची लोकसंख्या बेसुमार वाढलेली नाहीं. अुपजीविकेचे त्यांचे अितर सर्व मार्ग बंद केलेले आहेत. औद्योगिक वाढ नाहीं व शेतीचे बाबतींतही पूर्ण अज्ञान स्थिति राहिल्यानें भूमीचा बहुमोल ठेवा असूनही आज आपल्यापैकीं कित्येकांना अर्धपोटीं राहावें लागत आहे. हिंदुस्थानांतील अुपासमारीस सरळ व योग्य कारण देतां येत नसल्यानें व सदोष राज्यपद्धति हेंच अेकमेव कारण असल्यानें हिंदुस्थानची लोकसंख्या वाढली आहे अशी सोअीस्कर सबब पुढें केली जाते. अेका अिंग्रजी ग्रंथकाराचा पुढील अभिप्राय लक्षांत ठेवण्यासारखा आहे. " सध्याचें अन्नोत्पादन अगदीं अपुरें आहे ही गोष्ट अगदी खरी आहे. तथापि अशी तूट भासण्याची कारणें अुत्पादनाची सदोष पद्धति आणि अुपलब्द साधन संपत्तीची वाढ करण्याकडे होत असलेलें दुर्लक्ष ही आहेत फाजील लोकसंख्या हें खरें कारण नाहीं. तसें पाहिल्यास आपल्या साधन संपत्तीचा भरपूर फायदा हिंदुस्थाननें घेतल्यास तो सध्यापेक्षाही कितीतरी जास्त लोकांचें पोषण करण्यास समर्थ होअील. लोकसंख्या वाढीचें प्रमाण हें हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें कारण नाहीं. त्याचा आर्थिक विकास खुंटवून टाकण्यांत आलेला आहे. हेंच त्याचें खरें कारण आहे. "

कोणताही देश आपल्या देशांत पिकणाऱ्या अन्नधान्यावर स्वयंपूर्ण नाहीं. त्याला दुसऱ्या देशावर अवलंबून बसावें लागतेंच. पण त्या देशामध्यें औद्योगिक सुधारणेमुळें व वाढीमुळें तेथील प्रत्येक व्यक्तीची आर्थिक स्थिति सुधारून त्याची क्रयशक्ति वाढते व त्याचाच परिणाम त्यास अितर ठिकाणाहून काय पडेल ती किंमत देअूनही अन्नधान्याची पैदास करतां येते. पण दुर्दैवानें हिंदुस्थानच्या बाबतींत मात्र औद्योगिक वाढीच्या पूर्ण अभावामुळें कच्च्या मालाच्या अगदीं अल्प किंमतींत होत असलेली निर्यात व अुलट पक्का माल

घेण्याकरितां भरावा लागणारा जबरदस्त भुर्दंड यामुळें गेल्या शंभर वर्षांत झालेल्या भयंकर Exploitation मुळें या देशांतील लोकांची आर्थिक हलाखी झाली. हिंदुस्थानामध्यें औद्योगिक वाढ किंवा संपत्तीच्या अुत्पादनाचे मार्ग अुपलब्ध झाले नसलेनें शेती हें अुपजीविकेचें अेकमेव साधन होअून बसलें आहे

आपल्या देशांतील शें. ७० लोक शेतीवर अुदरनिर्वाह करणारे आहेत व त्या दृष्टीनें शेतीमध्यें सुधारणा केल्यास जरी ती अेकमेव साधन म्हणून असली तरी अुपासमारीचे संकटाचें थोडेफार निवारण केल्यासारखे होअील. हिंदुस्थानची अेकंदर जमीन शंभर कोट अेकर आहे व त्यापैकीं ३६ कोट अेकर जमीन लागवडीखालीं आहे व आणखी २५ कोटी अेकर जमीन लागवडीखाली येणेंसारखी आहे. सदर जमीन लागवडीखालीं आणणेंची झाल्यास ती अेकदम आणता येणार नाहीं. त्याचे दर वर्षीं थोडे थोडे भाग पाडून ते शेतकऱ्यांना लागवडीस दिले पाहिजेत. प्रथमतः ही गोष्ट अमलांत आणणेकरितां अवाढव्य खर्चही करावा लागेल पण तो सरकारनें करणें जरूर आहे. खाजगी व्यक्तीस ही गोष्ट आर्थिक दृष्या फायदेशीर होणार नाहीं.

कोल्हापूर संस्थानचेच अुदाहरण घेतलेस कोल्हापूरचे अेकंदर क्षेत्र १३७७६६० अेकर आहे व लोकसंख्या अंदाजे ९ नअू लाख आहे. सदरहू तेरा लक्ष अेकर वट्ट क्षेत्रापैकी शेती खालील असलेलें क्षेत्र सुमारें सव्वासात लक्ष अेकर आहे व दोन लक्ष नव्वद हजार अेकर पड आहे. वीस हजार अेकर शेतीसाटीं अुपयोगीं पडेल अशी जमीन आहे दोन लक्ष नव्वद हजार पड ( यांतील कांहीं जमीन दरवर्षीं लागवडीस येते ) व वीस हजार अेकर लागवडीस येण्यासारखीं मिळून सुमारें तीन लक्ष दहा हजार अेकर जमीन पिकाखाली येण्यासारखी जमीन मिळून अंदाजे १०,५०,००० अेकर जमीन लागवडीखाली येअील. व त्याचें प्रमाण लोकसंखेशी पहातां ते दरमाणशी १·१ अेकर पडतें. जर पड व लागवडीखाली येणारी सर्व जमीन लागवडी खालीं आली तर संस्थानचें हें दरमाणशी प्रमाण त्यास जगता येअील अितके चांगले आहे यांत संशय नाहीं. कारण तज्ञांच्या गणिता प्रमाणें चांगल्या जेवणास दर माणशीं

सुमारें तीन अेकर जमीन पाहिजे. व सामान्य आहारास दर माणशीं १·२ अेकर जमीन पाहिजे. त्या दृष्टीनें पाहतां वरील प्रमाण ( १·१ ) कांहीं वाअीट नाहीं. पण सर्वांमध्यें हा मोठा " पण " आहे. कारण सदर प्रमाण पडण्यास सरकारास सुमारें तीन लक्ष पस्तीस हजार अेकर जमीन लागवडीखालीं आणावी लागेल व ही गोष्ट दिसतें तितकी सोपी मुळींच नाहीं. " अधिक धान्य पिकवा " ची मोहीम सध्यां युद्ध कालांत जिकडे तिकडे चालू झाली. तंबाकू, कापूस व मिरची ही पिकें मर्यादित किंवा कांहीं ठिकाणीं पूर्ण बंदी करून ते क्षेत्र खाद्यधान्याचें अुत्पादनाकडे आणलें गेले त्याचा परिणाम असा झाला की, खाद्यधान्यांच्या पिकांत थोडीफार वाढ झाली. युद्धकाळापर्यंतच अशा तऱ्हेनें वरील पिकांवर निर्बंध घातले तर चालण्यासारखें आहे. कारण वरील पिकेंही Money Crops आहेत. व जर ती पिकें न होतील तर शेतकऱ्यांस त्याच्या अितर गरजा भागविणें करितां पैसा मिळणार नाहीं. यादृष्टीनें अधिक धान्य पिकवावयाच्या मोहिमेतील वरील पिकांवर निर्बंध घालून त्या क्षेत्रांत खाद्यधान्य पिकविणें हा तूर्तचा युद्धकाळापुरतां कार्यक्रम असला तरी अेकंदरीनें अधिक धान्य पिकवा ही मोहीम जे क्षेत्र सध्यां खाद्यधान्याखाली आहे किंवा जे क्षेत्र अशा पिकांस पुढें अुपलब्ध होण्यासारखें आहे अशा क्षेत्रांमधून कोणत्या मार्गानें जास्तींत जास्त पीक काढतां येअील या गोष्टीवरच केंद्रीभूत होणें जरूर आहे. अधिक धान्य पिकवा हाहीं खेडेंगांवातील शिक्षणाप्रमाणेच अेक दीर्घ चालणारा प्रयोग आहे. चालू गरजेपुरती अुपयोगी पडणारी ती मधली वाट खास नाहीं Intensive Agriculture किंवा ज्यास अधिकांत अधिक अुत्पन्न काढतां येण्यासारखी शेती म्हणतां येअील त्याबद्दल आतां विचार करूं. आपल्या जमिनित सध्यां जें पिक निघतें तें अितर देशाच्या जमिनीत होणारे पिकाशी तुलना करतां फार कमी भरतें. अुदाहरणार्थ हिंदुस्थानांत तांदूळ अेकरी ८०० पौंड निघतो तर चीनमध्यें १००० पौंड निघतो, अीजिप्तमध्यें २००० पौंड, तर सर्वांत अधिक म्हणजे तीन हजार ३००० पौंड अिटलींत निघतो. याप्रमाणेंच सर्व पिकांची थोडीफार स्थिति आहे. शेती सुधारणेचे मार्ग पुष्कळ आहेत त्यापैकीं कांहीं खाली दिले आहेत.

**कालवे :—** हिंदुस्थानांत पाऊस सर्वसाधारण बरा पडतो. पण कित्येक वेळां पावसाचें पाण्यावर अवलंबून राहिल्यामुळें अतिपुरामुळें किंवा पावसाच्या अभावामुळें निखालस अवर्षणाचे प्रसंग येतात. पाऊस पडतो मग काळव्याची जरुरी काय ? असा कोणी सहज प्रश्न विचारील. पण त्याचें थोडक्यांत असें अुत्तर देतां येअील कीं, पाअूस पडतो तर आपल्या पिण्याचा पाण्याकरितां विहिरीची काय जरुर ? तळ्याची काय जरुर ? कोणी ही असेंच म्हणेल कीं, "अहो पाअूस पडला म्हणून तो कांहीं बारा महिनें पडत नाहीं. तेव्हां सर्व काळीं सारखा पाण्याचा पुरवठा माणसांस मिळावा म्हणून विहीरी किंवा तलाव यांची जरुरी आहे" माणसांना नियमीत पाणी पुरवठा पाहिजे मग ज्यावर माणसांचे जीवन अवलंबून आहे त्या पिकांना देखील नियमीत पाणीपुरवठा पाहिजेच. पिकानाही नियमीत पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून कालव्यांची जरुरी आहे. कालवे झाले तर अुन्हाळी पिकें काढतां येतील. पाअूस नसेल तेव्हां कालव्यांचें पाण्याचा अुपयोग करून पिकें जगविता येतील. अुसासारख्या पिकांना त्याचा बाराही महिने अुपयोग होअूं शकेल; व यामुळें पिकाची वाढ होअून जमिनिचे अुत्पन्न वाढेल. पडीत जमिनीना कालव्याचें पाण्याची जोड मिळाली तर थोड्या काळांतच त्या जमिनीना नंदन वनाचें स्वरूप येअील. अितकेच नाहींतर लागवडी खालील जमिनीनाही जर योग्य प्रमाणांत व नियमीत पाणी पुरवठा होअील तर त्या जमिनीतूनही दुप्पट पीक अुत्पन्न होअील. अमेरिकेंत कॅलिफोर्नियांत कालव्याचे पाण्यानें मैलाच्या मैल लांबीच्या बागा डोलतांना दिसतात त्या पाण्याच्या विपुलतेमुळेंच आपल्याकडे मात्र कालव्याचे पाण्याची कल्पना आपणांस अेकदम पटत नाहीं. कारण तशातऱ्हेचें फारच थोडें प्रयोग हिंदुस्थानांत केले जातात हे होय. सध्यां सरकारचें लक्ष ( Minor Irrigation schemes ) लहान प्रमाणावर बंधारे बांधण्याकडे जात आहे. तेव्हां लोकांनीं आपआपल्या भागामध्यें बंधारा बांधला असता पाणी साचूं शकेल अशी (Catchment area) कोठे जागा असेल तो भाग सरकारचे नजरेस आणावा. कारण अशातऱ्हेनें लहान लहान बंधारे झाल्यास त्या भोंवतालची जमीन पाण्याखाली येअील. व त्या जमिनीचें

पाने १३१ राजा २८

अुत्पन्न वाढूं शकेल. अशा बंधारे बाबतच्या योजना लोकांमधील जे हुषार लोक असतील त्यांनीं सरकारपुढें ठेवल्यास सरकारला विचार करणेस बरें पडेल. पण बंधाऱ्यांनी शेतीस अुपयोग होतो ही गोष्ट कांहीं लोकांस माहीत नसते. मग अशा योजना ठेवण्याचा प्रश्न बाजूसच राहो. ही गोष्ट अज्ञ शेतकऱ्यांस समजाअून सांगणें हे त्यांच्या पुढाऱ्यांचें काम आहे.

(२) **सामुदाअीक शेती**:—सामुदाअीक शेती म्हटले कीं, रशियातील मोठ्या प्रमाणांतील शेतीचें चित्र डोळ्यापुढें अुभें राहतें. तेथें सर्व शेती व अुद्योगधंदे हे सरकारच्या मालकीचे असल्यानें प्रत्येक व्यक्ति ही ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणें व बुद्धीप्रमाणें शेतीमध्यें किंवा ओद्योगिक कारखान्यांत काम करते. व आपले निर्वाहाचें वेतन मिळविते. यामुळें मोठ्या प्रमाणावर शेती तेथें करतां येते. शेंकडो अेकराच्या जमिनी यांत्रिक सहाय्यानें नांगरता येतात. व शेतीचें अुत्पादन राक्षसी प्रमाणांवर करतां येते. या योजनेबाबत कोणी असा आक्षेप घेतील कीं, सरकारच्या या कृत्यानें प्रत्येक मनुष्य मजूर होअील. त्याला आपलें शेत, आपला कारखाना, व आपले स्वतःची गिरणी असा आपलेपणा धंद्यांत न राहिलेनें तो काम मन लावून करणार नाहीं. परंतु हा आक्षेप बरोबर नाहीं. कारण प्रत्येक मनुष्याचे श्रम हे त्याच्या कामाचें मोल असल्यानें तो जितकें अधिक काम चांगलें प्रकारें करील तितकें अधिक वेतन त्यास मिळेल. शिवाय सर्व अुद्योगधंदे किंवा शेती सरकारच्या मालकीचे असें गृहीत धरल्यानें मालक व मजूर असा भेदही शिल्लक राहात नाहीं. कारण सरकार म्हणून ज्यास तेथें संबोधिले जाते ते त्याच मजूर वर्गापैकीच असतें व त्या सरकारचा अुद्देष प्रत्येक काम करणाऱ्या मनुष्यास त्याच्या चरितार्थास पुरेल अितके वेतन देणें व काम करणारा मनुष्य अुपाशी न ठेवणें, हाच आहे; व तो रशियाच्या दशवार्षिक कार्यक्रमाचे सिंहावलोकन करतां यशस्वी झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. बेकारी किंवा अुपासमारी यानें जगांतील सर्व देशांना थोड्याफार प्रमाणांत हैराण केलें आहे त्यास कारण संपत्तीची विषम वांटणी हे असूं शकेल. किंवा अितरही सामाजिक कारणें असतील. पंथभेद किंवा जातीभेद यामुळेंही

समाजाची स्थिति विस्कळीत होते. कारणें कांहींही असली तरी रशियानें आपल्या देशांतील प्रत्येक माणसाच्या पोटाचा प्रश्न सोडविला आहे. ही गोष्ट समाजसत्तावादाच्या विरोधकानाही मान्य करणें भाग आहे. अर्थात् ही राज्य-पद्धति चांगली की वाअीट याबाबत प्रस्तुत ठिकाणीं विचार करणेचा नाहीं. पण फक्त ' सामुदाअीक शेती ' हा शब्द अुच्चारतांना कोणती कल्पना मनांत अुभीं राहते अेवढेच दाखविणेचा हेतु आहे. हिंदुस्थानांत शेतकरी हा आपल्या लहान कां असेना प्रत्येक तुकड्याचा मालक असतो किंवा अशा मालकांकडून तो खंडानें जमीन पत्करतो. या दृष्टीनें सामुदायीक शेती याचा अर्थ शेताचे लहान तुकडे असणाऱ्यांनी आपली शेती अेक ठिकाणीं करणें असा आहे. समजा अेकाद्या शेतकऱ्यांनें अेक किंवा दीड अेकर जमिनींत अुस लावला तर सदर अुसाचें मळीत स्वतंत्रपणें करणें त्यास खर्चाचें होते व म्हणून तो शेजारच्या मळ्यामध्यें आपल्या अुसाचे मळीत करील व त्यायोगें त्याला कमी खर्च येअील. त्याचप्रमाणें तीन चार अेकराचे तुकडे असणारे पांच शेत-करी जवळ जवळ आहेत त्यांना प्रत्येक तीन अेकराचे पीक करण्यास खर्च फार येअील. प्रत्येकास स्वतंत्र बैल ठेवावे लागतील. बांध स्वतंत्र राखावें लाग-तील व लहान लहान तुकड्यांत पीकही अपुरे येअील. अन्नधान्य व पैसा देणारे पीक ( money Crops ) ही दोन्हीही त्यास पिकवितां येणार नाहींत. परंतु त्याच पांच जणांनीं जर १५ अेकर शेती सर्वांमध्यें मिळून केली तर त्यांना श्रम कमी पडून चांगले पीक मिळेल व तेही कमी खर्चांत मिळेल. शिवाय अन्नधान्या व्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या वरकड खर्चास त्यास पैसा देणारी पिकें लागतात व अशा तऱ्हेचीं पिकें या सामुदायीक शेतींत काढतां येतील. यामुळें त्यांच्यापैकीं प्रत्येकास स्वतंत्र जनावरें ठेवण्याचें कारण पडणार नाही. व शेताचें क्षेत्र वाढल्यानें अर्थातच त्याचा कसही वाढ-विण्यास निरनिराळीं खतें वापरून पूर्वीं तीन अेकराच्या तुकड्यांत प्रत्येकास जेवढें पीक येत होते त्याच्या दुप्पट पीक प्रत्येकास मिळेल. परंतु या गोष्टीचे ज्ञान शेतकऱ्यांस नाहीं. लहान लंगोटी अेवढीं कां असेना आपले शेत या अडाणी भावनेनें ते अेकत्रितपणानें पिकविण्यास तो तयार होत नाहीं. सरकारनें याबाबत कांहीं अुपाययोजना केली पाहिजे. कारण ज्या गोष्टी

बहुजन समाजाच्या हिताच्या आहेत त्यांचें ज्ञान त्या समाजास होत नसेल तर तें ज्ञान होअीपर्यंत वेळप्रसंगीं कायद्याचा अुपयोग करणें सरकारचें कर्तव्य ठरतें. अिंग्रजी राज्यपद्धति Principle of lacies Fare यावर आधार लेली आहे. लोकांच्या सर्व साधारण कामांत सरकारनें ढवळाढवळ करणेची नाहीं. कायदा व सुव्यवस्था पाहाणें हें सरकारचें काम आहे असा या तत्वाचा मूळ अर्थ. पण हें तत्त्वही पूर्णपणें अमलांत आणणें कोणत्याही सरकारास शक्य नाहीं. लहान मुलांना गिरणींत कामास पाठविणेचे नाहीं अशासारखे कायदे सरकारला करावें लागतात. यादृष्टीनें सामुदाअीक शेतीबाबत सरकारनें कांहीं सक्तीची अुपाय योजना करणें जरुर आहे. कोकणांत गुंठा पाव गुंठ्यापर्यंत अितक्या लहान आकाराचे तुकडे पडतात व त्यामुळें अर्धागुंठा शेत पिकविण्याचें कामीं शेतकऱ्यांच्या श्रमांचा प्रचंड अपव्यय होतो. किमान तीन अेकराचे आंत शेताचा तुकडा पडताच कामा नये. असा कायदा सरकारनें ताबडतोब अमलांत आणला पाहिजे व जे बारीक तुकडे असतील ते अेकत्र करून त्याचे किमान तीन अेकराचे गट तयार केले पाहिजेत.

(२) खतें:- शेतीचें अुत्पन्न हे जमिनीच्या मशागतीवर जसें अवलंबून आहे तसेंच किंवा त्यापेक्षांही जास्त हें जमिनींत पडणारे खतावर अवलंबून असतें. मनुष्याच्या शरीरास सारखें काम असतें व त्यांस जर रोजच्या अन्नातून पोषक द्रव्यें मिळाली नाहींत तर काम करण्यास पुढें पुढें ते निरुपयोगी होअील. त्याप्रमाणेंच जमिनींत अेकसारखीं पिकें काढत गेल्यास जमिनींचा कस कमी होअील व जर तो कस वाढविण्याचें व टिकविण्याचे कांहीं अुपाय योजले नाहींत तर ती जमीन चांगले पीक देण्यास निरुपयोगी ठरेल. शेतकऱ्याने अत्यंत कमी मेहनतीनें मिळणाऱ्या शेणखतासारखा खताचा अुपयोग योग्य प्रकारे केल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यास झाल्याशिवाय राहणार नाहीं. शेतकऱ्यांच्या परड्यांत शेणखताच्या गायरी असतात पण त्यामध्यें शेण मूत, पाला पाचोळा, वगैरे व्यवस्थित टाकून त्याचा खत म्हणून अुपयोग करतां यावा असा प्रयत्न किती शेतकरी करतात ? शेणाच्या शेणी लावून किंमत येते म्हणून त्या विकण्यापूर्वी आपण अेका नैसर्गिक व मोल्यवान, शेतीस

अवश्य असलेल्या अेका संपत्तीची नासाडी करीत आहो याची कल्पना किती शेतकऱ्यांना येत असेल ! शेणखत हे जरी अेकमेव खत नसले तरी शेणखताच्या योग्य अुपयोगानें ते न वापरतां जेवढें पीक निघेल त्याच्या तिप्पट पीक, हें खत वापरून निघते असें प्रयोगानें सिद्ध झालें आहे. या शिवाय हाडाची पूड, अमोनियम सल्फेट, वगैरे तऱ्हेचीं खतें आहेत व कोणत्या जमिनीस आणि कोणत्या पिकांस कोणत्या जातीच्या खताची जरुरी आहे व कोणती खतें जास्त अुपयोगीं होतील याची शास्त्रशुद्ध माहिती शेतकऱ्यांना अुपलब्ध करून दिली पाहिजे. अशा तऱ्हेची माहिती मॅजिक-लॅंटर्न्सवर चित्रें दाखवून त्याची अुपयुक्तता शेतकऱ्यांना पटवून देणें जरुर आहे. गेल्या प्रकरणांत प्रौढ शिक्षणाचा जो भाग सांगितला त्यामध्येंच अशा तऱ्हेचें व्यवहारोपयोगीं व शेतीस अुपयोगी पडणारें शिक्षण शेतकऱ्यांना देणें हा त्या शिक्षणांतील अेक महत्वाचा भाग आहे.

खताची अुपयुक्तता शेतकऱ्यांस पटली तरी तें घेण्यास त्याचेजवळ पैसा नसतो व ही पैशाची अडचण फार मोठी आहे. या दृष्टीनें खतें, बीबियाणें; अौत, नांगर वगैरे पुरविणाऱ्या सोसायटीज प्रत्येक खेडेगांवांत स्थापन होणें जरूर आहे. प्रत्येक शेतकऱ्यास अेकादा रुपाया प्रवेश फी ठेअून त्या संस्थेचे सभासद करून घ्यावे व त्या संस्थेमार्फत खतांचा पुरवठा शेतकऱ्यांना करावा. ज्यास्त खतें विकत घेण्याची अेपत नसेल त्याचेकडून खताच्या किंमतीवर व्याज आकारून कर्ज रोखा लिहून घ्यावा व त्यास खत पुरवावें. पीक निघाल्यावर प्रथम ही रक्कम शेतकऱ्यानें द्यावी. व या दृष्टीनें प्रथम सुरवात म्हणून प्रत्येक खेड्यांत शेतकी सहकारी संस्था स्थापन करणें हें खेडेगांवच्या लोकांचे काम आहे. खेडेगांवांतील कार्यकर्त्यांनीं अशा संस्थाची अुपयुक्तता शेतकऱ्यांना पटवून दिली पाहिजे.

**(४) निवडक बी बियाणें:**—खता अितकाच महत्वाचा प्रश्न निवडक बी बियाणांचा आहे. जमीन नांगरून मशागत चांगली केली त्यांत

अुत्तम खत घातलें, पाअूसही अुत्तम पडला किंवा कालव्याच्या पाण्याची सोय चांगली केली असली तरी जमिनींत पेरण्यास जर अुत्तम बी नसेल तर अितकें श्रम करूनही पीक चांगलें येणार नाहीं. दरवर्षी पिकणाऱ्या दाण्यापैकींच बी काढून ठेवले व पुढल्या वर्षी पुन्हां तेच पेरले व असा क्रम अव्याहत चालू ठेविला तर कालांतरानें ते बी योग्य प्रमाणांत धान्योत्पादन करण्यास असमर्थ होतें. शिवाय दरवर्षी बियांत भेसळ होते ही गोष्ट निराळीच. आजरे तालुका हा काळ्या जिरगा किंवा आंबेमोहोर भाताबद्दल प्रसिद्ध आहे, परंतु अलिकडे सदरचें भात हे पंचवीस वर्षापूर्वी असलेल्या भातापेक्षां भेसळ झालेले असें दिसून येतें. पैसे जास्त यावे म्हणून शेतकरी या भातांत दुसरे जातीचें व त्यांत तें मिसळून जाअील असें भात मिसळतो व तेच बीयाकरतां वापरीत गेल्यानें सदरचे भात हे निकृष्ट दर्जाचे झाले आहे. निवडक बी वापरल्यास कांहीं टक्के तरी पीक अधिक खास येअील व हे ज्ञान शेतकऱ्यांस करून देणें अगत्याचें आहे व अशा तऱ्हेची बी बियाणें मिळण्याची व्यवस्था शेतकरी संघाकडून झाली पाहिजे.

(५) **जमिनीची धूप:**—वरील प्रकारचा सर्व सिद्धांत झाला तरी जमिनीच्या पिकाबाबत अेक मोठी धोंड आहे. व ती सहजासहजीं कोणाच्या लक्षांत येत नाहीं; ती म्हणजे जमिनीची धुपून जाण्याची क्रिया ही होय. पूर्वी हिंदुस्थानांत दाट अरण्यें होती पण ती पुढें लाकूड फाटयाचे तुटवड्या-मुळें किंवा अन्य कारणानें तुटून जात चालली व त्याचा अेक वाअीट परिणाम असा झाला कीं, जमीन धुपून जाअूं लागली. शिवाय नदीच्या पाण्यानेही जमीन वाहून जाते व यास प्रतिबंधक मार्ग म्हणजे नदीच्या पात्रांत झाडें लावणें हा आहे. त्यामुळें जमीन वाहून जाणार नाहीं. तसेंच ज्या ठिकाणीं चढ अुतार जमीन आहे त्या ठिकाणीं ताली घालून त्यो धुपून जाण्याच्या क्रियेस प्रतिबंध करणे. नाहींपेक्षां जमिनीची कितीही मशागत केली किंवा त्यांत कितीही अुत्तम खत घातले किंवा बी-बियाणें वापरलें तरी पावसानें जमीन धुपून जाअून हीं खतें व बी-बियाणें पार वाहून जातील.

**सहकारी पतपेढ्या व माल विक्री संस्था** (Co-operative Credit & Marketing Societies):— वरीलप्रमाणें शेतीची

अेकंदर सुधारणा केल्यास आज शेतीपासून अुत्पादन होणाऱ्या पिकांपेक्षां कितीतरी पटीनें जास्त पिकें अुत्पन्न होअूं शकतील व शेतकऱ्यांची स्थिति खात्रीनें सुधारेल. परंतु अुत्पादन होणारा शेतीचा माल हा सांप्रत दलालांच्या हातात जात असलेनें शेतकऱ्यांस त्यानें पिकविलेल्या मालाचा योग्य मोबदला मिळूं शकत नाहीं. अेकतर त्याच्या दारिद्र्यावस्थेंमुळें शेतकरी सबंध वर्षभर अडत दुकानदारांकडून किंवा सावकारांकडून बियाकरितां, खताकरितां, किंवा पोटाकरितां रकमा कर्जाअूं घेत असतो व त्यामुळें शेतांत पिकविणारें मालावर त्यांचा अग्रसेर हक्क अुत्पन्न होअून ते खळ्यावरच आपला वाटा अुचलतात. खताकरितां किंवा बियाकरितां जर शेतकऱ्यांनें २५ रुपये नेले असले तर त्याचा कागद सावकार ३० रुपयांचा लिहून घेतो. व त्यामध्यें शेतांत पिकलेलें धान्य ठराविक दरांत मोडण्याचे असा करार असतो. याद्दष्टीनें विचार केल्यास २५ रु. कर्जाअूं घेतलेल्या शेतकऱ्यांस सुगीचे वेळीं ५० रु. चा माल सावकारास द्यावा लागतो.

याप्रमाणें शेतकऱ्याचा पैसे आणणारा माल गूळ, मिरची, किंवा तंबाकू सारखा दलालाकडे गेला म्हणजे सोदा होत नाहीं म्हणून तो पडून राहतो व दलालाकडून फायदेशीर सोदा होअीपर्यंत त्याची रक्कम शेतकऱ्यांचें पदरांत पडत नाहीं. शिवाय काटा, बारदान, धर्मादाय अित्यादि कसरी शेतकऱ्यांच्या पैक्यांस लागतात त्या वेगळ्याच. व याद्दष्टीनें शेतकऱ्यांस शेतीचे कामास लागणारा पैसा पुरविण्याच्या सहकारी संस्था प्रत्येक खेडेगांवांत अस्तित्वांत येणे जरूर आहे. सध्यां खेडेगांवांत सहकारी संस्था आहेत, नाहीं असें नाहीं. पण त्यांची स्थिती शोचनीय आहे. निस्पृह व प्रामाणिक कार्यकर्त्याचें अभावीं अशा संस्था सुरळीत चालत नाहींत. शेतकऱ्यांस त्याचे गरजे करतां कर्ज देणेच्या तत्वांस अशा संस्थेचें काम क्वचितच होतें अेक ऋणको दोन जमिनदार यांनीं कर्ज मागणेचें ते मंजूर झाल्यावर जामिनदारांपैकीं अेकानें ऋणको होअून बाकीच्यानीं जामिनदार होअून पुनः कर्ज काढावयाचे व तिसऱ्या खेपेस राहिलेल्या जामिनदारानें ऋणको होअून बाकीच्या दोघांनी जामीनदार होणेचे व पुन्हां तिसऱ्या खेपेस कर्ज अुपटावयाचें अशी अुघड

अुघड ठकबाजी कित्येक सोसायटी मधून होतांना दिसून येते. व त्या सर्वांचा परिणाम म्हणजे थकबाकीच्या आकड्यांत बेसुमार वाढ होअून सोसायटीची स्थिती डबघाअीस येते हा होय. गेले तीस वर्षें जवळ जवळ या सहकारी तत्वाचा प्रसार केला जात आहे पण आज सदर सोसायटीची स्थिती मात्र अनुकंपनीय झाली आहे. या सर्वांस कारण म्हणजे चांगल्या व निस्पृह कार्यकर्त्यांचा अभाव हे होय. व या दृष्टीनें या सर्व सोसायट्या सुधारणेचे कार्य प्रथम सरकारनें हातीं घेतलें पाहिजे. सोसायट्यामधील सावळागोंधळ याची कडक नोंद करून त्याबाबतची अुपाय योजना त्वरित व काटेकोरपणें झाली पाहिजे. सोसायटीमध्यें काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी ही संस्था गरीब लोकांना कर्ज देअून त्याचा अुद्धार करण्याकरितां आहे याची जाणीव ठेवणें जरुर आहे. शेतकरी लोकांचा फुकटचा पुळका येअून व्याख्यान देणारे कार्यकर्ते पुष्कळ असतात. परंतु त्यांच्या कल्याणार्थ खरा स्वार्थत्याग करणारे लोक मिळत नाहींत; म्हणूनच सोसायट्यासारख्या संस्था डबघाअीस येतात.

सोसायट्यांच्या पुनर्रचनेप्रमाणेंच शेतकऱ्यांचे पीक जें येअील त्याची योग्य दरांत विक्री करण्याकरितां शेतकी माल विक्री संस्था स्थापन होणें अत्यंत अगत्याचे आहे. अशा तऱ्हेच्या Marketing Societies स्थापन झाल्या तर शेतकऱ्यांची दलालांकडून जी नागवणूक होते ती बंद होअील. व शेतकऱ्यांनें पिकविलेल्या मालाचे योग्य असें आर्थिक मूल्य त्याच्या पदरांत पडेल.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

## दुय्यमधंदे : ७

हिंदुस्थानामध्यें सध्यां जी शेती लागवडीखालीं आहे, किंवा जी नवीन शेतजमीन लागवडीखालीं आणतां येण्याजोगीं आहे, तेवढ्यानेंही हिंदुस्थानच्या लोकांच्या पोटापाण्याचा प्रश्न सुटत नाहीं. कारण लागवडीखालीं जी शेती सध्यां आहे त्या शेतीचें प्रमाण माणशीं पाऊण अेकरसुद्धां पडत नाहीं. पण हेंच प्रमाण अमेरिकेंत ५·१ अेकर तर आस्ट्रेलियांत ३ अेकर अेवढें पडतें. हिंदुस्थानांत तर या वाढत्या दारिद्र्यामुळें व शेतीच्या विशिष्ट परिस्थितीमुळें ‘ खादीचें अर्थशास्त्र ’ या नांवाचें पुस्तक लिहिणाऱ्या अिंग्रजी ग्रंथकार ग्रेग याच्या मतें हिंदुस्थानांतील १० कोटी ७० लक्ष लोकांना वर्षांतून कांहीं महिने बेकार राहावें लागतें. कारण हेंही खरेंच आहे कीं, जें राष्ट्र अुद्योगधंद्यातून अधिक अुत्पन्न काढतें, व ज्या राष्ट्रांमधील बहुसंख्य लोक अुद्योगधंद्यांत गुंतले आहेत तें राष्ट्र अधिक संपन्न असतें. व जें राष्ट्र निव्वळ कच्चा माल अुत्पन्न करतें तें अर्थिकदृष्ट्या दरिद्री असतें. व हिंदुस्थानची स्थिती आजतरी कच्चा माल तयार करणारें राष्ट्र अशीच आहे. अुद्योगधंद्याचा अुदय अलीकडे थोडाफार होअूं लागला आहे हें खरें; परंतु ही वाढ अगदींच अपुरी. राष्ट्राचें संवर्धन करण्याच्या दृष्टीनें पूर्णपणें असमर्थ अशी आहे. कारण शेतीचें अुत्पन्न व अितर अुद्योगधंद्यापासून होणारे दरमाणशीं निरनिराळ्या देशांचें अुत्पन्न पाहिलें म्हणजे अुद्योगधंद्याचें बाबतींत हिंदुस्थान किती मागासलेला आहे हें दिसून येणार आहे.

**अुत्पन्नाचें दरमाणशीं प्रमाणः—**

| | देशाचें नांव | अुद्योगधंद्यांतून येणारें अुत्पन्न | शेतांतून येणारें अुत्पन्न |
|---|---|---|---|
| १ | हिंदुस्थान... | १२ | ५९ |
| २ | जपान ... | १५८ | ५७ |
| ३ | स्वीडन ... | ३८४ | १२८ |
| ४ | ग्रेटब्रिटन... | ४१२ | ६२ |
| ५ | अमेरिका ... | ७२१ | १७५ |

वरील प्रमाण पाहिलें म्हणजे हिंदुस्थान अुद्योगधंद्याचें बाबत किती मागासलेला आहे हें दिसून येणार आहे. व या दृष्टीनें शेतीच्या धंद्यास पोषक असें कांहीं धंदे, जोडधंदे म्हणून शेतकऱ्यांना अुमलब्ध करून दिल्यास सध्यां होत असलेली अुपासमार कांहीं अंशी कमी होण्यास मदत होअील असें विचारी लोकांस वाटूं लागले. औद्योगिक अुन्नतीच्या दृष्टीनें अशा लहान लहान दुय्यम धंद्याचा अुपयोग नसला, व राष्ट्राच्या क्रयशक्तीची वाढ ( Funchasing power ) या धंद्यानें होणारी नसली तरी खेडेंगांवांतील शेतकऱ्यांचें जीवन कमी कष्टमय करण्याच्या दृष्टीनेंच त्यांचा अुपयोग होअील; यांत संशय नाहीं. पूर्वीच्या काळीं खेडें हें समाजांतील अेक स्वयंपूर्ण घटक होते. कोणत्याही गोष्टीकरितां खेड्यास दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची जरूरी नव्हती. त्याचा विचार पुढील प्रकरणांत करणेचा आहे. पण गेल्या शंभर वर्षांतील कारभारानें खेड्याची ही स्वयंपूर्णता जाअून ती आजच्या घटकेस कच्चामाल अुत्पादन करणारे व त्यापासून जो काय अल्पस्वल्प मोबदला मिळेल त्यावर अुपजिविका करणारें असें पूर्ण परावलंबी व खिळखिळे घटक झाले आहे.

दुय्यम धंद्याचा प्रश्न हा दिसतो तितका सोपा नाहीं. आज ग्रामोद्योग म्हणून कोणते धंदे करतां येण्यासारखे आहेत तें प्रथम पाहूं. व त्या नंतर सदर धंद्यांमधील अडचणी काय आहेत याचा विचार करूं.

**१ रेशमी किड्यांची पैदास,**—शेतकऱ्यांना फावल्या वेळांत हा धंदा करतां येण्यासारखा आहे.

**२ कोंबड्यांची पैदास व जोपासना**—हाही धंदा शेतकऱ्यांस शेतीवर कोंबडीं बाळगून करतां येण्यासारखा आहे. त्यामध्येंही त्यास कोंबड्याचे निरनिराळें रोग व त्यावरील अुपाय योजना याची माहिती करून देणें जरूर आहे. नाहींपेक्षां अशा ज्ञानाच्या अभावी कोणता तरी अेखादा रोग असा येतो कीं, त्यामुळें सर्व कोंबडीं खलास होतात.

३ **फळांची व फुलांची पैदासः**--हाही अेक चांगल्या प्रकारचा दुय्यम धंदा आहे. फळें ही मनुष्याच्या जीवनांत नित्योपयोगी बाब आहे याची कल्पनाच नसल्यानें फक्त आजारी पडल्यावर मोसंबी आणणेची किंवा हरितालिकेदिवशीं केळीं आणावयाची अथवा पित्त झात्रें म्हणजेच लिंबाचा अुपयोग करावयाचा अशी कल्पना आपल्यामध्यें रूढ झाली आहे. फळें खाण्याअितकी आर्थिक परिस्थिती हिंदुस्थानची नाहीं, असें जरी मानलें,तरी फळांचा धंदा फळें विक्रविणाऱ्यास आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे, असें म्हणणें भाग आहे. फळें खाण्याची ज्यांची अैपत आहे अशानाही चांगली व अुत्तम फळें मिळूं शकत नाहींत. संत्रें, आंबें, मोसंबी अशा सारख्या बागा साधारण तांबड्या जमिनीतही पाणी विपुल असल्यास होअूं शकतात. पण तसा प्रयोग करून पाहाण्याचें शेतकऱ्यांचे मनांतही येत नाहीं. काजूसारखीं झाडें निव्वळ माळावर येतात. पण ज्यांच्या जमिनींत माळ जमीन आहे, ते लोक माळ जमीन पड पाडतील. पण त्यामध्यें अशा तऱ्हेची फळझाडें लावणार नाहींत. आंब्यांच्या झाडांचीही अुत्पन्नाची बाब या दृष्टीनें किंमतीनें मोठीं आहे. परंतु त्या दृष्टीनें निरनिराळ्या तऱ्हेचीं कलमें बांधणें, रायवळ जातीच्या आंब्यास कलमीं आंब्यांचीं कलमें करणें वगैरे दृष्टीनें कोणी प्रयत्न करीत नाहीं. शेतकऱ्यांचा मुख्य धंदा म्हणजे पाअूस पडल्यावर जमीन अेकदां कुळवावयाची, व नंतर पेरावयाची. व मध्यंतरी अेक दोन वेळां भांगलण करून पुढें कापावयाची. व आलेल्या पिकांतील सावकार व सरकार यांचा हिस्सा देअून जें काय थोडें शिल्लक राहील त्यावर वर्षांतील आठ महिनें अर्धपोटी रिकामटेकडेपणानें निरुद्योगीपणांत किंवा भांडणांत काढावयाचे असा जणू शेतकऱ्यांचा वर्षाचा कार्यक्रमच ठरून गेल्यासारखा झाला आहे. जपानमध्यें अुसाच्या चोयटयांचा लहान लहान सुंदर टोपल्या करून त्यांना वेगवेगळा रंग देअून शेतकऱ्यांच्या बायका बाजारांत विक्रीस आणतात. कोणताही जिन्नस फुकट घालवून द्यावयाचा नाहीं; हें तत्व परदेशांत फार बिचारपूर्वक पाळले जातें. पण आपल्या देशांत मात्र दुर्दैवानें पैशाची काय, मनुष्य संपत्तीची काय, किंवा जमिनिची काय, अथवा त्यावर होत असलेल्या श्रमांचा काय,भयंकर प्रमाणांत अपव्यय होत आहे ! शेतकरी २।३ अेकर जमिनीतील तुकड्यांत दहा पंधरा

पण पिकविण्यास सर्व वर्ष फुकट घालवितो. तसें पाहिले तर भाताचें पीक तीन ते पांच महिन्याचें त्याकरितां लागणाऱ्या कष्ट मशागती करितां व कापणी मळणीकरतां दोन महिने मिळू सात महिने जरी धरले तरी बाकीचे पांच महिने शेतकरी व्यर्थ घालवितो. आपल्या राहत्या झोंपडी शेजारीं भाजीपालाही करण्याचा अलीकडे त्यास कंटाळा येअुं लागला आहे, अितका आळस शेतकऱ्यांमध्यें भरला आहे. तो झाडून त्यांनीं आपल्या वेळाचे मोल योग्य श्रमानें व कष्टानें मिळण्यास शिकलें पाहिजे.

४ **मधमाशा पाळण्याचा धंदा:**—मधमाशा पाळण्याचा धंदा हाही दुय्यम धंदा म्हणून शेतकऱ्यांस करतां येण्यासारखा आहे. पण या धंद्याच्या शास्त्रीय ज्ञानाची माहिती त्यांस करून दिली पाहिजे. कारण मध-माशा पाळण्याची जी लहान घरें तयार करतात त्याचें प्रात्यक्षिक मॅजिक-लॅंटर्नच्याद्वारें त्यास करून दिलें पाहिजे.

५ **हातसूत व हातमाग**:—शेतकऱ्यांच्या कुटुंबांतील मंडळींना फावल्या वेळांत राहाटावर सुत काढणें हाही अेक अुत्तम व्यवसाय आहे. वर्षांतील सात महिने काय व बाकीच्या वेळांत जर त्यानें सुत काढलें तर आपले कुटुंबांतील मंडळींना लागेल तेवढें सुत तो राहाटावर काढूं शकेल. खेडेंगांवांतील कोष्टी त्यास कापड काढून देअील. व त्यास मजुरी मिळेल. किंवा हातमाग घरीं ठेवण्याचें सामर्थ्य शेतकऱ्यांस असेल तर तो हातानें काढलेलें सुत घरीं मागांवर विणूही शकेल. आतां असा प्रश्न अुत्पन्न होअील कीं, शेतकऱ्यांनें घरीं काढलेलें व मागावर विणलेलें कापड हें बाजारांत मोठ्या यांत्रिक गिरण्यांमध्यें मोठ्या प्रमाणांवर अुत्पादन झालेल्या कापडाशीं कशी टक्कर देअुं शकेल. पण मला वाटतें शेतकऱ्यांचें कापड जवळच्या शह-रांत बाजारांत विक्रीस नेणेचें नसून त्यांस तें स्वतःच वापरण्याचे आहे. व त्या दृष्टीनें बाजारांतील किंमतीशीं तें चढाओढ करूं शकेल काय? हा प्रश्नच अुत्पन्न होत नाहीं. आपल्या अिकडे कापसाचें अुत्पन्न पुष्कळ आहे. पण त्यांतील निम्मा कापूस आम्ही कच्चा माल म्हणून बाहेर पाठवितो. व तिकडून

येणारा पक्का माल दहापट किंमतीस विकत घेतो. ही कापसाची निर्यात थांबवून जर अशा तऱ्हेनें प्रत्येक घरीं हात सुताचे राहाट फिरूं लागले व हातमागही घरोघरी खेळूं लागले तर कापडाकरितां खेड्यास बाहेर पाहावें लागणार नाहीं. खेडेंगांवचे लोक सर्व साधारण जाडेभरडें कापड वापरतात. व तसलें कापड तें गांवांतच अुत्पन्न करूं शकतात. कापसाची निर्यात करून " कुणबाअू" माल म्हणून तयार होअून येतो तो शेतकरी घेतो. ही गोष्ट त्याच्या आळशीपणाचें अुत्तम अुदाहरण आहे. खादी वापरा, चरख फिरवा, असें महात्मागांधी म्हणतात. व स्वराज्याचा तो मार्ग आहे असें प्रतिपादन करतात. स्वराज्य याचा अर्थ स्वयंपूर्णता. खेडीं हींच हिंदुस्थानची मुख्य घटकावयवें असल्यानें ती स्वयंपूर्ण होणें, म्हणजेच स्वराज्य मिळणें असा या चरखा शास्त्रांतील सिद्धांत आहे.

६ **दुग्धव्यवसायः**—खेडेंगांवांतील लोकांना दुय्यमधंदा म्हणून दुग्धव्यवसाय धंदाही करतां येण्यासारखा आहे. सध्याही शेतकरी गाअी, म्हशी बाळगतो व गाअीच्या किंवा म्हशीच्या दुधाचें रतीब घालून शेतकरी कांहीं थोडेंफार पैसे मिळवितो. परंतु ज्या गुरांकडून आपण दुध घेतो त्याची निगा किंवा त्यांना सकस अन्न देण्याचा आपण किती प्रामाणिक प्रयत्न करतो ? गुरांचे अन्न ( fodder) हें माणसांच्या अन्नाप्रमाणेंच शरीर पोषक द्रव्यांनीं युक्त पाहिजे व अशा तऱ्हेचा चारा जनावरांना देण्याबाबत आपल्यांपैकीं कितीजण प्रयत्न करतो ? शेतांमध्यें धान्य घेअून जीं धाटें अुरतील तीं गुरांकरितां, भाग घेअून जी पिंजर राहील ती जनावरांस व नाचणा मळून जी कांड राहील ती ढोरांस म्हणजे जें काय शिल्लक राहील तें जनावरांस, अशीच आमची समजूत जनावरांच्या अन्नाबाबत आहे. आपल्या देशांत सुमारें वीस कोटी जनावरें आहेत. व ती जगांतील गुरांढोरांच्या संख्येच्या $\frac{1}{3}$ अीतकीं आहेत, व अीतकी गुरें असूनही आमच्या अिकडील दुधाच्या अुत्पन्नाचें प्रमाण सर्व जगांतील दुधाच्या अुत्पन्नांच्या शेंकडा १२ टक्केच आहे. हिंदुस्थानांतील गाअिचें दूध देण्याचं प्रमाण हें अीतर देशांतील प्रमाणाशी ताडून पहातां आपलें हें पशुधनही बेतात्रेतानें वाअिट दशेस जात आहे असें दिसून येअिल.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | हिंदुस्तान ... ... ... | ... २ | पौंड |
| २ | हॉलंड ... ... ... | ... २०·५ | ,, |
| ३ | अिंग्लंड ... ... ... | ... १५ | ,, |
| ४ | न्यूझीलंड ... ... ... | १४ | ,, |

या दृष्टीनें पाहातां आमच्या अीकडील जनावरांनाही योग्य चारा मिळत नाहीं हें अुघड आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न हा महत्वाचा आहे. व त्या दृष्टीनें जनावरांचा चारा हा टाकाअू पदार्थ असें न मानतां खेड्यामध्यें अशा चाऱ्याकरितां गवती पड मुद्दाम राखण्यांत आली पाहिजे. पड जमिनीस खेडेगांवांत तोटा नसतो. अशा तऱ्हेच्या पड जमिनी आकारावरही देण्यास सरकार तयार असते त्यामध्यें जनावरांच्या चाऱ्याकरितां अुपयोग होअिल, असे गवताचे गड्डे किंवा बी टाकून शेतकऱ्यांनीं चाऱ्याची सोय सामुदाअिक-पद्धतीनें केली पाहिजे. आमच्या तालुक्यांतील कोंकण भागांतील लोक सरकारी पड जमीन पांच ते दहा वर्षांच्या करारानें आकारावर लागणीस घेतात. व त्यामध्ये गांवातर्फे सामुदाअिक पीक नाचणा, सावा असें करतात. दहा सालें जमीन पत्करली तर तीन फार तर चार सालें पीक काढू शकतात. याच पद्धतीनें गांवच्या शेतकऱ्यांनी सामुदाअिकपद्धतीनें सरकारी पड जमिनी आकारावर लांब मुदतीनें लागवडीस घ्याव्या व सरकारनें गांवच्या जनावरांना किती चारा लागेल याचा अंदाज करून अशा जमिनी जनावरांकरितां गवत तयार करण्याचे शर्थीवरच द्याव्या. म्हणजे खेडेगांवांतील जनावरांचा चाऱ्याचा हा बिकट प्रश्न आपोआप सुटेल. सध्या थोडे हिरवळ असते, तो पर्यंत जनावरांचे पोटकसेंबसें चालतें. परंतु अुन्हाळा सुरू झाला कीं, त्यांच्या पोटाचें मनस्वी हाल होतात व त्यांतच वाअीट पाणी वगैरे प्याल्यानें मोठमोठें रोग होअून ही संपत्ति नाश होते.

गुरांच्या आरोग्याबद्दलही सध्यां कोणत्याही तऱ्हेनें काळजी घेतली जात नाहीं. गुरांचें दवाखाने अलीकडे कांहीं ठिकाणीं निघतात हें खरें. पण त्यांचा अुपयोग बहुजन समाजास होत नाहीं. गुरांचे रोग हे सांथीच्या स्वरुपाचे असतात व आठ पंधरा दिवसासारख्या अल्प काळांत अशा रोगानें हजारों

गुरें मृत्युमुखीं पडतात व या दृष्टीनें साधारणपणें माणसांच्या आरोग्याबाबत जसे लहान लहान दवाखाने किंवा ग्रामीण केंद्रें खेडेगांवांत स्थापन केली जातात. तशाच तऱ्हेचीं केंद्रें गुरांच्या रोगांवर अुपचार करण्याकरितांही झाली तर सांथीच्या रोगांच्या वेळीं त्यांचा फार अुपयोग होजील. कोल्हापूर अिलाख्यांत सध्यां ग्रामीण वैद्यकिय केंद्रें स्थापन होत आहेत. व ती अुत्तम तऱ्हेनें चालली आहेत. त्यांस जोडूनच जर अशी गुरांच्या रोगांवर अुपचार करणारी केंद्रें स्थापन झाली तर खेडेंगांवांमधील गुरांच्या आजाराचा प्रश्न आज बिकट होअूं पहात आहे, तोही कमी होअील.

७ **लोंकर** —मेंढ्या पाळून त्यापासून लोंकर काढण्याचाही धंदा शेतकऱ्यांना करतां येण्यासारखा आहे. सध्यां धनगरलोक मेंढ्यांचे मोठमोठें खांड पाळतात. व त्यापासून लोंकर काढतात. खेडेंगांवच्या ज्या वस्त्रामध्यें तें मुख्य वस्त्र कांबळें त्याकडे या लोंकरीचा अुपयोग होतो. प्रत्येक शेतकऱ्यांनें जर कांहीं मेंढ्या पाळल्या, तर त्याला जमिनित या मेंढ्याचे खतही मिळेल व वर्षाच्या कांबळ्यांची लोंकरही पैदास करूं शकेल. खेडेगांवांत प्रत्येक कुटुंब स्वयंपूर्ण हीच बाब आजच्या स्थितीत महत्वाची आहे. व त्या दृष्टीनें शेतकऱ्यांच्या दृष्टीनें शेतकऱ्याच्या अुपजीवीकेस लागणारी हरअेक बाब जितक्या प्रमाणांत तो पैदा करील तितक्या प्रमाणांत त्याचें जीवन सुखमय होअील.

वरीलसारखे आणखीही पुष्कळ दुय्यम धंदे करतां येण्यासारखे आहेत, आतां मुख्य गोष्ट या धंद्यांच्या वाढीच्या मार्गांत ज्या अडचणी आहेत त्यांचा विचार करणे जरूर आहे. पहिली मोठी अडचण म्हणजे भांडवलाची आहे. हे लहान लहान धंदे भरभराटीस यावे अशी जर सरकाची प्रामाणिक अिच्छा असेल तर शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर मदत करावी लागेल. कोणत्याही मोठ्या धंद्यासही अुत्तेजन देणेचें झाल्यास बाजारांतील चढाओढीस त्या धंद्यास तोंड-देतां यावें म्हणून प्रथम प्रथम सरकार त्यास कांहीं संरक्षक सवलती देतें. कारण तशा सवलतीच्या अभावीं तो धंदा बाजारांत टिकाव धरूं शकत नाहीं. साखरेचा धंदा प्रथम हिंदुस्थानांत सुरु झाला. त्यावेळीं नवीन निघणाऱ्या

कारखान्यास पुष्कळ सवलती दिल्या गेल्या. जकातीपासून माफी दिली गेली. व कांहीं ठिकाणी अुत्पन्नावरील करही कांहीं मुदतीनें माफ केला. व म्हणूनच हा धंदा आज अुर्जित अवस्थेस आला. मोठ्या भांडवलाच्या धंद्याची जर ही स्थिती तर ज्या धंद्यास पुरेसें भांडवल शेतकऱ्यांस नाहीं, त्यांना प्रत्यक्ष मदतीच्या अभावीं कांहीं करतां येणार नाहीं हें अुघड आहे. या दृष्टीनें ग्रामोद्योगास प्रत्यक्ष किंवा सहकारी संस्थामार्फत कजाअू रक्कम देअून मदत करणें जरूर आहे. धंदे शिक्षणाची माहिती किंवा या ग्रामोद्योगाचें शिक्षण शेतकऱ्यांना द्यावें लागेल. हें शिक्षण स्थानिक कार्यकर्त्यांमार्फत किंवा प्रौढ शिक्षणाचा अेक भाग म्हणून गांवच्या शाळा मास्तरकडून द्यावें. व प्रात्यशिक प्रयोग करून हें धंदे किती अुपयुक्त आहेत याचेंही शिक्षण देणें सरकारास क्रमप्राप्त होअील.

दुय्यम धंद्यामधून अुत्पन्न झालेल्या वस्तु शेतकऱ्यांची गरज भागवून जर त्यास विकणेच्या असतील तर त्या जीनसास बाजारांत विक्रीची व्यवस्था सहकारी संस्था किंवा सरकारचे बाजार अधिकारी ( marketing officer) याच्या कडून करावी लागेल.

जपानमध्यें किंवा युरोपमधील छोट्याछोट्या राष्ट्रामध्यें वरील अुपायांनीं असें लहान लहान धंदे भरभराटीस आले आहेत.

अशा तऱ्हेने दुय्यम धंदे हे शेतकऱ्यांच्या ग्रामीण जीवनांतील महत्वाचा भाग आहे व त्यावर त्याच्या आर्थिक जीवनाचा विकास होणार असल्यानें त्या धंद्याची होत असलेल्या अुपेक्षेकडे जाणत्यांनीं लक्ष पुरवावें.

## पूर्णतेकडे : ८

खेडेंगांवांतील शिक्षण शेती, दुय्यम धंदे, किंवा या सर्वांबाबत विचार करूनही खेडेंगांवच्या होत असलेल्या आर्थिक ऱ्हासाविषयीं व त्यावर काय अुपाय योजना करणे जरूर आहे. यासंबंधी विचार केला नाहीं तर खेड्याचे सुधारणेच्या प्रयत्नांचे पूर्ण माप पदरात पडले असे म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानांतील खेडेंगांवची रचना तेथील वातावरण त्यांत राहाणाऱ्या लोकांचे मनोधर्म व खेड्याचा पूर्वींचा अैतिहासिक पाया किंवा त्यांची झालेली संस्कृतिक वाढ यासर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे शहरांतील कोणत्याही सुधारणा तंतोतंतपणें खेड्यांत आणल्या किंवा खेडेगांवीं लोकांचा संसार शहर पद्धतीचा केला म्हणजे खेडें सुधारेल असें म्हणतां यावयाचे नाहीं. किंवा तसा प्रयत्न करणें चुकीचे ठरेल हे थोड्या शोधा अंती दिसून येअिल. कारण हिंदुस्थानांत पूर्वीं खेडें हें देशांतील अेक स्वयंपूर्ण घटक होतें. पाश्चात्य राष्ट्रांत शहरांतून खेड्याकडे असा सुधारणेचा ओघ असला तरी हिंदुस्थानांत मात्र खेड्यांतून शहराकडे असाच सुधारणेचा ओघ असेल तरच देशाची अुन्नती होअिल. कारण देशाचा अुत्कर्ष हा मूलतः खेडेंगांवचें अुत्कर्षावरच अवलंबून आहे. कारण आपला देश म्हणजे कित्येक खेड्यांचा अेका राज्यतंत्रा खाली नांदणारा समूह आहे. आज त्या खेड्यामध्यें जो विस्कळीतपणा, जी आर्थिक हालाखी, जी सांस्कृतिक दुर्दशा व बेकारी अुत्पन्न झाली आहे तीच सर्व देशाच्या आजच्या दुर्दशेस निर्विवादपणें कारणीभूत आहे.

पूर्वींच्या काळीं खेडें हें आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होतें. खेडेंगांवांत पूर्वीं शेतकरी धान्य पिकवी. बाराही महिने शेतीवर राबून तो धान्याचें अुत्पादन करी. त्यास लागणारी अौतें गांवचा सुतार करुन देअि व त्या बद्दलचा मोबदला शेतकरी त्यास धान्य रुपानें देअि. गांवचा लोहार त्यास नांगराचे फाळ पुरवी किंवा लागेल तेव्हां दुरुस्ती करुन देअि व त्याचा मोबदलाही त्यास शेतकऱ्यांकडून धान्यरुपाने मिळे. गांवांतील ढोर त्या शेतकऱ्यांची मेलेलीं जनावरें नेअि व त्या कातड्याचा अुपयोग शेतकऱ्यांना मोट करण्याकडे होअि. चांभार

अगर ढोर हा खेड्यांच्या समाज व्यवस्थेंतील अेक घटक असल्यानें त्याचें भरण पोषण शेतकऱ्यानें मोबदला म्हणून दिलेल्या धान्यावर होअी. फावल्या वेळांत शेतकऱ्याचें कुटुंबांतील मंडळी चरख्यावर सूत काढीत व त्याचे कापड गांवचा कोष्टी शेतकऱ्यांस देअी व त्याबद्दलचा मोबदलाही शेतकरी त्यास धान्यरूपानें देअी. गांवचे महार, तराळ हेगांवोपयोगीं संस्थेंतील घटक शेतकऱ्यांच्या पिकांचें वर्षभर रक्षण करीत त्याच्या खळ्यावर पहारा करीत व धान्य पिकल्यापासून धान्याची मळणी होअून तें शेतकऱ्यांच्या घरीं जाअीपर्यंत हरअेक कामधंदा करीत व अुलटपक्षीं त्यांनीं केलेल्या श्रमाचा योग्य मोबदला शेतकरी त्यास धान्याचें रूपानें देअी. शेतकऱ्यांचे पशुसंवर्धन हें त्यावेळीं आतांसारखें शेतीचे अुपयोगीं पडणारी जिवंत यंत्रें यादृष्टीनें होत नसून जनावरें ही शेतकऱ्यांची संपत्ति आहे या भावनेनें शेतकरी त्यांचें जतन करी व शेतीस जरी तो जनावरांचा अुपयोग करून घेत असला तरी खेड्याच्या या गांवोपयोगीं कारागिरानाही शेतकऱ्यांच्या या गुरांचा अुपयोग होअी. अेकाद्या सुताराची थोडीशीच जमीन आहे किंवा अेकाद्या लोहाराची जमिनीची अेक कुणगीच आहे व तिची कष्ट मशागत करण्यास त्यास बैलजोडी ठेवून परवडणार नाहीं. तर शेतकरी आपली बैलजोडी त्यांच्या शेतांत कष्टास देअी. या आपुलकीमुळें हे गांवोपयोगी लोक शेतकरी हा आपल्यांतील अेक दादा या भावनेनें त्याच्याकडे पहात. त्यावेळीं पैशाची जरुरी खेड्यांत क्वचितच लागे. सरकारचा जमिनिचा फाळा पूर्वीं धान्यांतच दिला जात असे. गांवांत पंचायती असत त्यामध्यें गांवांतील तंट्याची न्यायपंचायती होत व त्यामध्यें खेड्यांतील विचारी, आचरणानें शुद्ध व कर्तृत्ववान लोक आपल्या गांवचें काम म्हणून त्यांत आस्थेवाअीकपणानें भाग घेत. पाटील कुलकर्णी हें गांवचे वतनदार असले तरी आजच्या प्रमाणें गरीब व अज्ञ शेतकऱ्यांचे ते मालक म्हणून वावरत नसत तर खेड्यांतील अेक प्रभावी व विश्वासू घटक म्हणून लोक त्यांच्याकडे पाहात. अशा तऱ्हेनें गांवांतील सर्व वर्गांची गुंफण शेतकऱ्यांभोंवतीं होत असे. आपल्या अुद्योगाचा योग्य मोबदला देणारा केंद्र बिंदू अशा भावनेनें ते शेतकऱ्यांकडे पाहात. खेड्यांत कोणतेही काम निघो त्यास हे सर्व घटक

हातभार लावीत. सार्वजनिक देअुळ दुरुस्त करणेचें असें पंचायतीनें टरविलें कीं, सुतार आपली हत्यारें घेअून सज्ज राही. लोहार लोखंडी काम करण्याची सिद्धता दाखवी. शेतकरी आपल्या शेतांतील लाकूड फाटयाची मदत करी तर गांवचे पाटील कुलकर्णी स्वतः अुभें राहून ही सर्व कामें ज्या त्या वर्गांकडून करून घेत. श्रमविभागाच्या तत्वानें हें काम चुटकीसारखें होअी. खेडें गांवांत कोणाचें लग्न निघालें तर या सर्व घटकांची त्या कामीं मदत होअी. व कोणाच्या घरीं मृत्यू झाला तरी हरअेकजण आपुलकीनें त्याची चोकशी करी. पूर्वीं खेड्यांत तंटे-भांडणें होत नसत असें नाहीं परंतु तंटा काय किंवा भांडण काय या सर्व गोष्टी गांवांतील निस्पृह पंचाकडे जात व दोन्ही पक्षकार त्यावर विश्वास ठेअुन होअील तो न्याय वंद्य मानीत. सध्यां खेडें गांवांत असें पंच असतात पण ते तंटेबखेडें मिटविण्याकरितां नसून वाढविण्याकरतां असतात. खेड्याचें वरील दृष्य मनोवेधक नाहीं असें कोण म्हणेल ? पण पुढें पुढें ही स्थिति पालटत गेली. गांवोपयोगी लोकांपैकीं सुतार, लोहार वगैरेनां शहरांत हळूं हळूं काम मिळूं लागलें. तेथें रोख पैसे मिळविण्याची त्यांना चटक लागली. शेतकऱ्यांनाही धान्य विक्री करून पैसा करणेची बुद्धि अुत्पन्न झाली. कारण सरकारी धारा हा धान्यरूपांतून हळूं हळूं पैक्यांतच वसूल होअूं लागला. महार, तराळ, बुरुड, गुरव वगैरेसारखें गांवचे अवश्यक घटकांचे खेड्याशीं असलेलें संबंध हळूं हळूं कमी होअूं लागले. कारण त्यांची अुत्पन्नें सरकारनें आकार बसवून रयतावा केली. त्यांच्या जमिनी खालसा झाल्यावर या लोकांना खेड्याचें काम आतां कां करावें असें वाटूं लागलें व त्यामुळें निर्वाहाकरितां त्यांना मजूरी करावी लागली. वतनें खालसा झाल्यामुळें रयतावा झालेल्या त्यांच्या जमिनीही हळूं हळूं कर्जापायीं सावकाराच्या ताब्यांत जाअूं लागल्या. पूर्वीं खेडेगांवांत असलेली मजुरी तेथेंच राहात होती. त्यांपैकीं फार थोडा भाग बाहेर जात असें पण पुढें ही स्थिति पालटली. देशांतील अुद्योगधंदे कमी होअूं लागले. शेतीची स्थितीही खालावली; अुत्पन्नापैकीं बरेचसें अुत्पन्न देशांतून बाहेर जाअूं लागलें व त्याचा सहजच परिणाम असा झाला कीं देशाची पूर्वीं असलेली भरभराट हळूं हळूं कमी होअूं लागली.

राष्ट्राच्या संपत्ति-शास्त्राचा असा अेक नियम आहे कीं लोकांपासून कराच्या किंवा अन्य तऱ्हेनें जें अुत्पन्न वसूल केलें जाते ते राष्ट्रामध्येंच राहाते व तें लोकांचें हिताकरतां खर्च होतें त्यावेळीच राष्ट्राची आर्थिक परिस्थिती चांगली राहते, अुद्योगधंदे वाढतात व शेतीचीही वाढ होते. परंतु ज्यावेळीं देशांचें अुत्पन्नचा ओघ अेका देशांतून दुसऱ्या देशांत जातो ( Exploitation ) त्यावेळीं मात्र देशाची स्थिति किती संपन्न असली तरी अखेर तो दरिद्रीच होतो. कारण राष्ट्रांतील संपत्ति सर्व बाहेर गेल्यानें ज्या राष्ट्रांतून अशी संपत्ति बाहेर जाते तो देश आपल्या पैशास कायमचा मुकतो. डॉ. बाळकृष्ण यांच्या 'Industrial decline in India' या पुस्तकाच्या पान १६९ वर हिंदुस्थानच्या दारिद्र्याची जी मिमांसा त्यांनीं केली आहे ती फार अुद्‌बोधक आहे. "हिंदुस्थानच्या वाढत्या दारिद्र्याला पुष्कळ कारणें आहेत; परंतु गृहअुद्योग, धंद्याचा नाश आणि देशांतील मालाच्या जागीं परदेशी मालाची स्थापना हें मुख्य कारण आहे असें शोधाअंती कळून येतें " व या दृष्टीनें खेड्यांतील पैशाचा ओघ आज कररूपानें, कच्या मालाकरितां कमी किंमत किंवा पक्या मालाकरितां पडणारी जास्त किंमत या सारख्या अुपायांनीं बाहेर जात आहे तो थांबविणें हा अेकच मार्ग खेड्याची आर्थिक स्थिति सुधारणेचा आहे. व त्या दृष्टीनें प्रयत्न होणें जरूर आहे. खेडेगांवची पूर्वींची स्वयंपूर्णता नष्ट झाली. बलुतेदारी अगर वतनदारी पद्धति हल्लींचें काळीं कुचकामी म्हणून ठरविणेंत आली व खेड्यांतील आजचें जीवन हें शहरांप्रमाणेंच आर्थिक मूल्यावर शेतकऱ्यांना जगणें भाग पडले. खेडेगांव पूर्वींप्रमाणें स्वयंपूर्ण होणें जरूर आहे. खेडेंगांवची आर्थिक पुनर्रचना झाली नाहीं किंवा सोप्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे त्यांची क्रयशक्ति वाढविली नाहीं तर निव्वळ शेती सुधारणा किंवा दुय्यम धंदे यांनीं शेतकऱ्यांच्या ढासळत चाललेल्या आर्थिक हलाखीचें निवारण होणार नाहीं.

आतां हें खरें आहे कीं सांप्रतच्या काळांत अेका बाजूनें सुधारणांची प्रगति झपाट्यानें होत असतां दुसऱ्या बाजूनें खेडेगांव खेडें पूर्णपणें स्वयंपूर्ण करा असें म्हणणें विसंगत आहे असें वाटेल. परंतु ही विसंगती नसून सुधार-

णेच्या भ्रामक समजुतीमुळें आपणांस ती विसंगती वाटते असें थोड्या विचारानें दिसून येअील. खेड्यांची क्रयशक्ति ( Purchasing Power ) वाढविणें म्हणजे तरी खेडेंगांवच्या लोकांना अुत्पन्नाचें नवीन मार्ग अुपलब्ध करून देणें होय. व त्यांनी मिळविलेल्या संपत्तीचा बराचसा भाग त्यांच्या अुपयोगास येअील अशी योजना करणें असेंच नाहीं कां ? व तसें करणें म्हणजे खेडेगांवांत नवीन अर्थोत्पादनाचे निरनिराळें मार्ग अुपलब्ध करणें असाच निष्कर्ष वरील विवेचनावरून कोणीही काढेल व त्याचाच विचार पुढील प्रकर्णी करावयाचा आहे.

..............

## आर्थिक पुनर्रचना :

१

खेडेगांवांतील प्रत्येक अिसमाचें वार्षिक अुत्पन्न शेती खेरीज त्यास अीतर अुद्योगधंदे विशेष नसल्यानें फारच अल्प पडतें. हिंदुस्थानांतील वर्षांस दरमाणशी अितर अुद्योगधंद्यापासून मिळणारें अुत्पन्न अवघें बारा रुपये आहे. तर अमेरिकेचें तेंच प्रमाण दरमाणशीं ७२१ आहे. यावरून हिंदुस्थान औद्योगिक प्रगतीमध्यें किती मागें आहे हें दिसून येतें. खेडेगांव हाच हिंदुस्थानच्या अुन्नतीचा पाया असल्यानें खेड्यांमध्यें असें अर्थोत्पादनाचे मार्ग खुले करणें अवश्य आहे.

हिंदुस्थानांतील अेकंदर खेड्यांची परिस्थीती पाहिली तर दारिद्र्यानें त्यांचें डोक्यावर पूर्णपणें वरदहस्त ठेवला असला तरी निसर्गानें मात्र त्यांच्या वरील लोभ अद्यापहि कमी केलेला नाहीं. भरपूर पाअूस, घनदाट जंगलें, निरनिराळ्या प्रकारची व निरनिराळ्या पिकांस अुपयोगी पडणारी जमीन व त्या सर्वांचे मदतीस कष्ट करणारे लोक या सर्वामुळें खेड्यामध्यें अुद्योगधंद्याचे वाढीस अुपयोगी पडणारी नैसर्गिक साधनें ( Natural Resources ) विपुलतेनें नांदत असलेली आढळून येतील. जंगलाचेंच अुदाहरण घेतलें तर या जंगलापासून कितीतरी तऱ्हेनें अुत्पन्न वाढवितां येअील. ज्या जंगलांत हिरडा बिपुल होतो त्याची आज काय व्यवस्था केली जाते ? दरवर्षास सदर हिरडा लिलांव होतो व बाहेरील दलाल तो माल परदेशांत पाठवितात. आज कच्चा माल म्हणून बाहेर जाणाऱ्या हिरड्यापासून परदेशांत निरनिराळ्या तऱ्हेचे रंग ( Dye Stuff ) तयार करतात व कितीतरी पट जास्त किंमतीनें विकत घ्यावें लागतात. हिरड्याचा कातडी कमाविण्याच्या कामीही अुपयोग होतो व ज्या ठिकाणीं असा माल विपूल आहे तेथें असें कारखानें काढल्यास त्यांचा संपत्तीची वाढ करण्याचें कामीं अुपयोग होअील. आपल्याकडे जंगलें विपुल असली तरी तीं व्यवस्थित नाहींत. जेथें तोड होते ती अितकी कीं, त्या ठिकाणीं त्यामुळें पाअूस नाहींसा होण्याअितके दुष्परिणाम त्या तोडीचे होतात. जंगल ही अेक नैसर्गिक संपत्ति

आहे. याचा विचार किती लोक करतात? अेखादा रुपाया हशील भरून जळणास लाकूड आणण्यासाठीं किंवा परवाना काढून शिकार करण्यासाठीं जंगले आहेत अशीच सर्वसाधारणपणें लोकांची कल्पना असते. याचा अर्थ लाकूड जळणास आणू नये किंवा शिकार करूं नये असा नाहीं. पण यापेक्षांही जास्त मौलिक कार्य जंगलांचें आहे याची कल्पना किती लोकांस येते? लाकडापासून कोक, डांबर या सारखें पदार्थ निर्माण करतां येतील याचा गंभीरपणें विचार कोणी केला आहे? जंगलांत असंख्य वनस्पती आहेत. त्यांचें संशोधन करून मोठ्या प्रमाणावर अौषधें तयार करण्याचें कारखानेही निघूं शकतील. ही गोष्ट कोणी लक्ष्यांत घेतली आहे काय? साग, सिसवा, किंवा चंदन या सारख्या झाडांची योग्य तऱ्हेनें लावण करून अिमारती करितां लाकडे मोठ्या-प्रमाणावर पैदा करता येतील या संबंधीची योजनापूर्वक आखणी कोणी केली आहे? जी गोष्ट जंगलांची तीच जमिनीची. कांहीं जमिनी पिकांस निरुपयोगी असल्या तरी त्यांची माती, कोळे, चिनी मातीची भांडीं, गाडग्यां या जिन्नसास अुपयुक्त ठरते. कांहीं ठिकाणीं अल्युमिनियम सुगावा असतो पण त्या जमिनीची पाहाणी ( Geological Survey ) न झाल्यानें ती सर्व साधन संपत्ति तशीच भूमीमध्यें पडून वाया जात असतें म्हणून प्रत्यक्ष क्षेत्राची पाहणी मग तें जंगल असो, जमीन असो किंवा डोंगर टेकड्या असोत, कोणत्या ठिकाणी कोणती साधन संपत्ती आहे याचें प्रथम संशोधन होणे जरुर आहे. हें काम अर्थांतच सरकारचें आहे. कारण ती अेक मोठ्या खर्चाची बाब आहे. पण अशा तऱ्हेनें नैसर्गिक संपत्तीची पाहाणी केली तरी खेडेंगांवामध्यें आज निद्रित अवस्थेंत असलेली ही साधन संपत्तीच अेक मोटी अुत्पादक शक्ति होअील. शेजारच्या खोलीतच पंचपक्वान्नाचीं ताटे जवळच्या खोलींत बसलेल्या अुपाशीं लोकांच्या नजरेस जर अुपलब्ध झाली तर त्यांना जितका आनंद होअील व ती पक्वान्नें खाअून तें लोक जसें तृप्त होतील त्याप्रमाणेंच ही नैसर्गिक साधनसामुग्री खेड्यामध्यें जर अुपलब्ध झाली तर आज दारिद्र्यांत पिचत पडणारे खेडेगांवांतील लोकांच्या राहाणींचा दर्जा खास वाढेल. कांहीं खेड्यांत जंगलाच्या विपुलतेंमुळें लाकडापासून कोक, डांबर काढण्याचे कारखाने निघतील तर कांहीं खेड्यांत कातडी कमाविण्याचे कारखानें अुभारतां येतील. ज्या खेड्याजवळ नैसर्गिक डोंगराच्या रांगा आहेत

अशा ठिकाणीं मोठ्या धरणाची योजना आखता येअील व त्यामुळें लगतच्या भागांत साखरेचे कारखाने काढतां येतील त्याप्रमाणें कोलाचे कारखानें याचे अुत्पादनही मोठ्या प्रमाणावर ज्या ठिकाणीं या कामास योग्य माती आहे. अशा ठिकाणीं अुभारतां येतील. व याद्दष्टीनें प्रांतामधील अेकंदर क्षेत्राचे गट करून त्या गटांची पाहाणी ( Geolgical Survey ) करणें हीच गोष्ट मुख्यतः आर्थिक पुनर्रचनेचा पाया आहे. कारण त्यामुळेंच या नैसर्गिक साधन सामुग्रीचा कयास बांधण्यास मदत होणार आहे. अर्थ शास्त्रांत नैसर्गिक साधनसामुग्रीस ( Natural Resources ) महत्वाचें स्थान असून अुत्पादनाचा तो अेक प्रभावी घटक समजला जातो.

दुसरी गोष्ट गांवची औद्योगिक पहाणी. औद्योगिक पाहाणीमुळे दोन गोष्टी साध्य होतात. अेक देशाची सध्याची अुद्योगधंद्याबाबतची स्थिति काय आहे व त्याची मदत राहणीचा दर्जा वाढविण्यास कितपत होते व दुसरें म्हणजे कोणत्या तऱ्हेचे अुद्योग कोठें सुलभतेनें करतां येतील. धंद्यासही प्रादेशिक अनकूलता लागते. व तशा ठिकाणीं तो धंदा मोठ्या प्रमाणावर चालू केला तर राष्ट्रीय—संपत्तीची वाढ करण्यास कारणीभूत होतो. कोल्हापूर संस्थानमधीलच अुदाहरण घ्यावयाचे तर अिचलकरंची हे हातमाग व पॉवर-लूम्स धंद्याचे आज मोठें केंद्र बनलें आहे. अर्थात् वरवर पहाणाऱ्यास ही प्रगति अलिकडची वाटली तरी त्याचा अुगम शेंदोनशें वर्षें हातमाग पिढ्यान-पिढ्या चालविणाऱ्या कोष्टयांच्या परंपरेंत आहे. शक्तीवरचे माग निघण्या—पूर्वींही अिचलकरंजीस हजारपर्यंत हातमाग होते. व आतां तर या सर्व मागांची संख्या पांच ते सात हजारापर्यंत गेली आहे. मागाच्या धंद्यास लागणारें कौशल्य, सराअीत कामकरी व या धंद्याची परंपरा या तिन्हींची जोड अिचल-करंजीस मिळाल्यानें सरकारकडून जर या ठिकाणीं या धंद्यास आर्थिक सहाय्य अगर संरक्षक सवलती किंवा योग्य अुत्तेजन दिलें गेलें तर हा धंदा अिचल-करजींत अितका फोफावेल कीं, ' महाराष्ट्रांतील मँचेस्टर ' हें नांव पूर्णतेनें सार्थ होअील. कारण या धंद्याचे अुत्कर्षास लागणाऱ्या सर्व गोष्टींची सिद्धता येथें आहे. व या द्दष्टीनें कोणत्याही कारखान्यांची किंवा अुद्योगांची वाढ

फक्त शहरांत करण्याच्या योजना आखण्यापेक्षां सर्व प्रांताची औद्योगिक पाहाणी करून ज्या ठिकाणीं जो धंदा करण्यास नैसर्गिक अनकुलता आहे त्या ठिकाणीं त्या धंद्यास अुत्तेजन दिल्यास किंवा तो धंदा मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचा प्रयत्न केल्यास औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीनें ते जास्त फायदेशीर होअील.

वरील या सर्व विवेचनावरून आतां कोणी असें म्हणेल कीं; खेडें स्वयंपूर्ण करावे असे म्हणता म्हणता खेडेंगांवांत कारखानें काढून तेथील लोकांना मजूर बनवावे असें तुम्ही म्हणूं लागला. वरकरणीं ही थोडी विसंगती वाटेल परंतु विचार करतां अशा तऱ्हेचे कारखानें हें खेड्याच्या स्वयंपूर्णतेस पोषक असल्याचे दिसून येअील. खेडें स्वयंपूर्ण म्हणजे शहरापासून किंवा प्रगतीच्या विचारापासून पूर्ण आलिप्त राहूं शकणार नाहीं. हल्लीचा काळ झपाट्याने वाहतो आहे व त्या दृष्टीनें सुधारणेच्या योजनेंत खेडेगांवही त्यांचे हिश्याचा वाजवी तो वाटा अुचलणेस सिध्द होणे क्रमप्राप्तच आहे. स्वयंपूर्णता याचा अर्थ आर्थिक स्वयंपूर्णता असा आहे व या दृष्टीनें खेडेंगांवची बलुतेदारी किंवा जुनी (Village system) बळकट करून जसें खेडें स्वयंपूर्ण करतां करतां येअील तसेंच ज्या खेड्यामध्यें नैसर्गिक साधन संपत्ति विपुल आहे त्या खेड्यामध्यें नवीन अुद्योगधंदे काढूनही तीच स्वयंपूर्णता राखता येअील. शिवाय अशा तऱ्हेचें अुद्योगधंदे खेड्यांत झाले तर शेतकऱ्यांच्या अुत्पन्नांत मात्र भर पडेल. आज आपला अेकमेव हेतू हिंदुस्थानांत अुद्योगावर मिळणारे दर माणशी वार्षिक अुत्पन्न जे बारा रुपयांचे आहे तें पन्नास शंभर रुपयांचे कसें होअील हा आहे व तो साध्य करण्यांस खेडेंगांवांत नवीन धंद्याची वाढ झाल्या खेरीज अन्य मार्ग नाहीं. खेडेंगांवच्या शेतकरी वर्गाची क्रय शक्ति (Purchasing Power) व त्यांच्या राहाणीचा दर्जा वाढविण्याचे दृष्टीने त्याखेड्यामध्यें अुद्योगधंद्याची वाढ करणें हा अेकच प्रभावी मार्ग आहे. आतां असें धंदे वाढ झाल्यानें शेतकरी मजूर होअील व शेतीवरील त्याचें लक्ष कमी होअील असा आक्षेप कोणी घेतील त्याचेही निरसन करणें क्रमप्रात्प आहे या आक्षेपाचे अुत्तरही सोपें आहे. खेड्यामध्यें सध्यां जी जमीन आहे ती खेड्यांतील सर्व लोकांना बारा महिने काम देण्यास पुरेशी नाहीं. त्यामुळे

पो० 931 श० 2८

प्रत्येक घरीं कांहीं काम नाहीं म्हणून आळशीपणानें वेळ काढणारा अेकादा तरी तरुण अीसम असतोच. बरेच लोक अलिकडे मुंबअीस रोजगारास जाअु लागले आहेत. यादृष्टीने शेतांत काम न करणारे जे निरुद्योगी लोक खेड्यांत आज फिरत आहेत त्यांना अशा कारखान्यांत काम मिळेल व प्रत्येक कुटुंबांतील अेकादा दुसरा अीसम अशा धंद्यांत काम करुं लागला म्हणजे सहजच त्या कुटुंबाची क्रयशक्ति वाढेल. आतां हे लोक अशा तऱ्हेचे कारखाने खेड्यांत निघाले म्हणजे मजूर बनणार हा आक्षेप शिल्लक राहिलाच व त्याचें अुत्तर असें देतां येअील कीं, आज आपला मुख्य हेतु आपल्या लोकांची क्रयशक्ति वाढविण्याचा आहे. दरमाणशीं अुद्योगधंद्यांतील वार्षिक अुत्पन्न जे बारा रुपये पडत आहे ते शक्य त्या अुपायांनीं वाढविण्याचे आहे. खेड्यांत जे कारखानें निघतील ते आपल्या लोकांचेच निघतील व त्यामुळें अशा कारखान्यांत अुत्पादन झालेली संपत्ति देशांतच राहील व त्याची मदत देशांतच राहील व त्याची मदत देशाचा आर्थिक दर्जा वाढविण्यास होअील; हें निःसंशय समजावें. आतां कारखान्यांत काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या रिकाम्या कुटुंबियास मजूरदार व्हावे लागेल. परंतु निरुद्योगीपणापेक्षां मजुरी चांगली कारण, त्यामुळें कुटुंबाची राहाणी वाढविण्यास तरी त्याच मजुरीची मदत होअील कीं नाहीं ? शिवाय कांहीं काल मजुरी करून शेतकऱ्यांचा सांपत्तिक दर्जा वाढला तर कालांतरानें समाअीक भांडवलावर ते लहान लहान कारखानें काढून मालकही होअू शकतील. मुख्य प्रश्न आर्थिक परिस्थिती सुधारणेचा असून वरीलसारखे कारखानें खेड्यांत निघाले तर त्या खेड्याची आर्थिक स्थिति सुधारण्यास त्याची मदत होअील. ही गोष्ट निर्विवाद आहे.

आतां आर्थिक पुनर्रचनेच्या दृष्टीनें खेड्यांची सर्व तऱ्हेनें पाहाणी करून ज्या ठिकाणीं जी नैसर्गिक साधनसामुग्री असेल त्या ठिकाणीं कारखानें काढणें हें अगत्याचे आहेच. कारण त्यामुळें खेड्याची क्रयशक्ति वाढण्यास मदत होअील. पण नुसती क्रयशक्ति वाढण्यानेंच खेड्यांची सुस्थिती होअील असे अनुमान करतां येणार नाहीं. तर खेड्यांत आलेला पैसा शक्यतो तेथेंच राहिला

तरच तें सुस्थितीचें लक्षण होअील. अेकाद्या हौदांत पाणी येण्याकरितां भला मोठा तीन अिंची नळ सोडला पण त्याचवेळीं त्या हौदाचें बुडास मोठमोठी छिद्रें असली तर तो हौद कधींच भरणार नाहीं. जितक्या वेगानें पाणी त्यांत भरेल त्याच्या दुप्पट वेगानें तें बाहेर अुसळ्या मारून जाअील. तीच स्थिती खेडेगांवांत येणारे संपत्तीची न व्हावी म्हणून या आर्थिक पुनर्रचनेच्या दुसऱ्या बाजूचा विचार करणें क्रमप्राप्त आहे. त्या बाजूस मी पुनर्रचनेचा नैतिक भाग असें म्हणतो. खेडेगांवांत आलेली संपत्ती रिचविणारे मार्ग म्हणजे व्यसनें, लग्न वगैरे सारख्या कार्यांत होणारीं खर्चाची अुधळपट्टी, देवदेवस्की किंवा कर्ज्ये, दलाली, खेड्यांत औद्योगिक वाढ झाली, कारखानें झाले म्हणजे अर्थातच खेड्यांतील तरुणास त्यांत अुद्योग मिळेल व रोज त्याचे हातांत ताजा पैसा खेळूं लागेल. व त्याचा परिणाम दारुसारख्या व्यसनाच्या आधीन तो तरुण होअील. आज मुंबअीस कामधंद्याकरतां जाणारे कित्येक लोक व्यसनापायीं मिळालेला सर्व पैसा अुधळून शरिराची राखरांगोळी करून परत खेड्यांत येतात. व कोणताही कामधंदा करण्यास ते निरुपयोगीं ठरतात. या दृष्टीनें खेडेगांवांत निघालेल्या धंद्यांत काम करणारा तरुण, अशा व्यसनांच्या आहारी न जाअील याबद्दल स्थानिक कार्यकर्त्यांनी प्रयत्न करणें जरुर जरुर आहे. अशा तरुणांना योग्य शिक्षण व प्रभावी मार्गदर्शन करणारे कार्यकर्ते खेड्यांत वावरणं जरूर आहे. जी स्थिति व्यसनांची तीच स्थिति लग्नकार्यावर भरमसाट खर्च करण्याची. हल्लीं शेतकरी अेक कार्य करतो त्यासाठीं तो कर्जाचा डोंगर अुभारतो. नवीन अुद्योगधंदे खेड्यांत झाल्यावर जरी त्याची क्रयशक्ति थोडीफार वाढली तरी अशा अुधळपट्टीचा ताण ती सहन करूं शकणार नाहीं. व यादृष्टीनें घरगुती अर्थशास्त्राची म्हणजेच आदा व खर्च याची माहिती त्यांस करून देणें अगत्याचें आहे. हीं व्यसनें अगर हें खर्च अज्ञानांतूनच अुगम पावतात. हें खरेंच व यामुळें शेतकऱ्यांस शिक्षण देअून त्याचें मन अशा गोष्टीपासून परावृत्त करण्याचा सतत अुद्योग करणें जरुर आहे. कोणत्याही बऱ्यावाअीट गोष्टीस त्यांच्या मनाची तयारी करणें हेंच काम फार बिकट आहे. व ती गोष्टच पार पाडणें हे स्थानिक कार्यकर्त्यांचें काम आहे.

खेड्यांत संपत्ति येण्याचे झरे शोधून काढणें हे जितके महत्वाचे आहे त्यापेक्षांही किंबहुना जास्त महत्वाची गोष्ट शेतकऱ्यांच्या अडाणीपणामुळें या संपत्तीची होत असलेली किंवा पुढें होणारी नासाडी थांबविण्यांत येत आहे. व हा प्रयोग जितक्या जास्त प्रमाणावर यशस्वी होईल तितक्या जास्त प्रमाणावर खेड्याची सुस्थिती होण्यास मदत होईल.

## उपसंहार : १०

आतां पर्यंत केलेल्या अेकंदर विवेचनावरून शेतकऱ्यांची किंवा खेड्यांची सुधारणा कोणत्या अुपायानें होअील व खेडींही अधिक कार्यक्षम बनून स्वतंत्र हिंदुस्थानांतील स्वयंपूर्ण घटक कशी होअूं शकतील या संबंधीं सामान्य नागरिकांचा दृष्टीकोन जनतेसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सध्यां हिंदुस्थानांत कॉंग्रेस सरकार काय किंवा संस्थानें काय यापैकीं ज्या ज्या ठिकाणीं सुधारणा योजनांचे कार्य हातीं घेतलें गेले आहे त्या त्या ठिकाणीं खेडेगांवच्या अुन्नतीकरितांच बराचसा पैसा किंवा श्रम खर्च करण्याचे संकल्प सुटले आहेत व याचेंही कारण खेडेगांवची सर्वांग परिपूर्णता हाच राष्ट्राच्या अुत्कर्षाचा मूळ पाया आहे. व ही गोष्ट आतां सरकारास पटूं लागल्याची चिन्हें सुधारणा योजनेचे कोणतेही पुस्तक सहज चाळून पाहणाऱ्यासही दिसून येणार आहे.

कोणत्याही सुधारणा-योजनेचें ध्येय " राहाणीचा दर्जा वाढविणें " हें आहे. आज हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीपुढें जगावें कसें हा प्रश्न दत्त म्हणून अुभा आहे. चांगल्या तऱ्हेनें जगण्याचा विचार करण्यास त्यांना सवडच नाहीं. अिंग्रज सरकारच्या दीडशें वर्षाच्या राज्यकारभारांत जगण्याचा प्रश्न सुटला नाहींच. तर अुलट अर्धपोटीपणा किंवा अुपासमार हा रोग हिंदुस्थानला कायमचा जडला. आर्थिक सामाजिक किंवा राजकीय विषमतेतूनच जन्म पावणाऱ्या या रोगाचें निर्मूलन राजकीय अुत्क्रांति, सामाजिक विषमतेचें अुच्चाटन किंवा आर्थिक मूल्यांत बदल या सारख्या अुपायाखेरीज होअूं शकणार नाहीं हें खरेंच. कारण खेडेगांवच्या अुन्नतीच्या मार्गांत भांडवलवाल्यांचे हितसंबंध पदोपदीं आडवे येतील व त्यांच्या हिताची अेकाद्या श्रीमान् दुखणाअीताप्रमाणें जपणूक करणाऱ्या सरकारकडून ते कितपत दूर होतील ही शंकाच आहे. सुदैवानें अशा तऱ्हेच्या योजनांचा अंमल करण्यास आतां प्रांतामध्यें कॉंग्रेस मंत्रीमंडळें स्थापन झाली आहेत व या दृष्टीनें खेडेगांवच्या सुधारणा योजनांना तो अेक मोठा सुमूहूर्तच लाभला आहे.

राहणीचा दर्जा सुधारणें किंवा सामान्य नागरिक खऱ्या अर्थानें जगूं लागला पाहिजे असें म्हणणें फार सोपें आहे. परंतु हें ध्येय साध्य होण्यास कार्यकर्त्यास अतुल स्वार्थत्याग करावा लागेल व सरकारलाही आर्थिक झीज प्रमाणाबाहेर सोसावी लागेल. व अशा तऱ्हेची सिध्दता सामाजिक कार्यकर्त्यांची किंवा सरकारची ज्या प्रमाणांत दिसून येअील त्या प्रमाणांत सुधारणेचें हें कार्य यशस्वी होअील.

सर्वसाधारणपणें खेड्यांच्या सर्वांगिण अुन्नति बाबत लेखकाचा दृष्टीकोन काय आहे याचेच परिशिलन मागील सर्व प्रकरणांत केले आहे. 'शहरांतून खेड्याकडे ' कां खेड्यांतून शहरांकडे या दोन ध्रुवा अितकें अंतर असलेल्या विचारप्रणाली मधून वाट काढणें हे फार अवघड काम आहे. व ते लेखकास साधलें नसलें तरी राष्ट्राची अुन्नति ही शहरांतून खेड्याकडे जाण्यांत नसून खेडींच स्वयंपूर्ण करण्यांत आहे. या लेखकाच्या दृढ विश्वासाच्या मताचा पुरस्कार शक्यतो मतामतांची लढाअी न करतां करण्याचा प्रयत्न केला आहे. व तो कितपत साध्य झाला आहे हे विचारी वाचकांनीं ठरविणेचें आहे. पुस्तकांतील कांहीं दृष्टीकोन चुकीचे असतील, कांहीं मतें न पटणारी असतील किंवा कांहीं मुद्याबाबत मतभेदही असूं शकतील पण अेकाच ध्येयाप्रत विचारांची गुंफण असल्यानें मार्ग कांहीं असले तरी ध्येय निश्चिती किती झाली हे ठरविणें सूज्ञ वाचकांचें काम आहे व त्या दृष्टीनें नव-विचारांना चालना देण्याचें काम मी केलें आहे. अेवढे जरी विचारी लोकांस पटले तरी मी स्वतःस धन्य समजतो.

शेवटीं ज्या शेतकऱ्यांच्या सहवासांत मी माझ्या आयुष्याची ८-१० वर्षें काढली व ज्यांच्या निरागस मनोवृत्तीबद्दल मला राहून राहून कौतुक वाटतें व त्यांच्याबद्दल आपुलकीची भावना दृढ होते. त्यांच्याच सहवासाचें फळ म्हणजे माझे हे विचार होत. अुलटपक्षीं शेतकऱ्यांची दिशाभूल करणारे कांहीं अुपद्व्यापी लोक खेड्यांतून वावरतांनाही मला आढळून आले व हे लोकच शेतकऱ्यांच्या खऱ्या अुन्नतीच्या आड येतात. निरागस मनोवृत्तीच्या

देवधर ग. ल.



शेतकऱ्यांप्रमाणेंच आपल्या स्वार्थाकरितां दुसऱ्याचे कितीही नुकसान करण्यास व बदनामी करण्यास सदा सिद्ध असलेल्या क्रीयाशून्य लोकांचाही मला या ठिकाणीं बराच परिचय झाला. आपल्या मनांतल्या वीष ओकण्याचे अेक अमोघ अस्त्र या लोकांचे जवळ असतें व ते म्हणजे निनावी अर्ज मानवी मनाच्या अधःपाताचें हें अत्यंत हिडिसस्वरूप व त्याचे गुप्त विश्वकर्मे बहुसंख्य खेड्यांत थैमान घालतांना पाहिले म्हणजे खेड्यांची सुधारणा करणाऱ्यास प्रथम घृणा अुत्पन्न होअून निराशा वाटल्या खेरीज राहणार नाहीं. परंतु खेडेगांवांत कार्य करणाऱ्या सेवकानें अशा समाजकंटकांना शोधून काढून समाजांत त्यांची फजिती करण्यास सुरवात केली व शेतकऱ्यांना अशा समाज कंटकांच्या विचारांचा विषारीपणा व स्वभावाचा दांभिकपणा पटवून दिला तर खेडेंगांवचा शेतकरी अशा लोकांपासून चार पावलें दूर राहील. अशा तऱ्हेनें खेडीं सुधारणे बाबत प्रयत्न झाले तर मानवाचा जो अेक मोठा भाग आज अुपेक्षिला जात आहे. त्याचा अुद्धार केल्याचें श्रेय थोरांच्या पदरीं पडेल. विश्वबंधुत्वाची नुसती सूक्तें गात बसण्यापेक्षां आपल्या आजाण, अज्ञानी व भाबड्या बांधवांना आपल्या रांकेंत आणून बसण्या अितकें शहाणे व समर्थ आपण करू शकलों तर राजकवी टेनिसन यानें म्हटल्याप्रमाणें:—

" For the whole round earth
is every way
Bound by gold chains around
the feet of God "

अशी स्थिती निर्माण होअील व ' अुद्याच्या खेड्यांच्या ' क्षितीजावर ज्ञानरवीचा अुदय झाला असें म्हणतां येअील.

— अितिअलम् —

९३१ शा ज २ ७

## ❀ याच लेखकाची पुस्तके ❀

१ जांवई [ लघुकथा व निबंधसंग्रह ]

किंमत १। रुपाया

## ❀ आगामी प्रकाशन ❀

१ गप्पा [ लघुनिबंध संग्रह ]

२ दीपस्तंभ